14-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
ABG/ D/ KTG/ 10:30

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

**पृ. शी**. : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील इंदू मिलच्या जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे करण्यासाठी करावयाची उपाययोजना

**मु. शी**. : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील इंदू मिलच्या जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे करण्यासाठी करावयाची उपाययोजना या विषयावर सर्वश्री सुभाष चव्हाण, हेमंत टकले, संजय दत्त, भाई जगताप, प्रकाश बिनसाळे, रमेश शेंडगे, श्रीमती अलका देसाई, श्री. किरण पावसकर, ॲड. जयदेव गायकवाड, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री नरेंद्र पाटील, राम पंडागळे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु...)

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी ) : या प्रस्तावावर राहिलेल्या उर्वरित सन्माननीय सदस्यांची भाषणे आपल्याला 11 वाजून 5 मिनिटांपर्यंत पूर्ण करावयाची आहेत. 11 वाजून 5 मिनिटांनी माननीय मुख्यमंत्री महोदय या प्रस्तावाला उत्तर देणार आहेत. म्हणून माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपापले विचार पाच-पाच मिनिटात पूर्ण करावे. प्रा. सुरेश नवले यांनी आपल्या भावना व्यक्त करण्यास सुरुवात करावी.

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) :सभापती महोदय, या सभागृहाचे जाणते आणि जागरुक सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी जो प्रस्ताव मांडला आहे, त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, दिनांक 14 एप्रिल 1898 ते दिनांक 6 डिसेंबर 1956 हा या महामानवाचा इतिहासपट, जीवन चरित्रपट आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म हा दलित बांधवांच्या आयुष्यामधील सूर्योदय होता. त्यांच्या परिसस्पर्शाने असंख्य जीवांचा उध्द्गार झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विषमतेच्या विराट वृक्षावर प्रचंड प्रहार केले आणि शेवटी बुध्द विचार स्वीकारला. या सारनाथातील अशोक स्तंभावरील तीन सिंह भारताची राजमुद्रा म्हणून स्वीकारली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

14-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-2

ABG/ D/ KTG/ 10:30

प्रा.सुरेश नवले...

हा बुध्द विचाराचा परिपाक होता. संघर्ष हे जीवनातील अविभाज्य अंग होते. रात्रं-दिवस युध्दांचे प्रसंग अशा प्रकारचे जीवन ते आयुष्यभर जगले. संघर्ष आणि कष्ट त्याचे मूर्तीमंत उदाहरण, त्याचा मूर्तीमंत अविष्कार म्हणजे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे जीवन चरित्र आहे. या सगळया जीवन चरित्राचा समावेश या स्मारकामध्ये अंतर्भूत असावा अशी माझी आग्रहपूर्वक विनंती आहे.

सभापती महोदय, आभाळा एवढे उत्तुंग व्यक्तिमत्व असणाऱ्या या महामानवाचा या भूमीमध्ये जन्म व्हावा हे या भूमीचे भाग्य होते. अशा भाग्यवंताला स्मारक देण्याची संधी राज्य शासन आणि केंद्र शासनास मिळावी यामध्ये सुध्दा या दोन्ही सरकारचे भाग्य आहे असे मी मानतो. म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, भारताचे पंतप्रधान, आदरणीय सोनिया गांधी आणि राष्ट्रवादी पक्षाचे सर्वेसर्वा आदरणीय श्री.शरदचंद्र पवार साहेब यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. इंदू मिलची जागा स्मारकाला देण्याबाबतची संकल्पना प्रथमत: ज्या भाग्यवंताला सूचली असेल त्याचेही मी अभिनंदन करतो.

सभापती महोदय, शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा या शिकवणीचे प्रणेते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होय. अस्पृश्यतेचे संपूर्ण उच्चाटन करण्याचा संकल्प त्यांनी केला. देवाचे दर्शन घेता आले असते तर कदाचित काळा राम मंदिरामध्ये प्रवेश करण्यासाठी सत्याग्रह करण्याची त्यांच्यावर वेळ आली नसती. काळा राम मंदिरामध्ये प्रवेश करण्याची अस्पृश्यांना संधी असती तर कदाचित इतिहासाची पाने वेगळी लिहावी लागली असती.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले......

पण नियतीची पटकथा बहुधा अगोदर तयार झालेली असावी. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा नियती, भाग्य यावर विश्वास नव्हता. मनुस्मृती जाळण्याचे काम त्यांनी केले. ते एक क्रांतीकारक पाऊल होते. समतेच्या दिशेने टाकलेले प्रत्यक्ष क्रांतीकारक पाऊल होते. हिंदूधर्म भोळेपणा हा जाती व्यवस्थेचा मूळ कणा आहे यावर त्यांचा गाढा विश्वास होता. तरी देखील त्यांनी लोकसभेमध्ये हिंदू कोड बिल उदार अंत:करणाने मांडले.

सभापती महोदय, 1923 साली ज्यावेळी कायद्याची दुर्मीळ पदवी घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारतात परत आले त्यावेळी विधी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून विद्यार्थ्यांना शिकविण्याचे पवित्र काम त्यांनी केले. त्याचबरोबर महाविद्यालयाबाहेर ते प्रबोधनाचे काम करीत होते. एकीकडे वाचन, चिंतन आणि दुसरीकडे विद्यार्थ्यांना शिकविणे आणि प्रबोधन करणे या तीन स्तरावर या महामानवाचा प्रवास सुरु होता. त्यामुळे इतिहासामध्ये या महामानवाचे नाव अजरामर आहे.

सभापती महोदय, महान व्यक्तींचे जीवन चरित्र म्हणजे इतिहास आहे असे एका तत्ववेत्त्याने म्हटले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन हे वर्तमान आणि भविष्यासाठी प्रेरक आणि पोषक ठरणार आहे. त्यामुळे त्यांच्या स्मारकामध्ये सर्व गोष्टींचा अंतर्भाव असावा. शेवटी जी मोडलेली माणसे होती त्यांना उभे करण्याचे काम या महामानवाने केले. ज्यांच्या गावामध्ये सूर्य नव्हता त्यांच्या हातामध्ये उजेड देण्याचे काम या महामानवाने केले. त्यामुळे राज्य शासन आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांच्या मदतीने आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य आणि दिव्य स्मारक उभारण्यात यावे अशा प्रकारची आग्रही विनंती करुन मी आपली रजा घेतो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, सर्वप्रथम महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याकरिता मुंबईतील इंदू मिलची 12.5 एकर जागा उपलब्ध करुन दिली त्याबद्दल देशाचे पंतप्रधान आदरणीय डॉ.मनमोहन सिंग, देशाचे कृषीमंत्री आदरणीय श्री.शरद पवार साहेब, या राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय श्री.पृथ्वीराज चव्हाण, उप मुख्यमंत्री आदरणीय श्री.अजितदादा पवार आणि माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील तसेच सर्व दलित नेते मंडळी या सगळ्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाचे जे स्मारक उभारले जाणार आहे त्या निमित्ताने या ठिकाणी चर्चा केली जात आहे. या देशाचे आणि राज्याचे जे राष्ट्रीय महापुरुष आहेत, ज्या अस्मितादर्शक प्रतिमा आहेत त्यांच्या संदर्भात जेव्हा आपण स्मारक उभारण्याचा विचार करतो त्यासाठी प्रत्येकाला संघर्ष करावा लागतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाबाबत दलित बांधवांना झगडावे लागले................

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे .....

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी मंडळी भांडत आहेत, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मारकासाठी मंडळी भांडत आहेत. त्यामुळे अशा या मंडळींची दखल शासनाने घेणे आवश्यक आहे. आपण पुढच्या पिढीला कोणता विचार, कोणते शिक्षण देणार आहोत, हे महत्वाचे आहे. स्मारक उभारणे म्हणजे विटा, दगड, माती गोळा करणे, एवढाच अर्थ नाही. या स्मारकातून पुढच्या पिढीला दिशा मिळावी, स्फूर्ती मिळावी, प्रेरणा मिळावी, हा खरा या स्मारकाचा उद्देश आहे आणि हे काम खरे तर सरकारने करणे आवश्यक आहे. परंतु या राज्यामध्ये ज्या ज्या महान मानवांनी जन्म घेतला, त्यांचे स्मारक उभे करण्यामध्ये, या शासनाकडून किंवा यापूर्वीच्या शासनाकडून कायम दुर्लक्ष झाले आहे, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. सभापती महोदय, आपल्या देशातील सर्व महामानवांच्या प्रतिमा आपण सर्वजण नेहमीच जपत आलो आहोत. पण काही वेळा त्याचा अनादर होतो, असे मानणाऱ्या कार्यकर्त्यांपैकी मी एक आहे. स्मारक उभे करण्यासाठी लोकांना आंदोलन करण्याची गरज का निर्माण व्हावी ? डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी दलित जनता उभी ठाकली आहे. त्यांची मते दुसरीकडे जाऊ नयेत, ती आपल्या पासून लांब जाऊ नयेत, म्हणून आपण मुंबई ते दिल्ली पर्यंत खेटे घातले व या जनतेच्या पदरात स्मारकाचे दान दिले. अशी वेळ का यावी ? खरे तर, ज्या महामानवांनी देशासाठी मोठे काम केले आहे, त्यांची स्मारके उभी राहिली पाहिजेत, त्यांचे स्फुर्तीस्थान निर्माण केले पाहिजे. आज आपण वाटेल तेथे पैसे खर्च करतो, वाटेल तेवढया जागा, जमिनी देतो, अनेकांना अनुदान देतो, नको तेथे उधळपट्टी करतो. परंतु, ज्यांचे स्मारक उभे करावयास पाहिजे, त्यांचे स्मारक आपण उभे करीत नाही, त्यांच्या बाबतीत डोळेझाक करतो, हे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. परंतु, असे असले तरी आज महामानवाचे स्मारक उभे राहत असल्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, इंदू मिलच्या जागेत डॉ.बाबासाहेबांचे स्मारक उभे रहावे, यासाठी प्रथम आमच्या श्री.विजय कांबळे यांनी प्रयत्न करण्यास सुरुवात केली. श्री.विजय कांबळे हे अतिशय बहादूर आणि लढाऊ आहेत. इंदू मिलच्या जागेसाठी त्यांनी सुरुवातीपासून आग्रह धरला, हट्ट धरला, संघर्ष केला. त्यानंतर त्याचे मोठ्या समुहात रुपांतर झाले, हा भाग वेगळा. नंतरच्या सर्व प्रक्रियेमध्ये

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे .....

श्री.विजय कांबळे यांना शासनाने लांब का ठेवले, हे काही मला समजले नाही. खरे म्हणजे, हा श्री.विजय कांबळेंवर अन्याय आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक इंदू मिलच्या जागेत उभे राहिले तर त्याचे श्रेय श्री.विजय कांबळे यांच्याशिवाय कोणीही घेऊ शकणार नाही. कागदपत्रावर कोणी कितीही रेघोटया मारल्या तरी काही फरक पडत नाही. आपल्या सर्वांच्या अणूरेणूमध्ये महामानव वसलेले आहेत.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे इंदू मिलच्या जागेत जे स्मारक उभे राहणार आहे, ते कशा प्रकारचे असणार आहे, स्मारकाच्या संदर्भात शासनाने काही आराखडा तयार केला आहे का, दलित बांधवानी स्मारकाच्या संदर्भात जो आराखडा दिला आहे, तो शासन मान्य करणार की, त्यामध्ये सुधारणा करणार, शासनाचा कोणता विभाग स्मारकाची अंमलबजावणी करणार आहे, स्मारकांची उभारणी सामान्य प्रशासन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, सांस्कृतिक विभाग यापैकी कोणता विभाग करणार आहे, स्मारकासाठी आर्थिक तरतूद कोण करणार आहे, स्मारक उभे करण्यासाठी कोणा कोणाची मदत घेतली जाणार आहे, स्मारकाचा कारभार शासन चालविणार आहे की, ट्रस्टमार्फत चालविला जाणार आहे, अशा सर्व प्रश्नांची उत्तरे मुख्यमंत्री महोदयांच्या भाषणातून मिळणे गरजेचे आहे. अन्यथा, ज्या पध्दतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे घोंगडे समुद्रात बुडवून टाकावयास आपण निघालो आहोत, त्याच पध्दतीने बाबासाहेबांच्या स्मारकाबाबत केवळ घोषणा करुन आपण मोकळे होणार आहोत का ? राज्यातील जनतेला केवळ लालूच दाखविण्याचे काम आपण करु नये, एवढेच मला या निमित्ताने सांगावेसे वाटते. केवळ लालूच दाखविण्याचे काम केले गेले तर राज्यातील जनता ते कधीही सहन करणार नाही.

सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, आता जनता सजग, जागरुक झाली आहे. स्मारकाची अंमलबजावणी तुम्ही चांगल्या पध्दतीने केली नाही तर जनतेला जाब द्यावा लागेल. माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, हे स्मारक किती दिवसात पूर्ण होणार आहे, कसे असणार आहे, याची सर्व माहिती मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तरामधून आली पाहिजे. हे स्मारक पूर्ण होण्यासाठी किती वर्षांचा कालावधी लागणार, तसेच स्मारकासाठी किती निधीची तरतूद करणार आहात, याची सर्व माहिती सभागृहाला देण्यात यावी.

यानंतर श्री. भारवि....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

श्री.विनायक मेटे....

नाही तर नुसत्या वायफळ चर्चा करून फक्त समाधान होईल. त्यापलीकडे काहीच निष्पन्न होणार नाही. आपण कोरडी श्रद्धांजली आणि कोरडा सद्भाव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रती दाखवत आहोत असे होता कामा नये. त्यामुळे हे स्मारक लवकरात लवकर तयार होणे अत्यंत गरजेचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी जागा देण्यात आली आहे. त्याचे आम्ही अभिनंदन केले आहे. सगळ्यांचेच अभिनंदन केले. तसेच, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक देखील तुम्हाला करावेच लागेल. त्यासंबंधीचा निर्णय शासनाने घेतला नाही तर मी आताच येथे सांगतो की, येत्या मंगळवारी 18 तारखेला सकाळी 11.00 वाजता आम्ही धरणे आंदोलनाला बसल्याशिवाय राहणार नाही. आपण मला बोलायला संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी अत्यंत जागरूकतेने या अधिवेशनाची संधी साधून शासनाला बोलते करण्यासाठी हा प्रस्ताव आणला आहे. अनेकांनी तो श्रेय घेण्याकरिता आणला असे आडून आडून बोलण्याचा प्रयत्न केला. श्रेयाकरिता सर्वांचीच झुंबड उडाली आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हे आपल्या भावनाविवश भाषणात दुर्दैवाने, कळत नकळत, इच्छा नसताना चुकून बोलले ते अत्यंत अयोग्य होते. ते म्हणाले की, आम्ही सर्वांनी दिल्ली पर्यंत पाठपुरावा केला. एवढे सर्व केल्यानंतर हे दान आमच्या पदरात पडले. मला त्यांना विचारावयाचे आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी शासनाने जमीन दान म्हणून दिली काय ? हा शब्द आपण रेकॉर्डवर वापरला आहे. मनातली भावना पटकन लक्षात येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या उत्तुंगतेला सलाम करण्यासाठी महाराष्ट्रातील आंबेडकरी जनतेने झुंज दिली. या शासनाला, केंद्र शासनाला नमवून.....

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी हे आदराने बोलत आहे. सन्माननीय सदस्य कदाचित भावनेच्या ओघात बोलले असतील. पण तो शब्द यायला नको होता. मला यात राजकारण करायचे नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते माझ्यावर आरोप करीत आहेत असे माझे म्हणणे नाही. चुकीचे रेकॉर्डवर राहू नये एवढेच माझे म्हणणे आहे. मला एवढेच म्हणावयाचे होते की, आपण सर्वजण त्यामध्ये आग्रही भूमिका घेत आहोत. यासाठी आपण पंतप्रधानांना देखील भेटलो. ही जागा महाराष्ट्र शासनाला केंद्र शासनाने दिल्या सारखी आहे.

**उप सभापती** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ माननीय मुख्यमंत्र्यांचे भाषण होई पर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तसा सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांचा उद्देश देखील नसेल. तो शब्द रेकॉर्डवर असू नये असे मला वाटते. आंबेडकरी जनतेने प्रदीर्घ लढ्यातून केंद्र सरकारला नमवून ही जागा घेतली आहे. त्या जनतेच्या संघर्षाचा हा विजय आहे. ही त्यातील महत्त्वाची भूमिका आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकत होतो. दुर्दैवाने ही जागा कोणी दिली, कशी दिली, कोणी आणली यावरच चर्चा झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर एवढे छोटे होते का हो की, मी त्यांच्याकरिता एवढे केले म्हणून सांगावे. आपण करणारे कोण? ..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मग हे दादर रेल्वे स्टेशनला नाव का देत नाही ? ते नाव देण्यासाठी कोणता प्रॉब्लेम आहे ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, जागा कोणी मिळवून दिली यावरून आता वाद सुरू आहे ना ?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, त्यांच्या पक्षाचा दादर रेल्वे स्टेशनच्या नावाला विरोध आहे. येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल सन्माननीय सदस्य स्तुती सुमने उधळत आहेत म्हणून आमचे म्हणणे आहे की, ज्या महामानवाने सगळया जगाला वेगळा संदेश दिला त्यांचे नाव दादर स्टेशनला देण्यास काय हरकत आहे ? मोठ्या मनाने आपण सांगावे की, आम्ही दादर रेल्वे स्टेशनला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देतो. आपण मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराला देखील पाठिंबा दिला नाही.

**उप सभापती** : आज सकाळी 11.15 वाजता माननीय मुख्यमंत्र्यांचा या प्रस्तावावरील रिप्लाय सुरू करावयाचा आहे. सन्माननीय सदस्यांनी कोणाच्याही भाषणात व्यत्यय आणू नये. तसेच, भाषण करणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी लवकरात लवकर आपले म्हणणे मांडावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, त्यांना एवढेच वाटत असेल तर त्यांनी धर्म बदलावा. त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करावा. आपण नागपूरातच आहोत म्हणजे मग आम्हाला जे काही समजायचे ते समजेल. ही पद्धत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर किती मोठे आहेत हे सांगायला तुम्ही आणि आम्ही एवढे मोठे आहोत काय ?

श्री.भाई जगताप : नाही.

श्री.दिवाकर रावते : मग आपण खाली बसावे. प्रश्न असा आहे की, मी अजून तुमच्यावर काहीच बोललो नाही. मी एवढेच म्हणालो की, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे चुकून बोलले आहेत.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

मघाशी पायरीवर आपण शिमगा करायला नव्हता.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक इंदू मिलच्या जागेत व्हावे हा विषय प्रथम श्री.विजय कांबळे यांनी काढला हे बरोबर आहे. त्यांनी सुरुवातीला स्मारकासाठी चार एकर जमीन द्यावी अशी मागणी केली होती. पुढे साडेबारा एकर जमिनीची मागणी आली. त्यानंतर आंबेडकर संघटनांनी आणि त्यांच्या नेत्यांनी स्मारक होण्यासाठी संघर्ष करायचा सोडून मी ते करीत आहे, मी ते करीत आहे असे सांगायला सुरुवात केली.

सभापती महोदय, श्री.आनंद आंबेडकर यांनी गेल्या वर्षी 6 डिसेंबर रोजी केलेल्या आंदोलनानंतर हा विषय तीव्रतेने पुढे आला. तेव्हा हे श्रेय त्यांच्याकडेच जाते. त्यांनी 6 डिसेंबर रोजी केलेला संघर्ष अद्‌भूत व अद्वितीय होता. त्यामुळे हे घडू शकले.

सभापती महोदय, या राज्यामध्ये अनेक मुख्यमंत्री झाले. शाहू-फुले-आंबेडकर यांचे नाव घेऊन त्यांनी राज्यकारभार केला. परंतु अत्यंत संयमाने, आपणा सर्वांचे संघर्ष अंगावर घेत, सर्वांना शांत करुन सांभाळत आणि केंद्रामध्ये आपली पत वापरुन माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी यशस्वीरित्या हे काम केलेले आहे म्हणून ते खरे मानकरी आहेत हे आपणास स्वीकारावे लागेल. आदरणीय श्री.शरद पवार साहेब इतकी वर्षे दिल्लीमध्ये असताना देखील त्यांनी आपला रोख आाणि आपली पत वापरली असती तर, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेब आज माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांना दिल्लीमध्ये खेटे मारण्याची वेळ आली नसती. हा टीकेचा भाग नाही.

सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सांगू इच्छितो आणि मला ती गोष्ट येथे सांगण्यास अभिमान वाटतो. मला खोलीत अभ्यासाला जागा मिळत नव्हती तेव्हा मी सकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्तूपाच्या सावलीमध्ये अभ्यास करायला जायचो. माझ्या आयुष्यातील अनेक वर्षे मी त्या स्तूपाजवळ काढली आहेत. त्या स्तूपाच्या सावलीत बसून मी अभ्यास केलेला आहे. अनेक विद्यार्थी सकाळी अभ्यास करण्यासाठी तेथे यायचे.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या स्तूपाभोवती सर्व वाळू होती. त्या ठिकाणी दलित बांधव वंदन करण्यासाठी येत होते. परंतु त्या ठिकाणी बरीच अस्वच्छता होती आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्तूपाभोवती सुशोभिकरण केव्हा करणार या संबंधीच्या बातम्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

रोज वर्तमानपत्रातून येत होत्या. तेव्हा माननीय शिवसेना प्रमुखांनी मला बोलावून सांगितले की, "दिवाकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्तूपा भोवती असलेल्या अस्वच्छतेच्या बातम्या रोज वर्तमानपत्रातून येत आहेत. ती जागा मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील आहे. तेव्हा तू त्या ठिकाणी सुशोभिकरण करुन घे." मी त्यावेळी मुंबई महानगरपालिकेचा महापौर होतो. मी लगेच सुशोभिकरण करण्यासाठी श्री.शशी प्रभू यांची नियुक्त करुन 10 कोटी रुपये मंजूर केले. तेथे सुशोभिकरण झाल्यानंतर डिसेंबर, 1991 मध्ये माझ्या अध्यक्षतेखाली त्याचे उद्‌घाटन झाले. तेव्हा आम्ही दूर असलेली माणसे नाही. आदरणीय शिवसेना प्रमुखांनी सांगितल्यानुसार आम्ही सुशोभिकरण करुन घेतले. परंतु त्याचे स्वरुप किती व्यापक असावे अशाप्रकारची संकल्पना कोणीच मांडली नाही. तेथे असलेली मोठी कमान ही मुंबई महानगरपालिकेने केलेली आहे. ही कमान शिवसेनेची सत्ता असताना केलेली आहे.

सभापती महोदय,मी पुन्हा एकदा सांगतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक इंदू मिलच्या जागेत व्हावे अशा प्रकारची कल्पना प्रथम श्री.विजय कांबळे यांनी मांडली. ही कल्पना कोणाच्या ध्यानीमनी नव्हती.

सभापती महोदय, या ठिकाणी जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यावर मानननीय मुख्यमंत्री निवेदन करणार आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अगोदरच सांगितलेले आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक करण्याची जबाबदारी राज्य शासनाने घेतलेली आहे. स्मारकासाठी होणारा खर्च राज्य शासन करणार आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने मला एक बाब शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. या पूर्वी शासनाने थोर विभूतींची स्मारके उभारण्यासाठी निधी देण्याची घोषणा केलेली आहे. परंतु निधी काही प्राप्त झाला नाही. संत गाडगे महाराजांपासून संत तुकडोजी महाराजांपर्यंत अनेकांची स्मारके उभारण्यासाठी निधी देण्याची घोषणा शासनाने केली होती. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज यांचे नाशिक येथे स्मारक करण्यासाठी याच सभागृहात पाच कोटी रुपयांची घोषणा करण्यात आली होती. परंतु त्याबाबत पुढे काय झाले ते मला माहीत नाही. तेव्हा आज तिजोरीमध्ये खडखडाट असताना आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे प्रचंड व आतंरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारीत आहोत त्यासाठी निधीची तरतूद, त्याबाबतचे आयोजन, नियोजन कसे करणार आहात हा प्रश्न आहे.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

स्मारक कसे व्हावे या विषयावर तुम्ही आम्ही चर्चा करावी कां? ते ठरविण्याकरिता आंतरराष्ट्रीय दर्जाचे तज्ज्ञ आहेत. ते त्यांच्या पध्दतीने विचार करतील. त्याबाबत सूचना करण्याचा आपल्याला अधिकार आहे, आपण त्या करु शकता. आपल्या सूचना स्वीकारल्या किंवा स्वीकारल्या नाही तरी आपण आपल्या कुवतीप्रमाणे सूचना करु शकता.

सभापती महोदय, माझ्या मनाला नेहमी एक गोष्ट खटकते. या देशामध्ये जी जी उत्तुंग, महान व्यक्तिमत्वे होऊन गेली आहेत त्यामध्ये महात्मा गांधी आहेत, पंडित जवाहरलाल नेहरु आहेत, इंदिरा गांधी आहेत, संजय गांधी आहेत या सर्व उत्तुंग व्यक्तिमत्वांची समाधीस्थळे यमुनातीरी असण्याचे कारण काय? दिल्लीमध्ये आंतरराष्ट्रीय, जागतिक पातळीवरील वेगवेगळया राष्ट्रातील लोक येतात त्यावेळी त्या समाधीस्थळांना आवर्जून भेट देतात, त्यांचे दर्शन घेतात. त्यामुळे त्या समाधीस्थळांना जागतिक आदरांजलीचा सन्मान मिळतो. आपल्या बाबासाहेबांना तो सन्मान कधीच मिळणार नाही. तेथील समाधी्स्थळांच्या पंक्तीमध्ये बाबासाहेबांना बसविण्याइतके त्यांचे मोठेपण होते की नाही? त्याठिकाणी बाबासाहेबांसाठी एखादे समाधीस्थळ असावे की नाही? ही जागतिक पातळीवरील मंडळी दिल्लीच्या त्या समाधीस्थळांना भेट देण्यासाठी जातील त्यानंतर मुंबईमध्ये बाबासाहेबांच्या स्मारकाला भेट देण्यासाठी मुद्दाम येतील का? मुंबईमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे मोठे स्मारक झाल्यानंतर सुध्दा दिल्लीला जागतिक किर्तीच्या मंडळींनी भेट देऊन त्या ठिकाणी माथा टेकून वंदन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाधीस्थळ का नाही? त्या ठिकाणी महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, इंदिराजी गांधी यांच्या समाधी स्थळांच्या शेजारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेही समाधीस्थळ असते तर अण्णा हजारेंनी बाबासाहेबांच्या समाधी स्थळाच्या बाजूला बसून आंदोलनाला सुरुवात केली असती हे सत्य आहे. आज त्या ठिकाणी मराठी माणसाला, मराठी उत्तुंग व्यक्तिमत्वाला सुध्दा जागा मिळत नाही हे आम्हाला वाटत असलेले शल्य योग्य आहे की अयोग्य आहे, चूक आहे की बरोबर आहे याचा आपण विचार करावा परंतु ते सत्य आहे.

सभापती महोदय, माझी शासनाला एकच विनंती आहे की, बाबूजी कीर यांनी दादरच्या स्मशान भूमीसाठी जागा दान केल्यामुळे त्या ठिकाणी आज स्मशानभूमी उभी आहे. त्या स्मशानभूमीमध्ये क्रियाकर्म करण्यासाठी रोज हजारो लोक येतात. त्यांच्या क्रियाकर्मामध्ये कधी कधी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

कारण नसतांना अडथळे आणण्याचा प्रयत्न होत आहे तसा प्रयत्न कृपा करुन करु नका. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संपूर्ण समाजाला या देशामध्ये सन्मान देण्यासाठी बौध्द धर्म स्वीकारला. परंतु त्यांनी आपल्या धर्माच्या विस्ताराची संकल्पना कधीही मांडली नाही. इतर धर्मामध्ये धर्मांतर करण्यासाठी लोकांना बाटविले जाते, त्याप्रमाणे त्यांनी केले नाही. त्यांचा शुध्द हेतू होता की, माझा समाज हिंदुस्थानामध्ये आहे त्याला सन्मान मिळाला पाहिजे या करिता त्यांनी हे केले. त्याचबरोबर इतर धर्माचा सुध्दा आदर झाला पाहिजे या करिता संबंधित नेत्यांनी सुध्दा त्याचा विचार करावा. परंतु आज ज्या पध्दतीने हे लोक वागत आहेत, त्याबाबत बाबासाहेबांनी हिंदू धर्माचा व्देष करण्यासाठी तुम्हाला शिकविले नाहीतर हिंदू धर्मातून त्यांच्या समाजाचा जो व्देष करण्यात आला त्यामधून सन्मानपूर्वक सुटका व्हावी या करिता त्यांनी आपल्या अनुयायांना बौध्द धर्माची दीक्षा देऊन एकप्रकारचा सन्मान देण्याचे काम केले. त्यामुळे त्या सन्मानाचा आदर राखून बाबूजी कीर स्मशान भूमीमध्ये हजारो लोक येतात त्यांच्या क्रियाकर्माचा सन्मान कायम राहिला पाहिजे या करिता मी ही भूमिका मांडीत आहे. त्या स्मशानभूमीमध्ये सुध्दा अतिक्रमण होता कामा नये अशाप्रकारची भूमिका मांडून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक इंदू मिलच्या जागेवर करण्यासंबंधी नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या देशामध्ये दोन लढे झाले, एक स्वातंत्र्याचा लढा आणि दुसरा सामाजिक स्वातंत्र्याचा लढा झाला. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली या देशाला स्वातंत्र्य मिळाले. अत्यंत प्रामाणिकपणे तो लढा लढण्यात आला. या देशामध्ये ब्रिटीशांनी काही काळ राज्य केले. परंतु सामाजिक विषमतेचा लढा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना या देशामध्ये लढावा लागला. या देशामध्ये हजारो वर्षापासून सामाजिक विषमता होती, ती घालविण्यासाठी हा लढा होता. महात्मा ज्योतिबा फुले, त्यानंतर डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांनी हा लढा सक्षमपणे लढविला. या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशाची घटना लिहिण्याचे काम घटना समितीचे चेअरमन म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला अत्यंत चांगली अशाप्रकारची घटना सादर केली.

(यानंतर श्रीमती रणदिवे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे . . . .

एक आंतरराष्ट्रीय किर्तीचे हिस्टोरिअन आहेत, ज्यांनी या भारतीय घटनेचा अभ्यास केला आहे त्या ग्रॅन्डवील ऑस्टीन त्यांनी असे वर्णन केले की, "Indian Constitution is first and foremost social document." संपूर्ण जगामध्ये सोशल डॉक्युमेंट, सर्वात महत्वाचे डॉक्युमेंट म्हणून भारतीय घटनेचा आंतरराष्ट्रीय स्वरुपामध्ये गौरव करण्यात आला. अनेकांना आजही या गोष्टीची माहिती नाही किंवा त्याची समाजामध्ये देखील चर्चा होत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे अत्यंत कुशल अर्थतज्ञ होते. त्यांनी या देशामध्ये रिझर्व बँकेची स्थापना करीत असताना फार महत्वाची भूमिका बजावली आणि हे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेले आहे.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी युनिव्हर्सिटी ऑफ लंडन, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अशा वेगवेगळ्या संस्थांमधून उच्च शिक्षण घेतलेले होते. मला असे आठवते की, आम्ही लहानपणी गावी जात असू. 1965, 1970 च्या वेळी अशी स्थिती होती की, जर आम्ही ब्राम्हणांच्या घरी गेलो तर आतमध्ये प्रवेश करता येत नव्हता. मग घराच्या बाहेर बसूनच काय ते बोलावयाचे अशी स्वरुपाची व्यवस्था होती. अशा वेळी यासंबंधातील लढा सातत्याने सुरु ठेवण्याचे काम, त्याला प्रेरणा देण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे मिळाली आणि या देशात अत्यंत पध्दतशीरपणे व चांगल्या प्रकारे हे काम झालेले आहे. त्यामुळेच आमचे अनेक सहकारी आज सदनामध्ये सन्माननीय सदस्य म्हणून काम करीत आहेत.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक व्हावे यासाठी अनेकांनी प्रयत्न केले.

सभापती महोदय, माननीय श्री.शरद्चंद्रजी पवारसाहेबांनी देखील या स्मारकाच्या बाबतीत आणि या राज्यातील सामाजिक विषमता नष्ट झाली पाहिजे यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्याचे काम केले. हे स्मारक व्हावे म्हणून त्यांनी अनेक वेळेला प्रयत्न केले. तसेच याबाबतीत माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी प्रयत्न केला आहे. याठिकाणी श्री.विजय कांबळेजी यांचा उल्लेख करण्यात आला. सुरुवातीला त्यांनी हा विषय मांडला होता. तसेच श्री.आनंदराज आंबेडकर यांचा देखील उल्लेख झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक व्हावे यासाठी अनेकांनी याबाबतीत प्रयत्न केले. पण मी एक गोष्ट मान्य करतो की, यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची निश्चितच आवश्यकता होती. अशा वेळी यासाठी दलित जनतेचा रेटा व त्या जनतेमध्ये असलेली एकजूट याचा हा खऱ्या अर्थाने विजय आहे असे म्हणावे लागेल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे . . . .

सभापती महोदय, आज आपल्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर नाहीत. परंतु दरवर्षी दिनांक 6 डिसेंबर रोजी संपूर्ण दलित जनता मुंबई शहरामध्ये येत असते आणि आपली एकजूट दाखविते. त्या जनतेचा हा विजय आहे. आता आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक करणार आहोत आणि त्यासाठी इंदू मिलमध्ये साडेबारा एकर इतकी जागा उपलब्ध झाली आहे. पण हे स्मारक कशा पध्दतीचे असावे, त्याठिकाणी काय असावे किंवा काय नसावे याबाबतीत सामान्य जनतेकडून देखील सूचना घ्यावयास पाहिजेत. नाहीतर असे होईल की, आंतरराष्ट्रीय किर्तीचा एखादा आर्कीटेक्ट येऊन त्याने जर आर.सी.सी.इमारत बांधून तेथे स्मारक उभे करण्याचा प्रयत्न केला तर तेही योग्य नाही. त्यामुळे जणुकाही त्या स्मारकाच्या रुपाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर तेथे आहेत अशा प्रकारचा आभास निर्माण करणारे स्मारक तेथे उभे राहिले पाहिजे. तेथे प्रशस्त जागा असली पाहिजे, सामान्य दलित जनतेच्या ज्या आशा-आकांक्षा आहेत आणि त्यांच्या मनामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा आहे, त्याचे प्रतिबिंब या स्मारकामध्ये दिसले पाहिजे आणि तशा स्वरुपाचे स्मारक असले पाहिजे.

सभापती महोदय, विदेशातून महाराष्ट्र राज्यामध्ये अनेक मंडळी येत असतात आणि येथे आल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर पी.एच.डी.करण्याचा,अभ्यास करण्याचा त्यांचा मानस असतो. त्यासाठी त्यांना लागणारे साहित्य देखील तेथे उपलब्ध असले पाहिजे. त्यामुळे सरकारने तेथे चांगल्या प्रकारचे स्मारक उभे करावयास पाहिजे. याठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार उपस्थित आहेत. ते यासाठी पैसे कमी पडू देणार नाहीत याची मला खात्री आहे. सदरहू स्मारक उभारण्यासाठी जेवढ्या निधीची गरज आहे तेवढा निधी ते उपलब्ध करुन देतील अशी आशा आहे. परंतु त्यानंतर देखभालीच्या बाबतीत काय करणार? कारण एखादे स्मारक उभे केल्यानंतर त्याचा जो मेन्टेनन्स असतो तो योग्य प्रकारे केला जात नाही. त्यामुळे कालांतराने अशा स्मारकांची दुर्दशा होते. या राज्यामध्ये माननीय श्री.शरद पवारसाहेबांनी अनेक संस्था उभ्या केल्या. यशंतवराव चव्हाण प्रतिष्ठान उभे केले, नाट्य परिषदेचे संकुल उभे केले, बारामतीमध्ये विद्या प्रतिष्ठान उभे केले अशा अनेक संस्था उभ्या केल्या. परंतु या सगळया संस्था स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. मात्र जर इंदू मिलमधील साडेबारा एकरावरील स्मारक सांभाळावयाचे असेल तर महिन्याला दहा ते पंधरा लाख रुपयांचा खर्च आहे. त्यामुळे हे स्मारक उभे करीत असताना, या ..

जी-3 . . . .





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे . . . .

स्मारकाच्या काही वास्तूमधून कशा प्रकारे उत्पन्न उपलब्ध होईल जेणेकरुन सदरहू स्मारक चांगल्या पध्दतीचे होईल यादृष्टीकोनातून हे स्मारक उभे करावे अशी माझी विनंती आहे आणि त्याबाबत शासन विचार करील अशी मला खात्री आहे. धन्यवाद.

-----

यानंतर श्री.बरवड . . . .

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ( महिला व बालविकास मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाचे अभिनंदन करण्यासाठी मी उभी आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी थोडा वेळ द्यावा अशी विनंती करते. कारण मला काही गोष्टींचा उल्लेख करावयाचा आहे.

**उप सभापती** : आपल्याला दोन तीन मिनिटांचा वेळ देता येईल कारण 11.15 वाजता माननीय मुख्यमंत्री उत्तराचे भाषण करण्यासाठी उभे राहणार आहेत.

प्रा. वर्षा गायकवाड : उद्धरली कोटी फळे, भीमा तुझ्या जन्मामुळे. भारत रत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी इंदू मिलची संपूर्ण जमीन मिळावी हा संपूर्ण जनतेच्या अस्मितेचा प्रश्न झालेला आहे. त्यामुळे मी सर्वांना मनापासून धन्यवाद देते. गेले तीन दिवस मी या प्रस्तावावरील चर्चेत विविध सन्माननीय सदस्यांनी भाषणे ऐकलेली आहेत. ती भाषणे ऐकत असताना मला आनंद वाटला. प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी आपापल्या परीने सूचना केलेल्या आहेत. यामध्ये काही राजकीय भाषणे झाली तसेच काही सन्माननीय सदस्यांनी तांत्रिक बाबींवर चर्चा केली. परंतु मला काही गोष्टी आपल्या निदर्शनास आणून द्यावयाच्या आहेत.

सभापती महोदय, भारताचे पहिले कायदा मंत्री, ऊर्जा मंत्री आणि जलसंपदा मंत्री म्हणून काम करीत असताना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वत: प्रज्ञावान व्यक्ती असताना त्यावेळी त्यांनी अर्थशास्त्र असेल, समाजशास्त्र असेल, राज्यशास्त्र असेल, जमिनीचे राष्ट्रीयीकरण असेल किंवा पाण्याचे राष्ट्रीयीकरण असेल याचा अभ्यास केला होता. म्हणून भाक्रा नांगल धरणाची संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतून आली. माननीय डॉ. नितीन राऊत आणि मी मंत्रिमंडळात आहोत. वॉटर कॉन्झर्वेशनची संकल्पना सुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वप्रथम आणली. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी सांगितले की, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेमध्ये सगळ्यात मोठा वाटा जर कोणाचा असेल तर तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आहे. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिल्टन यंग कमिशनसमोर ही संकल्पना मांडली. हिल्टन यंग कमिशनच्या माध्यमातून जेव्हा रॉयल कमिशन ऑन इंडिया करन्सी ॲण्ड फायनान्स या नावाचे एक कमिशन भारतात आले तेव्हा त्यांच्या हातामध्ये जे पुस्तक होते ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले पुस्तक होते. त्या पुस्तकाचे नाव 'The problems of Rupees, it's origin

RDB/ D/ KTG

प्रा. वर्षा गायकवाड ....

and solution." असे होते. त्या पुस्तकाच्या माध्यमातून रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली, आरबीआय ॲक्ट, 1934 ची निर्मिती झाली. म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्या काळात किती अभ्यास केला होता हे मी आपल्याला सांगू इच्छिते. अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक विजेते श्री. अमर्त्य सेन यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा "Dr. Babasaheb Ambedkar is my father in economics." असा गौरव केला आहे. आपण जर पाहिले तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारतीय घटनेचा कॉर्नविल ऑस्टीन यांनी "First and foremost social document" असा उल्लेख केला आहे.

सभापती महोदय, याच वर्षी हिस्ट्री टीव्ही चॅनेल आणि सीएनएन-आयबीएन लोकमत या वाहिनीने 'दी ग्रेटेस्ट इंडियन' शोधण्याची स्पर्धा आयोजित केली होती. त्यामध्ये सुमारे 2 कोटी पेक्षा जास्त जनतेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ग्रेटेस्ट इंडियनचा पुरस्कार दिलेला आहे. 1946 मध्ये पिपल्स एज्युकेशनच्या सोसायटीच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व लोकांसाठी शिक्षणाची दारे उघडी केली. सिद्धार्थ महाविद्यालय आणि औरंगाबादचे मिलिंद महाविद्यालय पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून सुरु झाले. मिलिंद महाविद्यालय हे मराठवाड्यातील पहिले महाविद्यालय आहे. त्या ठिकाणी युनिव्हर्सिटी काढली. त्या ठिकाणी केवळ मागासवर्गीयच नव्हे तर सर्व मुलांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या माध्यमातून शिक्षणाची दारे खुली झाली. कोलंबिया विद्यापीठाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा "Founding father of modern India and best ever student" असा बहुमान केलेला आहे. आज आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व बघितले तर ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहे. मी या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करते. मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना सुध्दा धन्यवाद देते. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी चांगल्याला चांगले म्हणण्याचा मोठेपणा दाखविलेला आहे.

सभापती महोदय, मला या ठिकाणी सांगावयास पाहिजे की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही माननीय पंतप्रधानांना भेटलो. युपीएच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांना भेटलो. आपण सगळ्यांनी अभिनंदन करावयास पाहिजे की, 5 डिसेंबरला ही इंदू मिलची जागा देण्याचा निर्णय लोकसभेमध्ये वस्त्रोद्योग मंत्री श्री. आनंद शर्मा आणि राज्यसभेमध्ये संसदीय कार्य राज्यमंत्री श्री. राजीव शुक्ला यांनी जाहीर केला. हा आपणा सर्वांच्या दृष्टीने स्वागताचा आणि आनंदाचा क्षण आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ...

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे हेच आपले सर्वांचे स्वप्न आहे. या स्मारकासाठी लागणारा संपूर्ण निधी राज्य शासन उभा करील असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करते. हे स्मारक आंतरराष्ट्रीय दर्जाचे करावयाचे असल्यामुळे आंतरराष्ट्रीय ख्यातीचा कन्सल्टण्ट नेमण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित आहेत. या स्मारकाच्या संदर्भात मी काही सूचना करु इच्छिते. काहींनी सांगितले की, युनिव्हर्सिटी करावी, काहींनी सांगितले की मोठे ग्रंथालय करावे. या गोष्टींचा देखील जरुर विचार व्हावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले आहे की, Knowledge is power. म्हणून त्यांच्या विचाराप्रमाणे या ठिकाणी एक नॉलेज सेंटर होऊन त्यामध्ये डॉ.बाबासाहेबांनी लिहिलेले समग्र वाङमय वाचकांसाठी उपलब्ध करुन ठेवले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक अशा सर्व विषयावर विचार करुन त्या त्या विषयामधील भविष्यातील परिस्थिती कशी असू शकेल यासंबंधी भरपूर ग्रंथ लिहिलेले आहेत. ही त्यांची ग्रंथसंपदा वाचकांना उपलब्ध होण्यासाठी तसेच त्यावर रिसर्च करण्यासाठी एक रिसर्च आणि नॉलेज सेंटर त्याठिकाणी असले पाहिजे.

अमेरिकेमध्ये जॉन केनेडी आणि अब्राहम लिंकन यांचे जीवनपट उलगडवून दाखविणारे मुझि ायम उभे केलेले आहे. त्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजासाठी केलेला संघर्ष, त्यांचा संपूर्ण जीवनपट दर्शविणारी आंतरराष्ट्रीय दर्जाची गॅलरी तेथे असली पाहिजे. गोराई आणि इगतपुरी याठिकाणी जसे मेडिटेशन सेंटर आहे. तसे मेडिटेशन सेंटर बुद्धिस्ट थिम पार्क तेथे करता आले तर तोही विचार करावा. पाली भाषेच्या आणि बुद्ध धर्माच्या अभ्यासासाठी एखादी ॲकॅडमी काढता आली तर त्याचाही विचार करावा. अमेरिकेने घटनेच्या अभ्यासासाठी घटना अभ्यास केंद्र काढलेले आहे. त्या केंद्रामध्ये घटनेचा अभ्यास करता येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाची घटना लिहिली. माणसाला माणसाची वागणूक मिळावी म्हणून त्यांनी संघर्ष केला. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून त्यासंबंधीची चर्चा या सभागृहामध्ये झाली. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये महिलांना असलेल्या दुय्यम स्थानाविरुध्द डॉ.बाबासाहेबांनी संघर्ष केला आणि मनुस्मृतीची जाहीर होळी केली. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून महिलांना रोजगार, शिक्षण, संपत्तीमध्ये समान हक्क दिले....

**उप सभापती** : वेळ फार कमी आहे. अजून दोन सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी फक्त सूचना कराव्यात.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड : सारनाथ, नालंदा, बुद्धगया, थायलंड या ठिकाणी ज्या प्रमाणे डेव्हलपमेंट झालेली आहे तशी डेव्हलपमेंट या ठिकाणी व्हावी. स्टॅच्यू ऑफ इक्वॉलिटीची संकल्पना पुढे आलेली आहे. त्यादृष्टीने देखील विचार व्हावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेले वाक्य सांगून मी माझे भाषण संपविणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वकील होते, प्राध्यापक होते, पंडित होते, अर्थतज्ज्ञ होते, राजतज्ज्ञ होते आणि त्याही पेक्षा ते मोठे देशभक्त होते. त्यांनी सांगितले की, "I am an Indian first and I am an Indian last." एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

----

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले : सन्माननीय सभापती महोदय, माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी मांडलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. मी अधिक लांबलचक भाषण करणार नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांचे उत्तर हे आपणासर्वांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे याची मला जाणीव आहे. म्हणून मी अतिशय थोडक्यात माझे विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे मी मनापासून आभार मानतो. त्यांनी या प्रस्तावावर बोलताना 2 गोष्टींचा आवर्जून उल्लेख केला. एक म्हणजे त्यांनी या सभागृहाचे सदस्य नसलेले सन्माननीय श्री. विजय कांबळे यांचा उल्लेख केला आणि त्यानंतर राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांचा उल्लेख केला. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी आपली सर्व शक्ती पणाला लावली त्यामुळे ही जागा मिळाली अन्यथा हे शक्य नव्हते असे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगून त्यांनी दिलखुलासपणे माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. जेव्हा परदेशातील लोक भारतात येतात त्यावेळी ते भारताची जी ओळख करुन घेण्याचा प्रयत्न करतात त्यामध्ये दोन-तीन महनीय व्यक्तींचा समावेश असतो. ही गौतम बुद्धाची भूमी आहे. 'India and Buddha' असे परदेशी लोक म्हणतात.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.शिगम 11:15

श्री.शरद रणपिसे....

महात्मा गांधीचे नाव घेतले जाते. ज्या ब्रिटीश साम्राज्यशाहीचा कोणी भराभव करु शकत नाही, त्या ब्रिटीश साम्राज्यशाहीला पहिला आणि शेवटचा धक्का देणारा वक्ता म्हणून महात्मा मोहनदास करमचंद गांधी यांचे नाव घेतले जाते. त्याचप्रकारे दलित उध्द्‌राचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले, त्या गोष्टीस जगाच्या इतिहासात तोड नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची ओळख परदेशातील लोक आजही आठवणीने काढतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या बाबतीत बोलताना दलितोध्द्‌ार, राज्य घटना, बौध्द धर्म, लोकशाही, या देशाची एकात्मता असे काही महत्वाचे पैलू आहेत त्या बाबतीत मी अतिशय थोडक्यात माहिती सांगणार आहे.

सभापती महोदय, दलितोद्धार करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना सांगू इच्छितो की, जगामध्ये आजही भेदभाव आहेत. काळा-गोरा, गरीब-श्रीमंत, गुलाम-सावकार असे सगळे भेदभाव आहेत. परंतु दलित व्यक्तीची सावली एखाद्या संवर्णावर पडली तर अस्पृश्यतेचा जो शाप होता, तसा भेदभाव जगाच्या पाठीवर कोठेही पहावयास मिळत नाही. इतिहासातही नाही आणि सद्य:स्थितीतही दिसून येत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितोद्धार करण्याचे काम केले, त्यास तोड नाही.

महोदय,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाची राज्य घटना लिहिली. लोकशाहीचा अधिकार दिला, आपण 1947 रोजी स्वतंत्र झालो. आपल्या बरोबर पाकिस्तान स्वतंत्र झाला, बांगला देश स्वतंत्र झाला. कालांतराने रशियाच्या वर्चस्वाखाली असणारा अफगाणिस्तान स्वतंत्र झाला. अफ्रिका खंडातील काही देश स्वतंत्र झाले. अशिया खंडातील काही देश स्वतंत्र झाले, परंतु लोकशाही कोठेही टिकली नाही. पाकिस्तानमध्ये आज एक पंतप्रधान येतो, दुसऱ्या दिवशी दुसरा पंतप्रधान येतो. पाकिस्तानाच्या पंतप्रधानाना लष्कराचे प्रमुख काय म्हणतात याकडे डोळे लावून पहावे लागते. अफगाणिस्तानात तर तालिबानी राज्य आहे. काही वर्षापूर्वीचे वृत्तपत्र उघडून पाहिले तर तेथील पंतप्रधानांना फाशी देऊन चक्क इलेक्ट्रीक पोलच्या खांबाला लटविलेले चित्र छापून आलेले होते. 63 वर्षानंतरही आपल्या देशातील लोकशाही टिकून राहिली आहे. यासाठीची भक्कम चौकट डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्य घटने मध्ये दिली आहे या गोष्टीस आपण महत्व दिले पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात एकात्मता ठेवण्यामध्ये फार महत्वाचे योगदान दिलेले आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

सभापती महोदय, ज्यावेळी स्वातंत्र्याचा लढा चालू होता. त्यानंतर ब्रिटीशांनी भारताला स्वातंत्र्य देण्याचे ठरविले. त्यावेळी ब्रिटीशांनी "फोडा आणि झोडा" या तत्वाचा अवलंब केला. इंग्लंडला गोलमेज परिषद झाली, त्यात भारतातील तमाम नेत्यांना सांगितले की, ज्यांना स्वतंत्र राष्ट्र पाहिजे असेल, तर ते देण्याची आमची तयारी आहे. बॅ.जीना यांनी पाकिस्तान मागितले. ब्रिटीशांनी डॉ.बाबासाहेबांना सांगितले की, तुम्ही दलितस्तान मागा. एका नवीन राष्ट्राचे प्रमुख व्हा. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ती भूमिका स्वीकारली नाही. माझा जन्म भारतात झाला. माझा मृत्यूही भारतात होईल अशी त्यांची भूमिका होती. या भारतातची एकात्मता आणि एक संघता टिकविण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले या गोष्टीचा मी या ठिकाणी आवर्जून उल्लेख करतो.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला त्याला जगाचा इतिहासात तोड नाही. 20 व्या शतकातील सगळयात मोठा शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन त्यांना संपूर्ण जग मान्य करते. ज्याने अणुचे विभाजन केले, ज्याने प्रकाशाची वेग, गती याच्यावर आधारित सिध्दांत मांडले. त्या अल्बर्ट आईन्स्टाईनचे सगळे जग चाहते आहे. त्या अल्बर्ट आईन्स्टाईनने आपल्या आत्म चरित्रात सांगितले की, धर्म म्हणून मला काही स्वीकारावयाचे असेल तर ते महाकारुणी तथागत गौतम बुध्दाचे तत्वज्ञान आहे. हे अल्बर्ट आईन्स्टाईनने सांगितले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी धम्म दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या विचारांना पंडित जवाहरलाल नेहरु यांची साथ होती. आपली जी संसदीय परंपरा आहे. ज्या सभागृहामध्ये आपण बसलेलो आहोत. त्या सभागृहामध्ये गौतम बुध्दांची काही वचने लिहिलेली आहेत. ती वचने कदाचित तुमच्या आमच्या लक्षात आलेली नसतील.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे.........

सभापती महोदय, आपण ज्या आसनावर बसलेले आहात ते या सभागृहाचे सर्वोच्च आसन आहे. आपल्यासमोर राजदंड आहे. जी राज्य घटनेने शक्ती प्रदान केली त्या शक्तीचे प्रतीक आहे. त्यावर त्रिमूर्ती आहे. सम्राट अशोकाचे चिन्ह असलेली त्रिमूर्ती आणि त्याखाली लिहिले आहे, धम्मचक्र प्रवर्तनाय. हे कोणाच्या लक्षात येत नाही. 10 वर्षापूर्वी एका क्षत्रीय राजपुत्राने विश्वाला Truth of Universe समजले. ज्याने मानव जातीचा, प्राणी जातीच्या कल्याणाचा मार्ग सांगितला त्या धम्मचक्राला 2500 वर्षापूर्वी वाराणसी येथे सुरुवात झाली. त्या धम्मचक्राला अनुसरुन या सभागृहाचे कामकाज चालावे, मानवाच्या कल्याणाचे कामकाज चालावे ही अपेक्षा डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित नेहरु यांची होती. अशा महामानवाचे स्वप्न साकार करणारे आंतरराष्ट्रीय स्वरुपाचे स्मारक उभारण्याचा राज्य सरकारने निर्णय घेतला त्याबद्दल मी सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, विरोधी पक्षातील आमच्या सहकाऱ्यांनी शंका उपस्थित केली की, या स्मारकाच्या उभारणीबद्दल टीडीआर कसा क्लब होणार, एन.टी.सी.ने काय केले? मी सभागृहाला सांगू इच्छितो की, एन.टी.सी.ही टाटा किंवा बिर्लाची कंपनी नाही. तो भारत सरकारचा सार्वजनिक उपक्रम आहे. तुम्ही आम्ही विधानसभेत, लोकसभेत जे कायदे तयार करतो त्या कायद्याच्या आधारेच एन.टी.सी.चा कारभार सुरु आहे. एन.टी.सी.ही एक सार्वजनिक कंपनी आहे. इकडचा पैसा तिकडे गेला काय किंवा इकडचा टीडीआर तिकडे गेला काय, एका अर्थाने ताटातले वाटीत आणि वाटीतले ताटात असाच हा प्रकार आहे. याची चिंता विरोधी पक्षाने बाळगण्याचे कारण नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान कार्यालयात काम केलेले आहे. देशातील विविध राज्यांचा आणि केंद्र सरकारचा कारभार कसा चालतो, जगातील विविध राष्ट्रे आणि भारत देशाचा कारभार कसा चालतो याची उत्तम जाण माननीय मुख्यमंत्र्यांना आहे. त्यांच्यावर या प्रश्नाची जबाबदारी सोपवू. त्यांनी दिलेला शब्द पाळला आहे. 6 डिसेंबरच्या आत इंदू मिलची जमीन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी मिळवून देण्याबाबत त्यांनी शब्द दिला होता, ते अभिवचन त्यांनी पूर्ण केले आहे. मात्र आपण खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना कोटी कोटी प्रणाम करु या एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

-------

..2..

14-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) K.2
SGB/ KTG/ D/पूर्वी श्री.गिते 11:20

श्री.सुमंत गायकवाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या उभारणीसाठी इंदू मिलची जागा देण्यात आली त्याबद्दल या सदनाचे आणि खास करुन माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांचे रिपब्लिकन पक्षाच्या वतीने खास अभिनंदन करतो. मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. आभार एवढ्यासाठी मानतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाची घटना लिहिली. त्या घटनाकाराच्या स्मारकासाठी 56 वर्षानंतर जागा उपलब्ध झाली आहे.

सभापती महोदय, या महामानवाची महती सांगून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. 56 वर्षानंतर स्मारकासाठी जागा उपलब्ध झाली आहे, त्यामुळे यापुढे किती कालावधीत स्मारक उभे राहील याबद्दल चिंता वाटते. नामांतराचा लढा या महाराष्ट्रामध्ये झाला होता. एकमत व्हावे म्हणून आम्ही अनेकांना भेटलो होतो. या प्रश्नाबाबत सर्वांचे एकमत व्हावे म्हणूनच..............

नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुमंत गायकवाड ....

शिवशक्ती व भीमशक्तीच्या नावाखाली माननीय कै.बाळासाहेब ठाकरे यांनी देखील इंदू मिलच्या जागेला पाठींबा दिला होता. आमच्या पक्षाचे अध्यक्ष माननीय श्री. रामदासजी आठवले देशाचे कृषी मंत्री, महाराष्ट्राचे लोकप्रिय नेते श्री.शरदचंद्र पवार साहेबांना जाऊन भेटले. माननीय पवार साहेब हे माननीय रामदासजी आठवले यांचे जुने मित्र आहेत. त्यांनी या प्रकरणामध्ये मध्यस्थी केली. आपल्या माननीय मुख्यमंत्र्यांचे दिल्लीमध्ये फार वजन असल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचा प्रश्न मार्गी लागल्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देतो.

भाजपाचे सन्माननीय सदस्य ॲड. शेलार साहेब यांनी बोलतांना सांगितले होते की, स्मारकाच्या संदर्भात टीडीआरचा काही तरी प्रश्न आहे. मुख्यमंत्री महोदय या ठिकाणी बसलेले आहेत त्यामुळे मी त्यांना विचारु इच्छितो की, स्मारकासाठी आपल्याला खरोखरच जागा मिळाली आहे ना ? नाही तर टीडीआरच्या नावाखाली आणखीन काही तरी होईल. या प्रसंगी मला एवढेच सांगावयाचे आहे की, महाराष्ट्र सरकार स्मारकाचा सर्व खर्च करणार आहे. स्मारकाच्या संदर्भात सर्व लोक सूचना करतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्यदिव्य स्वरुपाचे आंतरराष्ट्रीय स्मारक शक्य तेवढया लवकर आम्हाला पहावयास मिळेल, अशी आशा व्यक्त करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

----------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, इंदू मिलच्या जागेवर पूजनीय महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाच्या संदर्भातील प्रस्ताव सभागृहासमोर आला आहे. त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आम्ही विरोधी पक्ष सदस्यांनी सिंचनाच्या संदर्भात एसआयटी मार्फत चौकशी व्हावी, असा आग्रह धरलेला असतांना सुध्दा या विषयावर सभागृह बंद पाडले नाही. आम्ही प्रश्नोत्तराचा तास वगळता सभागृहात इतर कामकाज होऊ दिले नाही. मात्र तशा स्वरुपाची भूमिका आम्ही सदर विषयाच्या संदर्भात घेतली नाही. स्मारकाच्या संदर्भातील विषय हा महत्वाचा असल्यामुळे त्यावर चर्चा होणे आवश्यक आहे. स्मारकाचा विषय हा महाराष्ट्राच्या जनतेसाठी गौरवाचा विषय आहे. महाराष्ट्रात पूजनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक होत आहे, ही आपल्यासाठी फार आंनदाची गोष्ट आहे. गेल्या तीन दिवसापासून या सभागृहात आपण स्मारकाच्या संदर्भात चर्चा करीत आहोत. या चर्चेला आज माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहे. या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी पूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेकरांचे विचार मांडले, काहींनी श्रेयाच्या संदर्भात विचार मांडले. या विषयाच्या संदर्भात श्री. विजय कांबळे, श्री.आनंदराव आंबेडकर, माननीय श्री.रामदासजी आठवले यांनी प्रयत्न केले. मात्र पूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचे हे खरे श्रेय आहे, असे मला वाटते. तसेच माननीय मुख्यमंत्र्यांनी स्मारकासाठी जे प्रयत्न केले ते अभिनंदनीय आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री. सुमंत गायकवाड यांनी म्हटले की, माननीय मुख्यमंत्र्यांचे दिल्लीत प्रचंड वजन आहे. स्मारकासाठी प्रयत्न करणाऱ्या माननीय मुख्यमंत्र्यांचे दिल्लीत वजन असतानाही त्यांना एवढा संघर्ष करावा लागला, याची मनाला कोठे तरी खंत वाटते.

या सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी मागील वर्षीच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात म्हणजे दिनांक 20.12.2011 रोजी स्मारकाच्या संदर्भात निवेदन केले होते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

निवेदनात माननीय मुख्यमंत्री म्हणतात की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची स्मृती अजरामर रहावी याचा विचार देशातीलच नव्हे तर जगातील बहुसंख्य लोकांच्या मनात असेल. ज्या ठिकाणी शोषित समाज आहे त्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक प्रेरणा मिळावी म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक व्हावे असे आपणा सर्वांचे मत आहे आणि चैत्यभूमीच्या विकासाचा एक भाग म्हणून एनटीसीच्या मालकीची सुमारे साडेबारा एकर जमीन राज्य शासनाला विनामूल्य हस्तांतरित करावी. यासंबंधीचा ठराव आपण सर्वांनी मिळून एकमताने पारित देखील केला.

मी सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांना सांगू इच्छितो की, ताटात काय आहे, वाटीत काय आहे याला महत्व नाही. शेवटी भावना महत्त्वाच्या असतात. त्या भावनांचा आदर झाला पाहिजे. ताटात काय आणि वाटीत काय.... एकच होते ना. त्या भावनांचा आदर करून सर्वपक्षीय शिष्टमंडळाने दिल्लीला माननीय पंतप्रधानांना भेटायचे ठरवले. मी कोकणाच्या दौऱ्यावर असताना रात्री 10.00 वाजता मुख्यमंत्री कार्यालयातून फोन आला. आम्ही कोकणातून धावत धावत मुंबईला आलो आणि एक फ्लाईट पकडले. नेमके आमचे फ्लाईट दिल्लीत उतरले. बाकी सगळ्या मंत्र्यांची फ्लाईटस् जयपूरला डायव्हर्ट झालीत. ज्यांची प्रामाणिक इच्छा होती त्यांचे फ्लाईट दिल्लीला लँड झाले. शेवटी हा योगायोग असतो. काही संकेत असतात. ठरल्या वेळी आमचे फ्लाईट लँड झाले. कदाचित ते पूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संकेत असतील. ज्याला खऱ्या भावना आहेत त्याचे विमान लँड झाले. त्या विमानामध्ये सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे देखील होते. त्यांच्याही भावना प्रामाणिक होत्या. बाकीची विमाने डायव्हर्ट झाली व ती दुसऱ्या दिवशी आली.

मला येथे माननीय पंतप्रधानांचे देखील अभिनंदन केले पाहिजे. त्या बैठकीत त्यांनी विषय समजून घेतला व लगेचच त्यांनी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांना या विषयासंबंधातील तात्विक मान्यता दिली. तात्विक मान्यता दिल्यानंतर वस्त्रोद्योग विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची चर्चा सुरू होती. त्या अधिकाऱ्यांना माननीय मुख्यमंत्री समजाविण्याचा प्रयत्न करीत होते. त्याचे मला दु:ख झाले, हे सन्माननीय सदस्य श्री.रणपिसे साहेबांनी लक्षात घ्यावे. खरेच ही जमीन एनटीसीची आहे काय, त्यांनी पैसे देऊन ही जमीन घेतली आहे काय ? त्यातील वास्तव काय आहे हे मी आपणास सांगतो. 48414.83 चौरस मीटर जागा असल्याचे प्रॉपर्टी कार्डवर नमूद आहे. आपण 1400 कोटी

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

रूपयांचा टीडीआर दिला आहे. आपण 14000 कोटी रूपये दिले तरी ते स्मारक आम्हाला हवे असल्यामुळे ते देण्यास तयार आहोत.

यात भावनांचा मुद्दा इतकाच आहे की, मूळात ही जागा इ.डी.ससून अँड कंपनीच्या मालकीची होती. त्यांनी खरेदी खत 23 एप्रिल 1917 आणि 27 मार्च 1922 रोजी केले होते. त्यानुसार ही जागा मेयर इलायसिस ससून, एडवर्ड इलायसिस ससून, एलिव्हिक्टर ससून, अब्राहम रेग्मंड, यांच्याकडे आली. नगररचना 4 ची दिनांक 28 फेब्रुवारी 1963 रोजी योजना घोषित झाली असून ती योजना ताबडतोब अंमलात आली. ही जमीन केंद्र शासनानकडे सिक टेक्स्टाईल अंडरटेकींग नॅशनलायझेशन ॲक्ट 1974 कलम 3 आणि 4 नुसार, दिनांक 13 मार्च 1975 च्या आदेशाने एनटीसी महाराष्ट्र नॉर्थ लिमिटेड यांच्या नावे दाखल झाली. सदरची जागा ही खाजगी मालकाकडून हस्तांतरित करताना कोणताही मोबदला दिला गेला नाही. केंद्र सरकारने या जमिनीसाठी पैसे दिले होते काय ? तर नाही. हा जो ॲक्ट आला होता त्यामुळे त्यांना ती जागा मिळाली. जी जागा त्यांना फुकटात मिळाली त्या जागेसाठी पैसे कसे काय देता ? एनटीसी, येथील जमीन विकत असताना त्यांनी ते पैसे तेथे का न्यावे, हा आमचा मनापासूनचा प्रश्न आहे. ही जागा त्यांना फुकटात मिळाली आहे. त्या जागेसाठी आमचे पैसे मोजले जाणार असतील तर तेवढ्या पुरतेच आमचे ताटातील आणि वाटीतील आहे. शेवटी आमच्या देखील भावना आहेत.

सभापती महोदय, स्मारके तर खूप झाली आहेत. राष्ट्रपिता म.गांधी यांचे स्मारक झाले. देशाचे पहिले पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरू यांचे स्मारक झाले. स्व.इंदिरा गांधी यांचे स्मारक झाले. श्री.संजय गांधी हे तर खासदार होते. त्यांचे देखील स्मारक शांती वनच्या शेजारी आहे. त्याच्या शेजारी माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचे स्मारक आहे. माजी राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग, डॉ.शंकर दयाळ शर्मा यांची देखील स्मारके झाली. पण ती विना पैशाने झालेली आहेत.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

परंतु परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी आम्हाला पैसे मोजावे लागतात हा भावनेचा मुद्दा आहे. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यात संघर्ष केलाच, परंतु त्यांच्या स्मारकासाठी देखील संघर्ष् करावा लागतो, याचे आम्हाला दु:ख आहे. इंदू मिलची जागा मिळण्यासाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी यशस्वीपणे संघर्ष केला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. पण हायकमांडमध्ये पहिल्या चारमध्ये असलेल्या माणसाला परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी संघर्ष् करावा लागतो हे मनाला पटत नाही. त्यामुळे विरोधी पक्षांनी तेवढ्या पुरत्या भावना व्यक्त केल्या होत्या. परंतु आता स्मारक होत आहे. राज्य शासन टी.डी.आर.मध्ये सुधारणा करुन स्मारकासाठी जागा देऊ शकते.

सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्या प्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक करावयाचे असेल तर त्या विषयातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली हे काम केले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याबाबत देखील घोषणा करण्यात आली होती. हा विषय जेव्हा सभागृहात चर्चेला आला तेव्हा समजले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडे एक साधा फॉर्म भरुन पाठवावयाचा असतो, तो देखील पाठविलेला नाही. तो विषय अजून प्रलंबित आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडताना सांगितले की, त्या ठिकाणी विपश्यना केंद्र असावे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, तेथे विश्व विद्यालय झाले पाहिजे. त्या ठिकाणच्या फक्त 9 टक्के जागेचा वापर होणार असून 91 टक्के जागा मोकळी राहणार आहे. त्या ठिकाणी जर हॉटेल झाले असते तर तेथे टोलेजंग इमारत झाली असती. परंतु आता तेथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक होणार असल्यामुळे तेथे कॉंक्रिटचे जंगल होणार नाही. त्या ठिकाणी मोकळी जागा राहिल्यामुळे तेथे झाडे लावून ती जागा हिरवळ केल्यास तेथील लोकांना ऑक्सिजन मिळेल हे आपण अधिक फोकस करण्याची गरज आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कन्स्ट्रक्शन होणार आणि तेथे अजून गर्दी होणार अशी त्या परिसरातील लोकांची मानसिकता झालेली आहे, ती दूर केली पाहिजे. त्यांना सांगितले पाहिजे की, असे काही तेथे होणार नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या दिवशी आणि महापरिनिर्वाण दिनाच्या

..2.

श्री.विनोद तावडे..

दिवशी लाखो दलित बांधव येतात त्यांच्यासाठी त्या मोकळ्या जागेमध्ये बसण्यासाठी तसेच वन भोजनासाठी व्यवस्था करता येईल. यापूर्वी अशी व्यवस्था मुंबई महानगरपालिकेतर्फे करण्यात येत होती. परंतु आता त्या ठिकाणी कायम स्वरुपी तशी व्यवस्था करता येईल असे पहावे.

सभापती महोदय, माझ्या माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे दोन मागण्या आहेत. त्यातील पहिली मागणी म्हणजे परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी जी जी आंदोलने झाली त्या आंदोलकांवर ज्या केसेस झाल्या, त्या केसेस मागे घेतल्या आहेत अशा प्रकारची घोषणा आपण आजच करावी. कारण ही आंदोलने त्यांनी स्मारकासाठी केलेली आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या प्रयत्नाला यश आले आणि त्यांचे श्रेय आम्ही मान्य केलेले आहे. तरी देखील यामध्ये आंदोलनकर्त्यांचा देखील खारीचा वाटा आहे. मुंबई आणि ठाणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत युतीची सत्ता येण्यास त्यांचा देखील खारीचा वाटा होता. तेव्हा आंदोलनकर्त्यांवरील केसेस मागे घ्याव्यात अशी माझी विनंती आहे. काही ठिकाणी खूपच हिंसा झाली असली तरी त्यामध्ये देखील एक मार्ग असतो. तेव्हा आपण त्याबाबतीत मार्ग काढावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, माझी दुसरी मागणी आहे की, ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी देखील केलेला आहे. अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली होती. या घोषणेस आठ वर्षे झाली. ज्यांनी ही घोषणा केली आणि ती घोषणा ते आता पूर्ण करु शकत नसतील तर त्यांनाच अरबी समुद्रात नेऊन उभे करावे लागेल. तेव्हा माझी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, कुलाबा येथे मुकेश मिल आहे. ती जागा समुद्र किनारी आहे, त्या ठिकाणी आपणास छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे करता येईल. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक करण्याबाबत सरकारने घोषणा केलेली आहे. ही घोषणा आपणास अशाप्रकारे पूर्ण करता येईल एवढेच या निमित्ताने सांगतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----------

यानंतर श्री.सरफरे..

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी चर्चा उपस्थित केली. या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी महत्वपूर्ण सूचना केल्या. या चर्चेमध्ये माननीय सदस्यांनी संबंधितांचे अभिनंदन केले आणि ज्यांनी ज्यांनी यासाठी संघर्ष केला किंवा स्मारकासाठी प्रयत्न केले त्यांचा नामोल्लेख केला.

हे स्मारक कार्यान्वित करण्यासाठी अनेक सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाच्या सूचना केल्या. या स्मारकाचे व्यवस्थापन कशाप्रकारे केले पाहिजे यासंबंधी त्यांनी सूचना केल्या. सन्माननीय सदस्य सर्वश्री विजय गिरकर, ॲड.जयदेव गायकवाड, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री. माणिकराव ठाकरे, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री राम पडांगळे, भाई जगताप, चंद्रकांत पाटील, संजय दत्त, हेमंत टकले, कपिल पाटील, सन्माननीय सदस्या सर्वश्रीमती अलका देसाई, विद्या चव्हाण, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले, सर्वश्री. विनायक मेटे, दिवाकर रावते, प्रकाश बिनसाळे, सुमंत गायकवाड, शरद रणपिसे आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी अतिशय मोलाच्या व चांगल्या सूचना केल्या. या सर्वांना मी मन:पूर्वक धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सुरुवातीला चैत्यभूमीच्या ठिकाणी असणाऱ्या स्मारकाचे सुशोभिकरण करावे अशाप्रकारची सूचना करण्यात आली होती. त्या ठिकाणी 6 डिसेंबर रोजी लाखोंच्या संख्येने लोक येतात, त्या येणाऱ्या भाविकांची सोय व्हावी, त्यांचा येण्याचा व जाण्याचा रस्ता वेगवेगळा असावा या करिता सन 2005 मध्ये एका सुकाणू समितीची स्थापना झाली. त्या समितीने काही सूचना केल्या होत्या. त्यामध्ये पहिला टप्पा, दुसरा टप्पा आणि तिसरा टप्पा कसा करावयाचा या संदर्भात सूचना करण्यात आल्या. त्यानंतर या समितीची अनेक वर्षे बैठक झाली नाही. काही दिवसापूर्वी सुकाणू समितीची पुन्हा बैठक घेण्यात आली त्यामध्ये अस्तित्वात असलेल्या स्मारकाच्या सुशोभिकरणाचे जे अनेक टप्पे आहेत त्या बाबत पुढील काम कशाप्रकारे करावे याबाबतचा विषय घेण्यात आला. हे करीत असतांना जवळच असलेल्या इंदू मिल नामक युनायटेड इंडिया मिलच्या जागेचा विषय पुढे आला. त्या मिलची असलेली साडे बारा एकर इतकी सर्वच्या सर्व जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक करण्याकरिता मिळवावी आणि त्या ठिकाणी ते स्मारक उभे करावे अशाप्रकारची एक मागणी पुढे आली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

14-12-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) O 2

DGS/ MMP/ D/ 11:40

श्री. पृथ्वीराज चव्हाण.....

सुरुवातीला साडे बारा एकरपैकी एक एकर जागा आपण वापरु असे ठरले. त्यानंतर पूर्वीच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी एक तृतीयांश जागा स्मारकासाठी वापरु आणि दोन तृतीयांश जागा मिलकडे ठेवू अशाप्रकारचा प्रस्ताव आणला होता. माझ्याकडे देखील तशाप्रकारचा प्रस्ताव आला होता आणि त्याकरिता मी देखील एक बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये पूर्वीच्या बैठकींचे मिनिट्स पाहिले तर त्यामध्ये एक तृतीयांश, दोन ततीयांश जागा द्यावी यासंबंधी घेतलेला निर्णय माझ्यासमोर आला. याबाबत सभागृहामध्ये अनेक वेळा प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्याकरिता अनेक शिष्टमंडळे देखील मला भेटली. अनेक राजकीय पक्षाच्या नेत्यांबरोबर आणि आमच्या आघाडी सरकारमधील सहकाऱ्यांबरोबर चर्चा झाली, माननीय उप मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा झाली. त्यानंतर सर्वांनी मिळून ठरविले की, यामध्ये काटकसर, वाटाघाटी, घासाघीस करण्यात अर्थ नाही. सर्वच्या सर्व साडेबारा एकर जागेवर भव्य स्मारक झाले पाहिजे असे आम्हा सर्वांचे याबाबत एकमत झाले. त्याप्रमाणे नागपूरच्या विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये दिनांक 20.12.2011 रोजी चर्चा होऊन सर्वानुमते असा ठराव संमत केला की, ही संपूर्ण जागा....

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी याठिकाणी सांगू इच्छितो की, सभागृहाची बैठक सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर आणि या विषयावरील चर्चा पूर्ण होईपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, विधान परिषद आणि विधान सभा या दोन्ही सभागृहांनी दिनांक 20 डिसेंबर 2011 रोजी नागपूर येथे एकमताने ठराव केला होता. तो सभागृहाचा ठरावच नव्हे तर महाराष्ट्रातील साडेअकरा कोटी जनतेचा जनादेश घेऊन आम्ही माननीय पंतप्रधान कार्यालयाला विनंती केली की, आमच्या सर्वपक्षीय शिष्ट मंडळाला भेट द्यावी. सदरहू भेटीची वेळ उशिरा कळल्यामुळे थोडा त्रास, गैरसोय झाली ही वस्तुस्थिती आहे. परंतु 31 डिसेंबर 2011 रोजी आम्हाला भेटीची वेळ मिळाल्यानंतर सर्व पक्षीय शिष्टमंडळ माननीय पंतप्रधान यांना जाऊन भेटले. त्या भेटीच्या वेळी माननीय पंतप्रधानांनी माननीय केंद्रीय वस्त्रोद्योग विभागाच्या मंत्री महोदयांना देखील बोलाविले होते. त्यांच्यासमोर या विषयाच्या संबंधातील मागणी, विधी मंडळामध्ये एकमताने करण्यात आलेल्या ठरावाच्या प्रती देण्यात आल्या, माहिती देण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांना सदरहू कामाचा नकाशा दाखविण्यात आला. तसेच या जागेच्या माहिती आणि मालकीच्या संबंधातील कागदपत्रे देण्यात आली.

सभापती महोदय, अर्थात याबाबत पूर्वी चर्चा झाली होती. मात्र त्याच बैठकीमध्ये माननीय पंतप्रधान यांनी ही जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक करण्यासाठी देण्याबाबत तत्वत: मान्यता दिली आणि अशा प्रकारे माननीय पंतप्रधान यांनी खऱ्या अर्थाने ही जागा देण्याच्या बाबतीत तत्वत: निर्णय घेतला. परंतु त्यामध्ये मालकीच्या संबंधातील ज्या कायदेशीर अडचणी होत्या त्या सोडविण्यासाठी त्यांनी असे आदेश दिले की, राज्य शासनाच्या आणि केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग विभागाने एका संयुक्त समितीचे गठन करावे.त्याप्रमाणे लगेच महिन्याभरामध्ये वस्त्रोद्योग सचिवांच्या अध्यक्षतेखाली या समितीचे गठन करण्यात आले. त्यामध्ये केंद्र शासनाचे तीन अधिकारी आणि राज्य शासनाचे तीन अधिकारी असतील.त्यामध्ये राज्याचे मुख्य सचिव, नगरविकास विभागाचे सचिव आणि मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त असे तीन सदस्य असतील आणि केंद्र शासनाचे तीन सदस्य असतील आणि या समितीचे वस्त्रोद्योग सचिव अध्यक्ष असतील अशी एक समिती नेमण्यात आली. या समितीच्या काही बैठका झाल्या. त्यातील दोन बैठकांच्या वेळेस मी स्वत: हजर होतो आणि त्यावेळी सर्व सदस्यांसमोर मी देखील आमचे म्हणणे मांडले होते. या सगळ्या प्रक्रियेमध्ये जरी सर्वसामान्यपणे आपल्याला असे वाटले की, ही केंद्र सरकारची जमीन आहे, परंतु त्यामध्ये ...

. . . .पी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण . . . .

तांत्रिक अडचणी अशा होत्या की, आज टेक्सटाईल मिल आजारी आहेत. नॅशनलायझेशन ॲक्ट प्रमाणे ही जमीन केंद्र शासनाने नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशनला दिली होती. मात्र ही जमीन विनामूल्य दिली होती की पैसे घेतले होते हा मुद्दा नाही पण तो भारताच्या संसदेने पारित केलेला कायदा होता. त्यामुळे त्याबाबत किती पैसे दिले, कोणी दिले हा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे ही मिलची जागा झाली. ही जागा मुंबईतील कापड गिरण्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी तेथील सर्व मालमत्तेचे मग त्यामध्ये मशिनरी असेल, जमीन असेल किंवा ज्या मिल सुरु असतील त्या सर्वांचा वापर करावा यादृष्टीने तेव्हा सर्व कापड गिरण्यांचे राष्ट्रीयीकरण झाले होते. म्हणून तांत्रिकदृष्ट्या ही जमीन राष्ट्रीय वस्त्रो्द्योग महामंडळाची नाही तर कंपनीची होती.

सभापती महोदय, आपण याबाबतीत काहीही म्हटले तरी सरकार आणि कंपनी यामध्ये असलेला फरक आपण सर्वजण जाणताच. पण कंपनी आजारी होती. मुळातच आजारी गिरण्यांच्या बाबतीत केंद्र शासनाने बी.आय.एफ.आर.चा कायदा केला आहे.त्या कायद्यान्वये सगळया नॅशनल टेक्सटाईल मिलच्या बाबतीत सांगावयाचे तर कोणत्याही मालमत्तेची विल्हेवाट लावण्याकरता बी.आय.एफ.आर.ची मंजुरी आवश्यक असते. हा भारताचा कायदा आहे. त्यामुळे जरी आपल्या काही भावना असल्यातरी त्या कायद्याला गृहीत धरुन त्याच्या अनुषंगानेच पुढे जाणे भाग होते.

सभापती महोदय, दुसरी अडचण अशी आहे की, ही जमीन समुद्र किनाऱ्यावर असल्यामुळे कोस्टल रेग्युलेटरी झोनचे नियम देखील याला लागू होतात आणि आपल्याला माहिती आहे की, भारताच्या संसदेने पर्यावरणाच्या बाबतीत जो कायदा केला आहे, त्या अंतर्गत कोस्टल रेग्युलेटरी झोनचे जे नियम आहे ते आपण अत्यंत कडकपणे, शिस्तीने पाळतो. त्यामुळे त्या अधिनियमामध्ये बदल करण्याची गरज होती.

यानंतर श्री.बरचड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

त्यामध्ये जे काही आरक्षण होते ते आरक्षण बदलून त्या ठिकाणी जागेचा वापर करता आला पाहिजे, स्मारक उभे करता आले पाहिजे अशा अडचणी होत्या. त्या सर्व अडचणींच्या बाबतीत आमच्या अधिकाऱ्यांनी अनेक बैठका पर्यावरण मंत्र्यांसमवेत, वस्त्रोद्योग मंत्र्यांच्या समवेत घेतल्या. मी स्वत: देखील पर्यावरण मंत्र्यांना भेटलो. तेथील आरक्षण बदलण्यासाठी सीआरझेड कायद्याने बंदी आहे. त्यामुळे पहिल्यांदा तेथील आरक्षण बदलण्याची पर्यावरण मंत्रालयाकडून परवानगी घ्यावी लागली. ती मंजुरी त्यांनी दिली. त्यांनी फक्त एकच अट घातली की, त्या ठिकाणी कोणताही कमर्शियल वापर होणार नाही याचे आश्वासन राज्य सरकारने दिले पाहिजे. त्यांना अशा प्रकारे सांगण्यात आले की, आता त्या ठिकाणचे आरक्षणच बदलण्यात येईल आणि आरक्षण बदलताना त्या ठिकाणी जे इंडस्ट्रीयल आरक्षण आहे ते बदलून रेसिडेंशियल करुन स्पेसिफिकली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक असेच आरक्षण टाकण्यात येईल. म्हणजे त्या ठिकाणी इतर कारणासाठी वापर करण्याची शक्यता राहणार नाही.

सभापती महोदय, या सर्व गोष्टी केल्यानंतर पर्यावरण खात्याने मंजुरी दिली आणि आम्हीही आरक्षण बदलले. मध्येच पुन्हा एक प्रश्न निर्माण झाला. आमचे असे म्हणणे होते की, या जागेवर इंडस्ट्रीयल थ्री असे आरक्षण असल्यामुळे त्या ठिकाणी इतर कोणत्याही कारणासाठी वापर करता येणार नाही. नंतर वस्त्रोद्योग महामंडळाने एक बाब माझ्या लक्षात आणून दिली. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी उल्लेख केल्याप्रमाणे अशाच प्रकारच्या शेजारच्या हिंदुस्थान मिलच्या जागेवर हॉटेल बांधण्याची परवानगी दिली गेली आहे किंवा तत्वत: मान्यता दिली गेली आहे आणि त्या ठिकाणी साडेसहा एफएसआय दिला आणि त्यामुळे आम्हाला असा एफएसआय मिळाला तर त्याची किंमत खूप होईल असा युक्तिवाद राष्ट्रीय महामंडळाने मांडला. मी लगेच मुंबईला आल्यावर कागदपत्रे तपासली आणि ती वस्तुस्थिती होती हे माझ्या लक्षात आले. मी आयुक्तांना विचारले की, शेजारच्या एका जागेवर अशा प्रकारे मंजुरी दिली गेली आहे का ? त्यांनी मंजुरी दिली गेली होती अशा प्रकारची माहिती दिली. परंतु ती मंजुरी रद्द करण्याची कार्यवाही सुरु झालेली आहे असे मागच्या महानगर आयुक्तांनी मला सांगितले. जेव्हा सर्व कागदपत्रे तपासली तेव्हा आम्ही ती दुसऱ्या मिलची हॉटेल बांधण्याची मंजुरी रद्द केली कारण ती कायद्यामध्ये बसत नव्हती. 1967 च्या नियमामध्ये बदल झाल्याचे आमच्या निदर्शनास आले. त्यामुळे एनटीसीचा तोही युक्तिवाद संपला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

त्या ठिकाणी जर हॉटेल बांधले असते तर खूप पैसे मिळाले असते तो मुद्दाही संपला. अशा प्रकारे एक एक टप्पा पूर्ण करत आम्ही बहुतेक सर्व पर्याय केंद्र शासनासमोर ठेवले होते.

या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी सांगितले की, ज्यांनी आंदोलन केले त्यांचाही वाटा आहे. मला नम्रपणे सांगावयाचे आहे की, ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाची चर्चा आज करीत आहोत त्यांनी या देशामध्ये कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्यामध्ये सर्वात मोठी कामगिरी केलेली आहे. त्यांनी आपल्या देशाला लिखित घटना दिली. त्यामुळे हजारो वर्षापासून चालत आलेली जी विषमतेची, असमानतेची, अन्यायाची, शोषणाची परिस्थिती होती ती बदलण्याकरिता मदत झाली. आज नेहमी प्रश्न विचारला जातो की, इतकी वर्षे हा देश बाहेरच्या लोकांनी येऊन का पादाक्रांत केला ? लोक तेच होते, देश तोच होता, तेवढाच भूखंड होता, तेवढीच लोकसंख्या होती, मोठा देश होता, मग मूठभर लोकांनी येऊन त्यावर का अधिराज्य केले, साम्राज्य केले आणि आपल्याला पारतंत्र्यात ठेवले ? त्याचे एकमेव उत्तर माझ्या दृष्टीने असे आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला जी घटना दिली त्या घटनेमुळे आपण लोकशाही राज्य प्रस्थापित केले, कायद्यावर आधारित राज्य प्रस्थापित केले आणि खऱ्या अर्थाने असंख्य तुकड्यांमध्ये, धर्मांमध्ये, जातींमध्ये, पोटजातींमध्ये, विभागांमध्ये, भाषांमध्ये विभागलेला देश एकसंध होण्यामध्ये मदत झाली. एकदा हा देश एकसंघ झाला तर आपल्याकडे वाकडा डोळा करुन पाहण्याची कोणाचीही छाती होणार नाही हे आपण दाखवून दिलेले आहे.

यामध्ये फरक काय होता ? कायद्याने हा देश एकत्र केला गेला. त्यामध्ये श्री. वल्लभभाई पटेल यांचीही महत्वाची भूमिका होती. पण शेवटी आपण जेव्हा लोकशाही मार्गाने राज्य करण्याचा निर्णय घेतला आणि आपले एक संविधान केले. त्या संविधानामध्ये लेखी नियम केले. अनेक देशांमध्ये लिखित संविधान नाही. ज्याला मदर ऑफ डेमॉक्रसी म्हणतो त्या इंग्लंडमध्ये सुध्दा कोणत्याही प्रकारचे लिखित संविधान नाही पण आपण मुद्दाम ते केले. कारण या देशाला लोकशाहीची परंपरा नव्हती. सरंजामशाही राजवट इतके दिवस आपण पाहिली. म्हणून लिखित नियम करणे गरजेचे आहे असे त्या काळच्या नेत्यांना वाटले. त्यामुळे लिखित घटना, लिखित संविधान आपल्यासमोर आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ती महत्वाची भूमिका आपण लक्षात घेतली पाहिजे.

यानंतर श्री. शिगम...

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

एकदा संकल्पना निश्चिती झाली पाहिजे. त्या बाबतीत आपण सगळयांनी एकत्रितपणे चर्चा करु. त्यासाठी वेगळी समिती स्थापन करण्याची आवश्यकता भासली तर त्यासाठी वेगळी समिती स्थापन करु. या बाबतीत संकल्पना निश्चित झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय आर्किटेककडून त्याच्याकडून आरेखक तयार करुन घेऊन आर्किटेक्चरल डिझाईन करुन घेऊ. त्यानंतर त्या स्मारकाची बांधणी करण्याकरिता व त्याचे इम्प्लीमेंटेशन करण्याकरिता तिसरा टप्पा करु.

महोदय, या ठिकाणी बरेच प्रश्न मांडले गेले. तुम्ही बजेटरी तरतूद करा, अमुक करा. काही काळजी करु नका. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री या नात्याने मी आपल्याला आश्वासन देतो, या बाबतीत निधी कमी पडणार नाही, बजेटला मंजुरी दिली नाही, मग निधी सी.आर.फंडातून घेणार का असे प्रश्न कृपा करुन मनामध्ये उपस्थित करु नयेत. या स्मारकाबाबत जी संकल्पना आपण मान्य करु, त्याबाबत जागतिक स्पर्धेमधून जी आंतरराष्ट्रीय आर्किटेक्चरल डिझाईन्स मंजूर होतील ती अंमलात आणण्याकरिता राज्य सरकार जो काही निधी लागेल, जितका लागेल तो द्यायला बिलकूल मागेपुढे पाहणार नाही. फक्त कोणत्या गोष्टीला प्राधान्य दिले पाहिजे हे माझ्या मते महत्वाचे आहे. तेथे आंतरराष्ट्रीय पर्यटक आले पाहिजेत आणि विचाराचा प्रसार झाला पाहिजे.

महोदय,डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामान्य कुटुंबातील व्यक्ती होती. अतिशय खडतर परिस्थितीत त्यांनी शिक्षण घेतले. त्यांना बडोद्याला शिक्षण घेण्याची संधी मिळाली. त्यांना कोलंबिया युनिव्हर्सिटीमध्ये शिक्षण घेण्याची, इंग्लंडमध्ये शिक्षण घेण्याची संधी मिळाली. त्यांनी अमेरिकेतील अश्वेथुनियाचा लढा पाहिला होता. तेथे कशाप्रकारे अन्यायाचा प्रतिकार होतो हे पाहिले. तेथून त्यांनी अनुभव घेतला. इंग्लंडमधील अनुभव घेतला आणि भारतात येऊन विचारांचा प्रचंड मोठा लढा उभा केला, चळवळ उभी केली आणि लाखोंच्या संख्येने अनुयायी उभे केले. त्याचबरोबर सनदशीर मार्गाने संसदेमध्ये बसून संसद सदस्य म्हणून, मंत्री म्हणून घटना समितीचे अध्यक्ष या नात्याने या जगातील महत्वाच्या साहित्याची निर्मिती केली. त्यातून प्रचंड मोठा समतेचा संदेश दिला आणि भारताच्या राष्ट्र उभारणीला मदत झाली. आज आपण एक महाशक्ती म्हणून पुढे आलेलो आहोत याचा मूळ पाया त्या संविधानामध्ये आहे. म्हणून त्या संविधानाचा प्रचार, प्रसार होणे, त्या संविधानातून आपल्या सगळ्यांना प्रेरणा मिळणे, हजारोंच्या संख्येने जे दलित, शोषित, एक्स्प्लॉयटेड क्लासेस आहेत त्यांना प्रेरणा मिळून त्यांनाही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे पुढे येता आले पाहिजे, समाजाचे नेतृत्व करता आले

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

पाहिजे. त्यातून विषमता संपली पाहिजे. संपण्याकरिता मदत झाली पाहिजे. अशा प्रकारचे स्मारक असावे. अशा प्रकारची प्रेरणा घेऊन आपल्याला पुढे जाता आले पाहिजे. अशी संकल्पना आपल्याला करावी लागेल. त्याकरिता मी सभागृहातील सर्व गटनेत्यांचे, राजकीय नेत्यांचे, सभागृहातील आणि सभागृहाच्या बाहेरच्या सामाजिक नेत्यांचे या प्रक्रियेमध्ये सहकार्य अपेक्षित करतो. त्याचबरोबर ज्यांनी या प्रक्रियेला हातभार लावला त्यांचेही या ठिकाणी जाहीरपणे आभार व्यक्त करतो. अशीच सहकार्याची भावना आपण पुढे ठेवू या आणि हे जे स्वप्न आपण उराशी बाळगले आहे ते लवकरात लवकर साकार करु या.

या बाबतीत कालमर्यादा निश्चित करता येणार नाही. परंतु हे तीन टप्पे आपल्याला मान्य असतील तर त्याप्रमाणे आपण पुढे जाऊ. पहिल्यांदा संकल्पना, नंतर डिटेल आर्किटेक्चरल डिझाईन आणि नंतर अंमलबजावणी करता येईल. नंतर व्यवस्थापन कुणी करायचे हा प्रश्न पुढे विचारात घ्यावा लागेल. जागेचे पावित्र्य कसे अबाधित राहील, लाखोंच्या संख्येने जरी लोक आले आणि ते यावेत अशी आमची अपेक्षा आहे. परंतु त्या जागेचे पावित्र्य राखण्याकरिता आपण सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. त्यादृष्टीने मी आश्वासन देतो. पुन्हा एकदा सर्व सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद व्यक्त करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावरील चर्चेचा आजचा तिसरा दिवस आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक आणि फक्त इंदू मिल यानी इतिहासाचे पान लिहिले जाईल. सभापती महोदय, आपले आणि विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे व त्यांचे सर्व सहकारी यांचा मी शतशः आभारी आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तराने आमचे समाधान झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी मुख्यमंत्र्यांना पृथ्वीचा राजा पृथ्वीराज अशी उपमा दिली आहे. मुख्यमंत्री भरभरुन निधी मंजूर करतील. महाराष्ट्र राज्य निधी देईल. परंतु केंद्र सरकारकडून जास्तीत जास्त निधी आणला पाहिजे. तुमची तेवढी ऊंची आहे. देशामध्ये तुमची पत आहे. तुमची केंद्र सरकारमध्ये असलेली पत वापरुन केंद्राकडून जास्तीत जास्त निधी मिळविण्याचा प्रयत्न करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण...........

माननीय मुख्यमंत्री यांनी विधिमंडळाचे अधिवेशन संपण्यापूर्वी आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याबाबत प्राधिकरण स्थापन केल्याची घोषणा करावी आणि या प्राधिकरणाचे अध्यक्षपद त्यांनी स्वत: भूषवावे अशी विनंती करुन मी माननीय मुख्यमंत्र्यांना पुनश्च धन्यवाद देतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आदरणीय मुख्यमंत्र्यांनी अतिशय स्पष्ट उत्तर दिलेले असल्यामुळे आमच्या कोणाच्याही मनामध्ये शंका असण्याचे कारण नाही. येत्या 14 एप्रिलला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आहे. किमान त्या दिवशी इंदू मिलच्या जागेवर स्मारकाच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम व्हावा अशी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी जागा उपलब्ध करुन दिल्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांचे आणि आपणा सर्वांचे मी यापूर्वी मन:पूर्वक अभिनंदन केले आहे. पुनश्च एकदा अभिनंदन करतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याबाबत आम्हाला त्यांचे अभिनंदन करण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी. छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रात स्मारक उभारण्याबाबत केंद्रीय पर्यावरण विभागाकडून काही परवानग्या मिळावयाच्या आहेत. माननीय मुख्यमंत्री केंद्र सरकारमध्ये असलेले आपले वजन वापरुन या परवानग्या मिळवून आम्हाला अभिनंदन करण्याची संधी देतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. महाराष्ट्र आपल्याकडे निर्णयाच्या अपेक्षेने पहात आहे याची आपल्याला देखील कल्पना आहे. आपले वजन केंद्रीय पर्यावरण खात्यामध्ये वापरले तर छत्रपती शिवाजी महाराज निश्चितपणे आपल्या सगळ्यांना आशीर्वाद देतील. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाबद्दल सभागृहाला अवगत करावे अशी विनंती करतो.

**सभापती** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.20 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.07 ते 12.20 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राज्यातील मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळांच्या अध्यक्ष व सदस्यांच्या फेरनियुक्त्या झाल्या नसल्याबाबत**

**(1) * 34679 श्री.सुभाष चव्हाण , श्री.संजय दत्त , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील मागासवर्गीयांसाठीच्या सहा आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षपदांची व सदस्यांची मुदत संपून तीन वर्षे होत आली तरीही नव्या नियुक्त्या झालेल्या नसल्याने अध्यक्ष आणि सदस्य हे फेरनियुक्त्या होईपर्यंत बेकायदा कारभार सांभाळत असल्याचे दिनांक 17 जुलै, 2012 रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, प्रश्न भाग 1 बाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. सचिन अहिर, श्री.शिवाजीराव मोघे यांच्या करिता** : (1), (2) (3) व (4) दि.1/9/2006च्या शासन निर्णयान्वये 5 महामंडळांच्या संचालक मंडळाच्या अध्यक्षांच्या नियुक्त्या पुढील आदेश होईपर्यंत करण्यात आल्या होत्या. त्यांच्या नियुक्तीचा कालावधी समाप्त झाल्याने शासनाच्या दि.18 जुलै.2012 च्या शासन निर्णयान्वये कार्यरत अध्यक्षांच्या नियुक्त्या रदद करण्यात आल्या आहेत.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या अध्यक्षांची नियुक्ती दि.13/8/2012 च्या शासन आदेशान्वये करण्यात आली असून इतर महामंडळाच्या संचालक मंडळाच्या अध्यक्षांच्या व सदस्यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, राज्यातील मागासवर्गीय महामंडळाच्या संदर्भातील हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. राज्यामध्ये एकंदर मागासवर्गीय महामंडळे किती आहेत, कंपनी ॲक्ट प्रमाणे किती महामंडळे कार्यरत आहेत ? कंपनी ॲक्ट प्रमाणे या मागासवर्गीय महामंडळावरील अध्यक्षांची मुदत संपली असेल तर ती त्वरित रद्द केली पाहिजे व त्या जागेवर दुसऱ्या अध्यक्षांची निवड केली पाहिजे. त्यामुळे कंपनी ॲक्ट प्रमाणे महामंडळाच्या अध्यक्षांची पदे आपण रद्द केलेली आहेत काय ? महामंडळाच्या संदर्भात शासनाकडून जो काही प्रकार झालेला आहे तो कायदेशीर झालेला आहे की, बेकायदेशीर झालेला आहे ? मागासवर्गीय महामंडळाच्या अध्यक्षांच्या व सदस्यांच्या आपल्याकडून किती नियुक्त्या झालेल्या आहेत ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:34679......

श्री. सुभाष चव्हाण.....

दि. 18.7.2012 च्या शासन निर्णयान्वये आपण कोणकोणत्या महामंडळाच्या अध्यक्षांच्या नियुक्त्या रद्द केलेल्या आहेत ? तसेच उत्तरामध्ये असेही म्हटले आहे की, "दिनांक 13/8/2012च्या शासन निर्णयानुसार नियुक्त्या विचाराधीन आहेत." त्यामुळे महामंडळाच्या अध्यक्षांच्या तसेच सदस्यांच्या मुदती संपलेल्या असल्यामुळे आपण त्यांच्या नियुक्त्या कधी पर्यंत करणार आहात ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, आपल्याकडे एकंदर 6 मागासवर्गीय समाजाची महामंडळे असून त्यातील 5 महामंडळे कंपनी ॲक्ट प्रमाणे आहेत. महामंडळांच्या संचालकांची तसेच सदस्यांची मुदत संपलेली आहे ही बाब शासनाच्या लक्षात आल्यानंतर या सर्व नियुक्त्या तातडीने रद्द करण्यात आलेल्या आहेत. 2012 साली अण्णाभाऊ साठे महामंडळाची नवीन नियुक्ती करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34679...

श्री.सचिन अहिर....

सन्माननीय सदस्यांनी शेवटी प्रश्न विचारला आहे की, संचालक मंडळाच्या अध्यक्षांचा व सदस्यांचा नियुक्तीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय ? त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, शासनाची लवकरात लवकर नियुक्ती करण्याची भूमिका आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, हा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण आणि इतरांनी विचारलेला आहे. या सभागृहात गेले तीन दिवस डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासंबंधातील चर्चा सुरू होती. मागासलेल्या वर्गाला न्याय देण्याची भूमिका सरकारकडून बजावली जात आहे किंवा नाही असा एक गंभीर प्रश्न या प्रश्नातून निर्माण होत आहे. अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्तीसाठी एवढा कालापव्यय होणार असेल तर तो योग्य नाही. तेव्हा ह्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती होणार कधी व ते कारभार करणार कधी व समाजातील घटकाला न्याय देणार कधी. ही सगळीच प्रक्रिया आपल्याकडून, शासनाकडून गंभीरतेने घेतली पाहिजे ती घेतली गेलेली नाही, असे येथे खेदाने नमूद करावेसे वाटते. तेव्हा आपण ही प्रक्रिया किती दिवसांमध्ये पूर्ण करणार आहात व सन 2013 साल उजाडण्याच्या अगोदर ह्या सर्व नियुक्ता होणार आहेत काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, अध्यक्षांची किंवा सदस्यांची नेमणूक न झाल्यामुळे या मंडळाचे कामकाज आपण थांबविलेले नाही. या महामंडळांवर एम.डी.नेमण्याचे काम आम्ही केले आहे. जे काही प्रस्ताव असतील त्या प्रस्तावांना नियमानुसार मंजुरी देण्याचे काम ते करतात. सन्मानाननीय सदस्यांची सांगितलेली गोष्ट खरी आहे की, लोकांचे प्रतिनिधीत्व करणारा लोकप्रतिनिधी जो पर्यंत महामंडळावर नियुक्त होत नाही, तो पर्यंत खऱ्या अर्थाने लोकाभिमुख काम होणार नाही. या नियुक्त्या तातडीने केल्या जातील. या प्रस्तावाबाबत माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून येत्या तीन महिन्यामध्ये नियुक्त्या करण्यासंबंधी शासन निश्चितपणे प्रयत्न करेल.

ता.प्र.क्र.34679...

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या महामंडळाच्या कामकाजामध्ये कोणताही खंड पडत नाही असे मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. खरा प्रश्न तोच आहे की, कुठल्या कामामध्ये खंड पडत नाही. कार्यकर्त्यांमधून आलेल्यांची या मंडळावर अध्यक्ष व सदस्य म्हणून नियुक्ती केली जाते. पण त्यांची नियुक्ती केली नसल्यामुळे मधल्या काळात महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी स्वत:कडे प्रचंड सत्ता केंद्रीत केली. या अधिकाऱ्यांनी स्वत:कडे सत्ता केंद्रीत केल्यामुळे त्यांची संपूर्ण कार्यप्रणाली तशीच सुरू राहते. अध्यक्ष आणि संचालकांना ते केवळ पेपरवेट एवढेच महत्व देतात व बाकीचे सर्व कामकाज स्वत:च्या मनाने गुंडाळत असतात. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, ताबडतोब नियुक्त्या करण्या बरोबरच आपण या विभागाचे मंत्री म्हणून या महामंडळातील जेवढे म्हणून अधिकारी आहेत, त्यांची गरज पडेल तेथे बदली करण्यासंबंधातील धोरणात्मक निर्णय घेणार आहात काय ? अध्यक्ष आणि संचालक दर दोन वर्षांनी बदलतात. पण एकाच जागेवर 25-25 वर्षे राहणारे अधिकारी वेगवेगळ्या पद्धतीने गैरव्यवहार करीत राहतात. आपण अंतर्गत साफसफाईचे धोरण स्वीकारले तर या महामंडळाचा कारभार काही पद्धतीने सुधारेल. तेव्हा तसा निर्णय आपण घ्याल काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, होय.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी असा प्रश्न विचारला आहे की, नव्या नियुक्त्या झालेल्या नसल्याने अध्यक्ष आणि सदस्य हे बेकायदा कारभार सांभाळत असल्याचे दिनांक 17 जुलै 2012 रोजी उघडकीस आले आहे हे खरे आहे काय ? त्यास मंत्रिमहोदयांनी लेखी उत्तर असे दिले आहे की, शासनाच्या दिनांक 18 जुलै 2012 च्या शासन निर्णयान्वये कार्यरत अध्यक्षांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्यांच्या प्रश्नांचे उत्तर अजूनही स्पष्ट आलेले नाही. 17 जुलै नंतर देखील या महामंडळावर बेकायदेशीररित्या डायरेक्टर म्हणून काही लोक काम करीत आहेत काय ? ज्या पाच महामंडळावरील अध्यक्षांची आणि सदस्यांची नियुक्ती झालेली नाही ती न होण्यामागचे नेमके कारण काय आहे, त्याचा सुद्धा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34679....

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर नाही असे आहे. त्यांनी विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मी या पूर्वीच दिलेले आहे. तरी सुध्दा पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, नियुक्ती करण्यासंबंधी काही निकष असतात त्यानुसारच नियुक्ती करतो. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे हे अधिवेशन संपल्यानंतर माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री महोदय यांच्याशी चर्चा करुन तीन महिन्याच्या आत नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने या महामंडळांसाठी 300 कोटी रुपयांचा निधी जाहीर केला त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. हा निधी महामंडळांकडे वर्ग केलेला आहे. मागील अधिवेशनामध्ये मी प्रश्न उपस्थित केला होता की,या महामंडळांमध्ये अनेक जातींचा समावेश आहे. परंतु निधीचे वाटप मात्र समान प्रमाणात होत नाही. त्यावेळी माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांनी सकारात्मक उत्तर देताना सांगितले होते की, "ज्या ज्या महामंडळामध्ये ज्या ज्या जातींचा समावेश आहे, त्या जातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधीचे वाटप करण्यात येईल." परंतु त्याप्रमाणे अजून समान प्रमाणात वाटपास सुरुवात झालेली नाही. वसंतराव नाईक भटक्या विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळाला कोट्यवधी रुपयांचा निधी मिळतो. परंतु असे असताना देखील सर्व समाजाला समान निधी मिळत नाही. मागील वर्षी समान प्रमाणात निधी देण्यात येईल असे सांगण्यात आले होते. परंतु त्याची अंमलबजावणी झालेली नाही. तेव्हा ज्या महामंडळामध्ये अनेक जाती जमातीच्या, गोरगरीब समाजाच्या जातींचा समावेश आहे त्यांना त्यांच्या जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधीचे वाटप करण्यात येईल काय आणि त्याची अंमलबजावणी केव्हा पासून करणार आहात ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, महामंडळांमध्ये जातीचे आरक्षण ठेवले जात नाही. लाभार्थ्यांना निषकनुसार कर्ज वाटप करण्यात येते. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अनेकवेळा एकाच जातीच्या लाभार्थ्यांना जास्त लाभ मिळतो आणि जे गरजू आणि उपेक्षित आहेत त्यांना न्याय मिळत नाही. तेव्हा यातून निश्चितपणे सहानुभूतीपूर्वक मार्ग काढण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ MMP/ D/ KTG/ पूर्वी श्री.भारवि.. 12:30

ता.प्र.क्र.34679....

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, आपण मला प्रश्न विचारण्याची परवानगी देत नाही आहात. आपण माझ्यावर अन्याय करीत आहात हे बरोबर नाही. आपण माझ्यावर हेतूपुरस्सर अन्याय करीत आहात. मी दलितांचे प्रश्न मांडतो म्हणून आपण माझ्यावर अन्याय करीत आहात. मागील तीन दिवसांपासून आपण मला एकदाही प्रश्न विचारण्याची संधी दिलेली नाही. हा माझ्यावर आणि दलित समाजावर अन्याय आहे. तेव्हा मी सभात्याग करतो.

( सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे बहिर्गमन करतात.)

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ व खानापूर तसेच इतर दुष्काळी तालुक्यातील टंचाई निवारण्याबाबत**

**(2) * 33582 श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले , श्री.विक्रम काळे , श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ व खानापूर तसेच इतर दुष्काळी तालुक्यामध्ये खरीपाच्या हंगामाच्या सुरुवातीस अतिअल्प पाऊस पडला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत सर्व्हे करण्यात आला आहे काय,

(3) असल्यास, सदर सर्व्हेत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर तालुके टंचाईग्रस्त समजून टंचाई निवारणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश सोळंके, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (1) (2) व (3) सदर तालुक्यात सरासरीच्या 50 टक्के पेक्षा कमी पर्जन्यमान अथवा 50 टक्के पेक्षा कमी पेरण्या झाल्याचे आढळून आल्याने दि.22/8/2012 च्या शासन आदेशान्वये टंचाई परिस्थिती जाहीर करुन पेयजल व चारा टंचाईच्या अनुषंगाने आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ व इतर तालुक्यांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती आहे. दुष्काळी भागांत सर्व सोयीसुविधा पुरवाव्यात अशा प्रकारचे आदेश राज्य शासनाने दिलेले आहेत. परंतु आज सुध्दा कवठेमहांकाळ व खानापूर तालुक्यांमध्ये छावण्यांची आवश्यता आहे. आजही अर्धा आटपाडी तालुका पाण्यापासून वंचित आहे. तेथे 35-40 कि.मी.अंतरावरुन पाणी आणावे लागत आहे. आमच्या शेजारच्या सांगोला तालुक्यामध्ये 100 छावण्या उभारण्यात आल्या आहेत. परंतु कवठेमहांकाळ, जत आणि आटपाडी तालुक्यांमध्ये मागणी केल्याप्रमाणे छावण्या मिळत नाही. माझा प्रश्न आहे की, पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यांकडून मागणी होईल त्याप्रमाणे छावण्या देण्यात येतील काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, ज्या ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा सुरु आहे, त्याठिकाणी शुध्द पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने कोणत्या

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33582..

श्री.रमेश शेंडगे...

प्रकारच्या उपाय योजना करणार आहात ? मागील अधिवेशनामध्ये सांगण्यात आले होते की, जनावरांच्या छावण्या करण्यात येतील त्यामध्ये शेळ्या मेंढ्यांचा देखील समावेश करण्यात येईल. परंतु त्याची अंमलबजावणी अजून झालेली नाही. तेव्हा मंत्री महोदय संबंधितांना आदेश देतील काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी सांगली जिल्ह्यातील प्रश्न उपस्थित केलेला आहे. सर्वसाधारणपणे पिण्याच्या पाण्यासाठी मागणी आल्यानंतर आपण तेथे टँकर आणि इतर उपाय योजना करीत असतो. जनावरांच्या छावण्या करण्यासाठी शासनाने निर्णय घेतलेला आहे. जेथून मागणी येईल तेथे छावणी उभारण्याचे धोरण सरकारने स्वीकारलेले आहे आणि तसे अधिकार शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत. ज्या ठिकाणी 50 पैशापेक्षा कमी पैसेवारी आहे, त्या ठिकाणी उप विभागीय अधिकाऱ्यांना हे अधिकार दिलेले आहेत.

यानंतर श्री.सरफरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत राज्य शासनाने केंद्राकडे सुमारे ५ हजार कोटी रुपयांच्या पॅकेजच्या केलेल्या मागणीबाबत**

**(३) * ३३७९५ श्री.संजय दत्त , श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले , श्री.सतीश चव्हाण , श्री.किरण पावसकर , श्री.विक्रम काळे , श्री.दीपकराव साळुंखे , श्री.जयवंतराव जाधव , श्री.कपिल पाटील , श्री. विजय गिरकर , श्री.नितीन गडकरी , श्री.अनिल भोसले , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे , प्रा.सुरेश नवले , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , डॉ.रणजित पाटील , श्री.प्रवीण पोटे , श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १२३ तालुक्यांत ओढवलेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य शासनाने केंद्राकडे रुपये ५ हजार कोटीच्या पॅकेजची मागणी माहे ऑगस्ट, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीनुसार राज्याला केंद्राकडून पॅकेज मंजूर झाले आहे काय,

(३) असल्यास, किती कोटीचे पॅकेज राज्याला मंजूर झाले आहे व त्याचे वाटप कधीपर्यंत करण्यात येणार आहे,

(४) अद्याप निधी प्राप्त झाला नसल्यास, शासनाने पाठपुराव्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) (२) व (३) ऑगस्ट, २०१२ मध्ये राज्य शासनाने केंद्र शासनाकडे दृष्काळजन्य परिस्थितीबाबत मेमोरँडमद्वारे रु.३०११.६१ कोटी मदत देण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता. यामध्ये राज्य शासनाने सुरु केलेल्या उपाययोजना व पीक नुकसान बाबत करण्यात आलेली भरपाई याचा समावेश होता. अशा प्रकारे राज्य शासनाने अगोदरच केलेल्या खर्चाच्या प्रतिपुर्तीपोटी रु.५७४.७१ कोटी रुपयांची मदत मंजूर केली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, या राज्यात उद्‌भवलेल्या दुष्काळी परिस्थितीमध्ये हा विषय अतिशय महत्वाचा व गंभीर स्वरुपाचा झाला आहे. राज्य शासनाच्या वतीने रु.३०११.६१ कोटी रुपयांची मदत मिळावी म्हणून केंद्र शासनाला प्रस्ताव सादर करण्यात आला. परंतु केंद्र शासनाने अगोदर केलेल्या कामाची प्रतिपूर्ती करण्यासाठी रु.५७४.७१ कोटी रुपयांची मदत दिली. याबाबत

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले.... ता.प्र.क्र. ३३७९५....

माझा प्रश्न असा आहे की, मराठवाडयामध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य शासनाला किती रकमेची आवश्यकता आहे? त्यामध्ये रु.३०११.६१ कोटींचा अंतर्भाव आहे काय?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मराठवाडयामध्ये पाण्याची तीव्र टंचाई आहे इतकेच नव्हे तर तेथील चार जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती आहे, हे शासनाने मान्य केले आहे. त्याकरिता केंद्र शासनाने राज्य शासनाला काही मदत करावी यासाठी ऑगस्ट २०१२ मध्ये केंद्र सरकारला एक प्रस्ताव पाठविला होता. त्याला अनुसरुन केंद्र सरकारकडून रु.५७४.११ कोटी इतकी प्रतिपूर्ती करण्यासाठी रक्कम मिळाली आहे. त्यानंतर शासनाने पुन्हा एकदा फेरविचार करण्यासाठी नोव्हेंबर २०१२ मध्ये रु.३२३२ कोटींचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला आहे. ही रक्कम आम्हाला लवकरात लवकर मिळावी यासाठी शासनाच्या वतीने पाठपुरावा करण्यात येत आहे.

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, सह्याद्री शासकीय गेस्ट हाऊसमध्ये झालेल्या बैठकीमध्ये केंद्र शासनाकडून काहीतरी भरीव मदत मिळणार आहे अशाप्रकारचे वातावरण निर्माण करण्यात आले. त्याबाबत मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये चर्चा झाली. ड्राऊट मॅन्युअलप्रमाणे आपण तालुके काढले असते तर केंद्र सरकारने आपले ऐकले तरी असते. या मदतीमध्ये ५० ते ७५ टक्के हिस्सा आपल्या तालुक्याला मिळविण्यासाठी आपापले तालुके घुसविण्याची भानगड झाली. ही बाब केंद्रीय अर्थमंत्री माननीय श्री. चिदंबरम साहेबांना समजल्यानंतर त्यांनी आपले कान पिरगाळले. माननीय श्री. प्रणव मुखर्जी हे राष्ट्रपती झाल्यानंतर माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांना आनंद झाला. परंतु ते अर्थमंत्री नसल्याचे आणि माननीय श्री. चिदंबरम साहेबांकडे ते खाते गेल्याचे दु:ख आपल्याला झाले. याचे कारण माननीय डॉ. पतंगराव कदम साहेबांनी एखादी गोष्ट सांगितली आणि ती माननीय श्री. प्रणव मुखर्जी साहेबांनी ऐकली नाही अशी गेल्या ३०-३५ वर्षामध्ये एकही घटना घडल्याचे मला आठवत नाही. आपले महाराष्ट्राचे शिष्टमंडळ भेटण्यासाठी जाते तेव्हा माननीय अर्थमंत्री त्यांची कान उघाडणी करतात, ही बाब आम्हाला अपमानास्पद वाटते. माझे एवढेच म्हणणे आहे की, आपण मागितल्याप्रमाणे केंद्र सरकारने आपल्याला पैसे का दिले नाही, नंतर आम्ही नजर आणेवारी करु असे जाहीर करुन आपण घुमजाव का केले, आपण दुष्काळी भागातील लोकांसाठी गंभीर आहात कां, दुष्काळी भागातील जनतेला आपण खरेच न्याय देणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विनोद तावडे....... ता.प्र.क्र. ३३७९५....

आहात काय, त्यामधून या जनतेला काही मिळणार आहे काय? माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम साहेब आपण आपले कसब पणाला लावून या महिन्यापासून दुष्काळाचे चटके सुरु होण्यापूर्वी केंद्र शासनाकडून या राज्यातील गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देणार आहात काय?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, माझे परम मित्र व सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी दिलेली माहिती थोडीशी अपूर्ण आहे. या देशाचे कृषी मंत्री सन्माननीय श्री. शरद पवार साहेबांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रीमंडळाने एक समिती नेमली आहे. त्यामध्ये केंद्रीय गृह मंत्री, अर्थ मंत्री व ग्राम विकास मंत्री अशा चार ते पाच मंत्र्यांचा समावेश आहे. त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली आमचे एक शिष्टमंडळ त्या समितीला जाऊन भेटले आणि त्यांच्याबरोबर चर्चा करण्यात आली.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33795.. . . . .

डॉ.पतंगराव कदम . . . .

त्या चर्चेमध्ये त्यांनी असे सांगितले की, आम्ही तेथे ताबडतोब एक कमिटी पाठवितो आणि याबाबत कमिटीने तपासणी केल्या नंतर तुम्हाला किती मदत द्यावयाची हे ठरविता येईल. त्यानुसार पहिल्या हप्त्यामध्ये 570 कोटी रुपये मिळाले. दिनांक 21 ते 23 नोव्हेंबर रोजी 3232 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. त्यासाठी देखील परत तपासणी करण्यासाठी कमिटी येऊन गेली आहे आणि त्यांना येथील परिसरामध्ये वस्तुस्थिती काय आहे हे पटलेले आहे. त्यामुळे त्यांचा रिपोर्ट आल्यानंतर तो कॅबिनेटच्या सब कमिटीपुढे जाईल. तसेच त्यावेळी देखील ठरल्याप्रमाणे प्लॅनिंग कमिशन आणि सब कमिटी नेमली. त्यामुळे कोणीही पाने वगैरे काही लावलेली नाहीत. आम्ही या प्रश्नाकडे गांभीर्याने पहात आहोत. मात्र सुदैवाने आपल्याच राज्याचे माननीय कृषी मंत्री त्या समितीचे अध्यक्ष आहेत. त्यामुळे अधिक निधी मिळेल अशी आमची अपेक्षा आहे.

**उप सभापती** : आता मी पुढील प्रश्न पुकारतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला बोलावयाचे आहे.

**उप सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचे म्हणणे काय आहे ?

श्री.विनोद तावडे : आपला बॅटींग रेट, स्ट्राईक रेट खूप जास्त आहे. प्रश्नोत्तराचा तास सुरु आहे.

**उप सभापती** : त्याच रेटने चर्चा व्हावी म्हणून मी पुढील प्रश्न पुकारला.

श्री.विनोद तावडे : पण ज्यावेळी 5 दिवसाची क्रिकेटची मॅच असते तेव्हा त्याची गरज नाही. दुष्काळाच्या संबंधातील मुद्दा आहे. त्यामुळे आमची विनंती आहे की, सन्माननीय सदस्य दुष्काळी भागातून येतात.

**उप सभापती** : मग प्रश्न पुढे सरकणार नाहीत हे आपल्याला चालणार आहे काय?

श्री.विनोद तावडे : चालेल. यासाठी सर्वांची तयारी आहे.

श्री.मनिष जैन : सभापती महोदय, मला संधी दिल्याबद्दल धन्यवाद. मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, आमच्या खानदेशमध्ये 15 तालुक्यापैकी जवळपास 6 ते 7 तालुके पूर्णपणे दुष्काळग्रस्त आहेत. तसेच आमच्या भागामध्ये सुरुवातीपासून पाऊस देखील झालेला नाही. शासन त्याठिकाणी किती पॅकेज उपलब्ध करुन देणार आहे. याबाबतीत शासनाने कोणत्या प्रकारचे

वाय-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33795.. . . . .

श्री.मनिष जैन . . . .

नियोजन केलेले आहे त्या बाबत माहिती द्यावी. दुसरा प्रश्न असा आहे की, याबाबत ज्या अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिलेली आहे त्या अधिकाऱ्यांच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे? कारण हा दुष्काळाच्या बाबतीतील प्रश्न आहे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, याठिकाणी केंद्र शासनाकडून दुष्काळासाठी जी मदत मागितलेली आहे त्याबाबत प्रामुख्याने प्रश्न उपस्थित केला आहे.खानदेश आणि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जी मदत अपेक्षित आहे त्याबाबत हे पॅकेज आहे.त्यामध्ये विभागाचा विचार केलेला नाही.संपूर्ण महाराष्ट्रासाठी 3200 कोटी रुपयांची गरज आहे आणि त्याचा लाभ संपूर्ण महाराष्ट्राला मिळणार आहे.

श्री.मनिष जैन : सभापती महोदय, याबाबत अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिलेली आहे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, याबाबत अधिकाऱ्यांनी कोणती चुकीची माहिती दिलेली आहे तेच सांगितले नाही.

श्री.मनिष जैन : सभापती महोदय, . . . .

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना बोलावयास दिले आहे.सभागृहामध्ये एकाच सन्माननीय सदस्यांनी दोन-दोन वेळा बोलले पाहिजे असे काही नाही.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, याठिकाणी केंद्र शासन की राज्य शासन हा वेगळा विषय आहे. जर आपल्याला अमुक इतकी रक्कम लागणार आहे याबाबत एकमत असेल आणि जर केंद्र शासनाने तेवढी रक्कम देण्याचे नाकारले तर राज्य शासन दुष्काळी भागामध्ये जेवढ्या निधीची आवश्यकता आहे तेवढा निधी उपलब्ध करुन तेथील लोकांची गरज पूर्ण करणार आहे काय असा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा की, शेतकऱ्यांकडून वारंवार अशी मागणी येते की, आमच्या खात्यामध्ये चाऱ्याचे पैसे भरण्यात यावेत.परंतु कधी चारा डेपो सुरु करतो तर कधी गुरांची छावणी सुरु करतो. पण शेतकऱ्यांच्या मागणीनुसार त्यांच्या चाऱ्याचे पैसे त्यांच्या खात्यामध्ये का जमा केले जात नाहीत ? यासाठी किती निधीची गरज आहे?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की यासाठी किती निधी लागणार आहे? मात्र त्यासाठी केंद्र शासन आपल्याला मदत करणारच आहे. परंतु जरी

वाय-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केंद्र शासनाने मदत केली नाही तरी महाराष्ट्र राज्य दुष्काळाचा सामना करण्यासाठी सज्ज आहे. यासाठी जेवढा निधी लागेल तेवढा निधी देण्याची शासनाची तयारी आहे. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर असे की, याठिकाणी शेतकऱ्यांच्या नावावर चारा वर्ग करावा अशी मागणी करण्यात येत आहे. पण ती मान्य करता येणार नाही तर छावणी देण्याचे शासनाचे धोरण आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय,. . ..

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांना सांगू इच्छितो की, त्यांनी प्रत्येक प्रश्नावर बोललेच पाहिजे असे नाही.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मी दुष्काळी भागामध्ये रहातो

**उप सभापती** : आम्ही देखील दुष्काळी भागातीलच आहोत.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, आम्ही त्या भागामध्ये फिरतो. तेथील लोकांना कोणत्या अडचणी येतात हे आम्हाला माहिती आहे. येथे सिंचनावर चर्चा होत नाही, पाण्याच्या बाबतीत चर्चा होत नाही. सदनामध्ये जे प्रश्न येतात ते विचारण्याची देखील आम्हाला संधी मिळत नाही.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 33795 ......

श्री. रमेश शेंडगे : एका कार्डधारकाला फक्त पाच किलो गहू मिळतो. दुष्काळासाठी शासनाने आदेश काढले. एका कुटुंबामध्ये जर पाच माणसे असतील तर महिन्याला 250 ग्रॅम गहू मिळतो. 250 ग्रॅम धान्य घेऊन कुटुंब जगू शकते का, कोणतीही व्यक्ती जगू शकते का? म्हणून 5 किलो गव्हाची मर्यादा 15 ते 20 किलो करावी. कायम निधीची जी अडचण निर्माण होते त्यासाठी राज्यातील सर्व दुष्काळी तालुक्यातील लोकप्रतिनिधींची दुष्काळी महामंडळाची मागणी अनेक वर्षापासूनची आहे. ते दुष्काळी महामंडळ शासन कधी जाहीर करणार ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो एकतर दुसऱ्या विभागाशी संबंधित आहे तरीही मी उत्तर देण्याचा प्रयत्न करतो. साधारणत: बीपीएल कार्डधारकाला 15 किलो धान्य दिले जाते. एपीएल कार्डधारकालाही ते धान्य दिले जाते पण फक्त किंमतीमध्ये फरक आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी त्याची माहिती घ्यावी. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अशाच पध्दतीने धान्य वाटप होते. दुष्काळी महामंडळाची जी मागणी आहे तो प्रश्न या ठिकाणी उपस्थित होत नाही. त्यासाठी सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आताच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, 3200 कोटी रुपयांचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविलेला आहे. आता डिसेंबर महिना सुरु आहे आणि दुष्काळाची स्थिती दिवसेंदिवस अत्यंत गंभीर होत आहे. मजुरांच्या कामाचा प्रश्न आहे. चाऱ्याचा प्रश्न आहे. त्याचबरोबर हजारो गावांमध्ये आज पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झालेली आहे. आजपर्यंत शासनाचे कोणत्याही प्रकारचे नियोजन झालेले नाही. आजही अनेक गावांमध्ये पाच ते दहा किलोमीटरवरुन पाणी आणावे लागते, अशी परिस्थिती आहे. सरकारची कोणतीही तयारी नाही, नियोजन नाही. डिसेंबर महिन्यामध्ये जर ही स्थिती असेल तर आता प्लॅनिंग करण्यासाठी शासनाला दोन तीन महिने लागतील. तोपर्यंत जनतेने पिण्याच्या पाण्यासाठी कोठे जावे? जनावरांसाठी पाणी नाही, लोकांना पिण्यासाठी पाणी नाही. पिण्याच्या पाण्यासंबंधी शासनाने आतापर्यंत काय तयारी केली आहे हे माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाला सांगितले पाहिजे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, आतापर्यंत काय काय उपाययोजना केल्या हे मी आपल्याला थोडक्यात सांगणार आहे. राज्यातील पाणीटंचाईच्या भागामध्ये सध्या 795 गावे आणि 3527 वाड्यांमध्ये साधारणत: 1137 टँकर आज चालू आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 33795 ......

श्री. विनोद तावडे : टँकर कोठे चालू आहेत ? हे सर्व कागदावर आहे. त्याची यादी पटलावर ठेवावी.

श्री. प्रकाश सोळंके : कागदावर चालू आहेत हा आरोप आम्हाला मान्य नाही. 1137 टँकर कोठे चालू आहेत त्याची यादी मी पटलावर ठेवतो. ती यादी पटलावर ठेवण्याची माझी तयारी आहे. 1137 टँकर आज राज्यामध्ये चालू आहेत.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. प्रकाश सोळंके : सन्माननीय सदस्यांनी उत्तर ऐकून घ्यावे. मोठ्याने बोलण्याने काही होत नाही. आम्ही जे उत्तर देतो ते ऐकून घेण्याची तयारी ठेवावी.

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय, खोटी माहिती देत आहेत.

श्री. प्रकाश सोळंके : ही माहिती खोटी नसून खरी आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी 'खोटी' असा जो शब्द वापरलेला आहे तो कामकाजातून काढून टाकण्यात येईल. दुसरी बाब अशी की, माननीय मंत्री महोदय उत्तर देत असताना अशा प्रकारे सन्माननीय सदस्य मध्येच उठून उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात ते बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, अहमदनगर जिल्ह्यामध्ये 107 छावण्या चालू आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये 2, बीड जिल्ह्यामध्ये 5, जालना जिल्ह्यामध्ये 2, पुणे जिल्ह्यामध्ये 1, सातारा जिल्ह्यामध्ये 9, सांगली जिल्ह्यामध्ये 19 आणि सोलापूर जिल्ह्यामध्ये 109 अशा एकंदर 335 छावण्या चालू आहेत. त्यामध्ये 2 लाख 66 हजार 116 जनावरे आहेत. साधारणत: या बाबीवर आतापर्यंत 103 कोटी रुपये खर्च झालले आहेत.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत सभात्याग करतात )

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

## राज्यात नवीन उपविभागीय अधिकारी पदांच्या निर्मितीबाबत

**(४) * ३४७१२ श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उपविभागीय अधिकाऱ्यांची नवीन पदे निर्माण करण्याचे धोरण शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामाची व्याप्ती लक्षात घेऊन प्रती दोन तालुक्याना एक उपविभागीय अधिकाऱ्याचे पद निर्माण करण्याची प्रक्रिया शासन स्तरावरुन सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जातीचे प्रमाणपत्र, शालेय कामकाजासाठी लागणारे दाखले, जमिनीचे विवाद त्याचबरोबर इतर कामे व त्यांची व्याप्ती लक्षात घेता पदनिर्मितीची कार्यवाही शासन केव्हा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (१) होय

(२) होय

(३) याबाबत शासन अधिसूचना क्रमांक प्राफेब २०१०/प्र.क्र.२६/पुनर्बांधणी-३/म-१० दिनांक २६/६/२०१२ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने प्राप्त हरकती व आक्षेपांवर छानन्नी करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. सदर कार्यवाही अंती पदनिर्मितीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34712...

श्री. अमरसिंह पंडित : राज्यात उपविभागीय अधिका-यांची नवीन पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे असे लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. गेवराई आणि शिरुर या दोन तालुक्यामध्ये एक एसडीओचे पद निर्माण करावे असा आमचा आग्रह आहे. याचे कारण असे की, खूप कामे प्रलंबित आहेत. त्यामुळे शिरुर आणि गेवराईसाठी एक एसडीओचे पद निर्माण करण्यात येईल काय ?

श्री. प्रकाश सोळंके : राज्यात उपविभागीय अधिका-यांची पदे निर्माण करण्याच्या संदर्भात शासनाने राजपत्र प्रसिध्द केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या मागणीनुसार गेवराई आणि शिरुर या दोन तालुक्यांचा उपविभागामध्ये समावेश केलेला आहे. दिनांक 26 जून 2012 रोजी हे राजपत्र निर्गमित करण्यात आलेले आहे. दोन तालुक्यामध्ये एक उपविभागीय अधिकारी असावा असा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या संदर्भात हरकती मागविलेल्या असून त्या प्राप्त देखील झालेल्या आहेत. मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, या व्यतिरिक्त त्यांच्या काही हरकती किंवा आक्षेप असतील तर त्या त्यांनी लवकरात लवकर द्याव्यात जेणे करुन शासन स्तरावर अंतिम निर्णय घेता येईल.

श्री. अमरसिंह पंडित : 31 मार्च पूर्वी शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल काय ?

श्री. प्रकाश सोळंके : शासनाचा तसा प्रयत्न राहील.

श्री. विक्रम काळे : 26 जून 2012ला राजपत्र निर्गमित करण्यात आले. त्यास सहा महिने उलटून गेले. अजून हरकती मागवून त्यांची छाननी करण्याची प्रक्रिया संपलेली नाही काय ? दोन तालुक्यांसाठी एक उपविभागीय अधिका-याच्या पदाची निर्मिती केलेली आहे. ही पदे भरण्यासाठी किती विलंब लागणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : महाराष्ट्रात 112 उपविभागीय कार्यालये आहेत. नवीन 2 तालुक्यामध्ये 1 या प्रमाणे 71 उपविभागीय अधिकारी नेमावे लागतील. महाराष्ट्रामध्ये भूसंपादन अधिका-यांची 164 पदे आहेत. त्यापैकी 71 अधिकारी हे उपविभागीय अधिका-याच्या दर्जाचे असल्यामुळे त्यांना त्या पदावर नेमण्यात येत आहे. जी नवीन पदे निर्माण करणार आहोत त्या पदांना मंजुरी मिळालेली असून हरकतीवर निर्णय झाल्यानंतर त्वरित नेमणुका करण्यात येतील.

---

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे येथील पानशेत धरणामुळे पुरग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्याबाबत**

**(५) * ३३७५२ श्री.मोहन जोशी , श्री.संजय दत्त , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील पानशेत धरणातील मुळ पूरग्रस्तांचे प्रश्न ५२ वर्षानंतरही अद्याप सुटलेले नसल्याचे माहे जुलै, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूरग्रस्तांचे प्रलंबित असलेले प्रश्न त्वरित सोडविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मला प्रश्नाच्या छापील उत्तरामध्ये सुधारणा करावयाची आहे. ती करण्यास आपण मला परवानगी द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**उप सभापती :** ठीक आहे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील दुरुस्ती करतो. उत्तराच्या भाग (१)मध्ये "हे खरे नाही" या ऐवजी "हे अंशत: खरे आहे" आणि प्रश्न भाग (२) मध्ये "प्रश्न उद्‌भवत नाही" या ऐवजी "पूरग्रस्तांना देण्यात आलेल्या गाळयांच्या मिळकत पत्रिकेवर भाडेपट्टा धारकाऐवजी मालकी हक्काने नोंद करणे व सदर गाळयाची फेरविक्री करताना मार्गदर्शन करणे, घालून दिलेल्या मुदतीमध्ये मालकी हक्काची रक्कम जमा न झालेल्या ६७७ गाळेधारकांना एकवेळ अंतिम मुदत देणे. तसेच पूरग्रस्तांनी गाळयालगतच्या मोकळया जागेवर केलेल्या अतिक्रमणाबाबत अनुज्ञेय चटईक्षेत्रानुसार ते नियमाकूल करणे या बाबी जिल्हाधिकारी व शासनस्तरावर विचाराधीन आहेत." बाकी छापल्या प्रमाणे

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33752....

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे येथील पानशेत धरणातील मूळ पुरग्रस्तांचे प्रश्न 52 वर्षानंतरही अद्याप सुटलेले नाहीत. या सभागृहात मी या विषयाच्या बाबतीत मागे लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती, त्यावेळी तत्कालीन महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांनी या सभागृहात उत्तर दिले होते की, या पूरग्रस्तांच्या बाबतीत आम्ही पुणे येथे एका महिन्यात बैठक घेऊ आणि त्यांचे सर्व प्रश्न मार्गी लावू. त्यांच्या उत्तराप्रमाणे तत्कालीन महसूल राज्यमंत्र्यांनी पुणे येथे एक बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीत सिटी सर्व्हेला नावे लावावीत अशा प्रकारची सूचना जिल्हाधिकाऱ्यांना केली होती व या पूरग्रस्तांना जास्तीचा एफएसआय देण्याबाबत प्रयत्न करावा अशाही प्रकारची सूचना पुणे महानगरपालिकेस देण्यात आली होती. परंतुं अनेक पूरग्रस्तांची नावे सिटी सर्व्हेला लावली गेलेली नाहीत. एरंडणा, कसबा पेठ येथील पुरग्रस्तांची नावे लावलीच गेलेली नाहीत. पूरग्रस्तांचे प्रश्न सोडविण्यासाठी एक विशेष अधिकारी नेमण्याचे ठरले होते. त्यासाठी एक वेगळे कार्यालय स्थापन करण्याचे ठरले होते. परंतु या गोष्टींची अंमलबजावणी अद्यापपर्यंत झालीच नाही. या ठिकाणच्या पूरग्रस्तांचे प्रश्न एका महिन्यात सोडविण्यात येतील काय ?

श्री.प्रकाश सोळंके : होय.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय महसूल राज्यमंत्र्यांनी सभागृहात सुधारित उत्तर दिले आहे. सन्माननीय सदस्य एक महिन्यापूर्वी प्रश्न विचारीत असतात. "प्रश्न उद्‌भवत नाही" अशा प्रकारचे छापील उत्तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून दिले जाते. आता मंत्री महोदय म्हणाले की, "हे अंशतः खरे आहे". चुकीची अथवा सुधारित माहिती देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द माननीय मंत्री महोदय कारवाई करतील काय ?

श्री.मोहन जोशी : सन्माननीय सदस्यांनी प्रश्नाच्या अनुषंगाने जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो शंभर टक्के बरोबर आहे. अशा पध्दतीने वागणाऱ्या विभागाच्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई झाली पाहिजे असे माझेही स्पष्ट मत आहे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या ठिकाणच्या पूरग्रस्तांना घरे आणि गाळे देण्यासंबंधीचा प्रश्न मार्गी लागलेला आहे. सगळया पूरग्रस्तांना शासनाने घरे दिलेली आहेत. परंतु नंतर काळाच्या ओघामध्ये त्यांच्याकडून नवीन नवीन मागण्या आल्या आहेत. मिळकत पत्रिकेवर भाडेपट्टयाने जागा देणे...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33752....

श्री.मोहन जोशी : अनेक वर्षापासून हे प्रश्न प्रलंबित आहेत...

श्री.प्रकाश सोळंके : यासंबंधी एक महिन्याच्या आत बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल.

(गोंधळ)

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदय आपण या विषयाच्या अनुंषंगाने एक बैठक घेणार आहात. मी पुणे जिल्हयात जन्म घेतलेला आहे. त्या बैठकीस मला बोलवा. ते प्रश्न आपण एका मिनिटात सोडवू.

----------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे नेकनुर (जि.बीड) येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे कोट्यवधी रुपयाचे अनुदान घेतल्याबाबत**

**(६) * ३४१६६ श्री.धनंजय मुंडे** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नेकनुर (जि.बीड) येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे बोगस मागासवर्गीय संस्थांची नोंदणी करण्यात येऊन शासनाचे कोट्यवधी रुपयांचे अनुदान घेतले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास या बोगस मागासवर्गीय संस्थांची चौकशी करून गुन्हे दाखल करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा. सामाजिक न्याय मंत्र्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीवरून या संस्थांची चौकशी करून कारवाई करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सचिन अहिर, श्री. शिवाजीराव मोघे यांच्याकरिता** : (१), (२), (३) व (४) शासनास प्राप्त झालेल्या लोकप्रतिनिधींच्या तक्रारीवरून चौकशी करण्यात आली आहे. चौकशीच्या अनुषंगाने उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांचेकडून माहिती मागविण्यात आली असून ती अप्राप्त आहे. माहिती प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, बनावट कागदपत्रांच्या आधारे बोगस मागासवर्गीय औद्योगिक संस्था स्थापन करुन शासनाचे १० कोटी रुपयांचे अनुदान लाटल्याबाबतचा हा प्रश्न आहे. बीड जिल्हयातील नेकनुर येथील शांतीदूत, लुंबिनी आदी चार सहकारी औद्योगिक संस्थांनी बोगस कागदपत्रांवर तहसीलदारांच्या सह्या दाखवून १० कोटी रुपयांचे शासकीय अनुदान लाटले आहे.

सभापती महोदय, हा प्रकार माझ्या लक्षात आल्यानंतर मी मार्च, २०१२ मध्ये सामाजिक न्याय मंत्र्यांकडे लेखी पत्राद्वारे तक्रार दाखल करुन या बोगस संस्थांची चौकशी करण्यात यावी व त्यांना अनुदानाचा दुसरा हप्ता दिला जाऊ नये अशी मागणी केली असतानाही या संस्थांना दुसऱ्या हप्त्याचे वितरण करण्यात आले आहे. उत्तरामध्ये म्हटले आहे की, चौकशी झालेली असून अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. मार्च महिन्यात मी पत्र दिले होते. चौकशी होऊन ८ महिन्यांचा काळ लोटला आहे. चौकशीचा अहवाल प्राप्त न झाल्यामुळे कारवाई होऊ शकलेली नाही. या बोगस संस्थांची नोंदणी रद्द करण्यात येणार आहे काय, ज्या संचालक मंडळाने बोगस कागदपत्राच्या आधारे शासनाचे अनुदान लाटले आहे त्या संचालकांवर फौजदारी गुन्हे दाखल केले जातील काय आणि संबंधितांची प्रॉपर्टी जप्त करुन शासनाचे १० कोटी रुपये वसूल केले जातील काय?

..२.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, जोपर्यंत संस्था बोगस आहे तसेच संचालक मंडळावरील सदस्य मागासवर्गीय नाहीत असा निष्कर्ष समोर येत नाही तोपर्यंत पुढील कार्यवाही करणे म्हणजे न्यायालयीन प्रक्रियेला आमंत्रित करण्यासारखे आहे. उप निबंधकांकडून अहवाल का येत नाही या संदर्भात निश्चितपणे त्यांना सूचना दिल्या जातील. महिन्याभरात अहवाल प्राप्त केला जाईल आणि अहवालामध्ये संस्था चुकीच्या आहेत असे निष्पन्न झाले तर त्याबाबत योग्य ती कारवाई केली जाईल.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, तहसीलदारांनी स्वत: तालुका उप निबंधकांना लेखी स्वरुपात कळविले आहे की, पत्रावरील स्वाक्षरी व शिक्का माझा नाही. ही बाब खरी आहे काय, असेल तर शासन या प्रकरणाची गंभीर दखल घेणार आहे काय?

श्री.सचिन अहिर : होय.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, एका महिन्याच्या आत अहवाल आल्यानंतर संबंधितांवर कारवाई केली जाईल. दिनांक 15.9.2012 रोजी तहसीलदार यांनी तालुका उप निबंधकांना पत्र लिहून चारही संस्थांनी दाखल केलेल्या पत्रावरील स्वाक्षरी व शिक्का माझ्या कार्यालयाचे नसल्याचे कळविले आहे. मी तहसीलदारांच्या पत्राची प्रत आपल्याकडे सादर करतो. ग्रामसेवकांनी संस्थांच्या प्रॉपर्टीबाबत पत्र दिले असून प्रॉपर्टी आणि बांधकामाची कोणतीही परवानगी ग्रामपंचायतीकडून घेतलेली नाही. मी मार्च, 2012 मध्ये सामाजिक न्याय मंत्र्यांना पत्राद्वारे या बोगस प्रकरणाची माहिती देऊन या संस्थांना अनुदानाचा दुसरा हप्ता दिला जाऊ नये अशी विनंती केली होती. तरी देखील या संस्थांना अनुदानाचा दुसरा हप्ता दिला गेला आहे. चौकशी होऊनही अद्याप अहवाल आलेला नाही. म्हणून संबंधितांवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करावेत. संस्थांची नोंदणी रद्द व्हावी आणि ज्यांनी शासनाच्या अनुदानाची लूट केली आहे त्यांची मालमत्ता जप्त करुन शासकीय अनुदानाची रक्कम वसूल करावी अशी माझी विनंती आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३४१६६...........

श्री.सचिन अहिर : मी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे अहवाल प्राप्त झालेला नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तहसीलदारांनी उप निबंधकांकडे अहवाल दिलेला आहे. परंतु उप निबंधकांकडून अहवाल येत नाही तोपर्यंत कारवाई करता येत नाही. माननीय सदस्यांनी दिलेली माहिती सत्य समजून अहवाल आला असेल तर निश्चितपणे तातडीने गृह विभागाने या प्रकरणाची चौकशी करावी अशा सूचना दिल्या जातील आणि चौकशीत दोषी आढळले तर निश्चितपणे संस्थांची नोंदणी रद्द करण्याचे काम केले जाईल.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 34166.....

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी विचारलेल्या प्रश्नाला सन्माननीय मंत्र्यांनी दोनदा उत्तर दिले आहे की, "अहवाल आल्यानंतर कारवाई करण्यात येईल." या संस्थेत गैरव्यवहार झालेला आहे याबाबत तेथील तहसीलदारांनी रिपोर्ट दिलेला आहे तसेच ग्रामसेवकांनी सुध्दा तशा प्रकारचा अहवाल दिलेला असल्यामुळे या क्षणापासून या संस्थेचे सर्व बँक व्यवहार थांबविण्यात येतील काय ?

श्री. सचिन अहिर : होय, सभापती महोदय.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मौजे नेकनुर (जि.बीड) येथील बोगस संस्थेची सर्व जिल्हयात चर्चा आहे. बोगस काम कशा प्रकारे केले जाते हे या संस्थेच्या उदाहरणावरुन दिसून येते. या प्रश्नाच्या संदर्भात विभागाने सुध्दा मोघम उत्तर दिलेले आहे, हे प्रकरण दाबण्याचा प्रकार आहे असे उत्तरावरुन सिध्द होते. त्यामुळे यासंदर्भात माझे प्रश्न असे आहेत की, ही संस्था बोगस आहे हे सिध्द झालेले असल्यामुळे विभागामार्फत या संस्थेवर गुन्हे दाखल करण्यात कोणती अडचण आहे ? या संस्थेच्या विरुध्द आपल्या विभागाकडून गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत काय, या संस्थेचे बँक खाते ताबडतोब गोठविण्यात येणार आहे काय, ही संस्था बोगस आहे याची कल्पना असतांनाही ज्या अधिकाऱ्यांनी या संस्थेची शिफारस केलेली आहे त्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मी अगोदरच स्पष्ट उत्तर दिलेले आहे. या विषयाच्या संदर्भात उपनिंबधाकाकडून अद्याप अहवाल आलेला नाही. या प्रश्नाच्या संदर्भात तीन सन्माननीय सदस्यांनी विचार मांडलेले आहेत. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यानुसार या संस्थेच्या संदर्भात तहसीलदारांनी तशा प्रकारचा रिपोर्ट उपनिबंधकाकडे दिलेला आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे खरे आहे असे मानून या संस्थेची चौकशी गृह विभागाने करावी अशी गृह विभागाला विनंती करण्यात येईल. सर्व प्रकरण स्पष्ट होण्याच्या अगोदर विभाग एफआयआर दाखल करु शकत नाही. चौकशीचे काम गृह विभागाकडे देण्यात येईल. या संस्थेचे बँक व्यवहार होणार नाहीत याबाबत मी अगोदरच माहिती दिलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 34166.....

**सभापती** : मागासवर्गीय संस्थेच्या बाबतीतील हे गंभीर प्रकरण आहे. या संस्थेमध्ये 10 कोटी रुपयांचा हेरफेर झाल्याची माहिती सन्माननीय सदस्यांनी आपल्या प्रश्नामध्ये सांगितली आहे. या संस्थेला बँक व्यवहार करता येणार नाही अशीही माहिती माननीय मंत्री महोदयांनी दिलेली आहे. परंतु या प्रश्नाच्या संदर्भात आपल्या विभागामार्फत संबंधित संस्थेवर एफआयआर दाखल करण्याच्या दृष्टीने काही प्रयत्न करता येणार नाहीत काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात गृह विभागाकडून चौकशी करण्यात येईल व वेळ आली तर संबंधित संस्थेवर एफआयआर देखील दाखल करु.

**सभापती** : ठीक आहे.

------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मिरकवाडा (जि.रत्नागिरी) बंदरातील गाळ काढण्यासाठी करावयाची उपाययोजना**

**(७) * ३३५२५ श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील मिरकरवाडा बंदरात मोठया प्रमाणात गाळ साचल्याने अनेक नौका बंदरातच नांगर टाकून उभ्या असल्याचे माहे ऑगस्ट, २०१२ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मच्छीमारांना मच्छीमारी व्यवसाय करता यावा म्हणून तातडीने बंदरातील गाळ काढण्याबाबत कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप बंदरातील गाळ काढला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भास्कर जाधव, श्री.मधुकरराव चव्हाण यांच्या करिता** : (१) होय.

(२) कोकण विकास पॅकेज अंतर्गत मिरकरवाडा बंदरातील गाळ काढण्यासाठी शासनाने ऑगस्ट, २०१२ मध्ये मंजूरी दिली असून गाळ काढण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या उत्तराला "होय" असे उत्तर देण्यात आले आहे. दुसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात मिरकरवाडा बंदरातील गाळ काढण्यासाठी शासनाने मान्यता दिल्यामुळे त्या ठिकाणचा संपूर्ण गाळ काढण्यात आलेला आहे अशी माहिती दिलेली आहे. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, मिरकरवाडा बंदरातून किती घन मीटर गाळ काढण्यात आला, त्यासाठी किती रक्कम खर्च झाली, गाळ काढण्यासाठी कशा प्रकारची यंत्रसामुग्री वापरण्यात आली ? मिरकरवाडा बंदरातील संपूर्ण गाळ काढण्यात आला असून हे संपूर्ण बंदर गाळ मुक्त झालेले आहे असे आपण म्हणू शकतो काय ? महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डने ड्रेझर मशीन घेतले होते व या मशीनच्या सहाय्याने कोकणातील संपूर्ण समुद्र किनाऱ्याचा गाळ काढला जाणार होता. त्यामुळे ड्रेजिंग मशीनच्या सहाय्याने किती घन मीटर गाळ काढण्यात आला व या ड्रेझर मशिनची आज कशी आहे ?

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33525...

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिला जो प्रश्न विचारला आहे त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, मिरकरवाडा बंदरातील एकूण 43935.50 घन मीटर इतका गाळ येत्या ऑगस्टमध्ये काढण्यात आला आहे. यासाठी रूपये 62,27,859.00 इतका निधी खर्च करण्यात आला आहे. सन्माननीय सदस्यांनी मिरकरवाडा बंदर पूर्णपणे गाळ मुक्त होईल काय, असा देखील प्रश्न विचारला आहे. येथे नर्मदा सिमेंट फॅक्टरीकरिता ब्रेक वॉटर सिस्टीम बांधण्यात आली. येथील स्थानिक लोक त्यांचा अनुभव सांगत होते. परंतु, त्यांचे म्हणणे ऐकले नाही. आता हे बंदर सातत्याने गाळाने भरत आहे. त्यामुळे दरवर्षी या बंदराचा गाळ काढावा लागतो. तसेच, ड्रेझरचे काय झाले असा देखील प्रश्न विचारला आहे. दिनांक 24.6.2009 रोजी कोकण पॅकेज संबंधातील बैठक झाली होती. त्यात 2 ड्रेझर घेण्याचे ठरविले होते व ते आले देखील. कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक या प्रमाणे 4 ड्रेझर घेण्याचे ठरले. त्यामुळे आपण आणखी 2 ड्रेझरची ऑर्डर देण्यात आलेली आहे. त्यातील एक ड्रेझर सिंधुदुर्ग व एक मुंबईमध्ये आहे. सदर दोन ड्रेझर एप्रिल पर्यंत येतील अशा प्रकारची अपेक्षा आहे. सदर बंदर गाळ मुक्त होणार की नाही असा देखील प्रश्न विचारण्यात आला आहे. त्याला 'होय' असे उत्तर आले. हे बंदर लवकरात लवकर गाळ मुक्त होणार आहे. कारण याकरिता केंद्र शासनाकडून 64 कोटी रूपये मिळतील व हे बंदर कायमस्वरूपी गाळ मुक्त करण्याकरिता एशियन डेव्हलपमेंट बँकेकडून संपूर्ण कोकणपट्टीतील गाळ काढण्यासाठी 827 कोटी रूपयांचा आराखडा बनविला आहे त्यातून हे बंदर लवकरच गाळ मुक्त करण्यात येईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यातील मिरकरवाडा बंदरातील गाळा काढण्यासंबंधातील प्रश्न या सभागृहामध्ये वारंवार तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आलेला आहे. आताच येथे सांगितले की, जे कोकण पॅकेज मिळाले आहे त्यातून गाळ काढण्याची व्यवस्था केली आहे. यापूर्वी देखील ड्रेझर पाठविला होता. तो त्या गाळातच रूतला होता. तो आता निकामी झाला आहे. या सदनामध्ये यापूर्वी देखील गाळ काढला जाईल अशा प्रकारची उत्तरे दिलेली आहेत. पण गाळ काढला जात नाही ही वस्तुस्थिती आहे. वारंवार गाळ साठत आहे. तेथील मच्छीमारांचे प्रश्न आहेत. त्यामुळे मिरकरवाडा बंदर आपण कधी गाळमुक्त





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33525...

श्री.किरण पावसकर....

करणार आहात ? आपण ड्रेझर पाठविला आहे. पण तो यापूर्वीच निकामी झाला आहे. दुसरा गेला आहे तो काम करतो आहे किंवा नाही याची शाश्वती नाही व त्यातून गाळ काढला जाईल याची देखील शाश्वती देता येणार नाही. जे अधिकारी आपल्याला असत्य माहिती देत आहेत त्यांच्यावर आपण कारवाई करणार आहात काय ? मिरकरवाडा बंदरात दरवर्षी गाळ साचत राहणार असेल तर तो गाळा काढण्यासाठी शासनाकडे लॉंग टर्म योजना आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, 2 ड्रेझर पैकी कुठलाही ड्रेझर रत्नागिरीमध्ये गेलेला नाही. एक ड्रेझर सिंधुदुर्गकडे रवाना होत होता. परंतु, रफ सी असल्यामुळे तो जयगडमध्ये थोडासा कलंडला. त्याला काढण्याचे काम करण्यात आले असून त्याचे इंजिन दुरूस्त करून तो सिंधुदुर्गकडे रवाना होणार आहे. दुसरा ड्रेझर मुंबईतील वेसावे येथे आहे. त्यामुळे कुठलाही ड्रेझर रत्नागिरीला गेलेला नाही. मी सन्माननीय सदस्यांच्या तिसऱ्या प्रश्नासंबंधी असे सांगू इच्छितो की, पहिल्यांदाच फॉरेन टेक्नॉलॉजीचा उपयोग करण्यात येत आहे. जी.आय.टी.टयूब टाकली जाते व त्या माध्यमातून मिरॅबे बंदर डेव्हलप होणार आहे. मी थोडक्यात सांगतो. पूर्वी ब्रेक वॉटर सिस्टीम नव्हती. त्यामुळे समुदाचे पाणी यायचे व ते निघून जायचे. त्यामुळे एक प्रकारचा भवरा निर्माण व्हायचा व त्याने वाळू निघून जायची. परंतु, आता समुद्राचे पाणी असे येते आणि चुकून ब्रेक वॉटर टाकल्यामुळे इथे वाळू साचते आणि दरवर्षी वाळू काढावी लागते. ही वस्तुस्थिती आहे. परंतु, वाळू काढली जात नाही ही वस्तुस्थिती नाही. वाळू ही काढली जाते.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, लेखी उत्तर वाचल्यानंतर माझा असा प्रश्न आहे की, अधिकारी स्वत: मिरकरवाडा बंदरावर गेले होते काय, त्यांना तेथील वस्तुस्थिती माहिती आहे काय, त्यांनी जे उत्तर दिले आहे ते बरोबर आहे काय, नसल्यास,ज्या अधिकाऱ्याने उत्तर दिले आहे त्याच्यावर कोणती कारवाई करणार आहात ? मिरकरवाडा बंदरातील गाळ काढण्याच्या कामाला ऑगस्ट 2012 मध्ये मंजुरी मिळाली आहे. आज डिसेंबर महिन्यातील 14 तारीख आहे. सदर बंदर हे गाळाने भरलेले आहे. त्यातील गाळ काढून झाला आहे काय ? येथे देण्यात आलेले उत्तर हे असत्य आहे काय, याचीही चौकशी करावी व त्यात दोषी आढळणाऱ्यांविरूद्ध कोणती कारवाई माननीय मंत्री महोदय करणार आहेत ? 

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33525...

**सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण त्यांच्याकडे बघून प्रश्न विचारू नका.  त्याने घोटाळा होईल. आपण माझ्याकडे बघून प्रश्न विचारावा.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माझा शेवटचा प्रश्न असा आहे की, आज मिरकरवाडा बंदरातील मच्छीमारांचा जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांनी मासे पकडले नाहीत तर त्यांची उपजीविका होणार नाही. होड्या बाहेर सुद्धा जात नाही. एवढा चिखल बंदरात आहे. त्यासाठी आपण कोणती उपाययोजना करणार आहात असा माझा प्रश्न आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33525...

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले की, आपण आणि अधिकारी त्या बंदरावर गेला होता काय, त्याबाबत सांगू इच्छितो की, मिरकरवाडा बंदर हे रत्नागिरी शहरामध्येच असल्यामुळे मी अनेकवेळा तेथे गेलो आहे. अधिकारी देखील अनेकवेळा जात असतात. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, दरवर्षी गाळ काढण्यात येतो आणि तो गाळ तेथेच बाजूला टाकण्यात येतो. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे तेथे ब्रेक वॉटर असल्यामुळे सातत्याने तेथे वाळू साचते. ती वाळू आणि बाहेर टाकलेला गाळ पुन्हा बंदरात जातो. तेव्हा आपण नवीन तंत्रज्ञानाचा वापर करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी तेथे चिखल असल्यामुळे तेथे होड्या जात नाही असे सांगितले, त्याबाबत सांगू इच्छितो की, तेथे चिखल नसून ती वाळू आहे.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील 11 हजार सहकारी दूध संस्था बंद असल्याबाबत**

**(8) * 33670 ॲड.आशिष शेलार , श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे , प्रा.सुरेश नवले , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.एम.एम.शेख , श्री.संजय दत्त , श्री.सुभाष चव्हाण , श्री. शरद रणपिसे , डॉ. अपूर्व हिरे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.सतीश चव्हाण** : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील स्वच्छ दूध उत्पादन योजने अंतर्गत जून महिन्यात दूध प्रकल्पांसाठी रू.3 कोटी निधी मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच दूध संघाच्या पुनर्वसनासाठी जून महिन्यात राज्य व केंद्र सरकारकडून प्रत्येकी 5 लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे, हेही खरे आहे काय,

(3) असल्यास, या निधीतून दूध प्रकल्पांना किती रुपये देण्यात आले वा येत आहेत,

(4) याच बरोबर राज्यातील 31 हजार 966 पैकी 11 हजार 028 दूध संकलन करणाऱ्या प्राथमिक सहकारी दूध संस्था बंद आहेत, हे खरे आहे काय,

(5) असल्यास, मराठवाडा विशेष पॅकेज, विदर्भ विकास पॅकेज, विदर्भातील सहा जिल्हयांकरीता पंतप्रधान व मुख्यमंत्री विशेष पॅकेज, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषी विकास योजना, इंटिग्रेटेड डेअरी पार्क योजनेतून मोठा निधी प्राप्त झाला आहे त्या निधीचे वाटप कोणत्या संस्थांना करण्यात आले आहे व त्याचे निकष काय आहेत,

(6) अद्याप अनुदान देण्यात आले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव देवकर, श्री. मधुकरराव चव्हाण यांच्याकरिता** : (1) होय, या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत राज्य अर्थसंकल्पात रू.3.00 कोटी इतका निधी सन 2012-13 करिता मंजूर आहे.

(2) व (3) नाही. परंतू दूध संघांचे पुनर्वसन या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत नाशिक जिल्हा दूध संघाचा रू.2.60 कोटीचा प्रस्ताव केंद्र शासनाने मंजूर केलेला आहे. त्यामध्ये राज्य शासनाचे 50% व केंद्र शासनाचे 50% इतके अनुदान आहे. केंद्र शासनाने या योजनेअंतर्गत या संघासाठी रू.48.10 लक्ष इतका निधी वितरित केला असून त्याप्रमाणे केंद्र व राज्य हिश्याची एकूण तरतूद रू.96.20 लक्ष वितरीत करण्यात आलेली आहे.

(4) राज्यात 26647 पैकी 10666 प्राथमिक सहकारी दूध संस्था बंद आहेत.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33670....

श्री.गुलाबराव देवकर....

(5) व (6) राज्यात दूध व्यवसायास चालना देण्याकरिता राज्य शासनाने वेळोवेळी मराठवाडा विशेष पॅकेज, विदर्भ विकास पॅकेज, विदर्भातील सहा आत्महत्याग्रस्त जिल्हयांकरीता पंतप्रधान व मुख्यमंत्री विशेष पॅकेज, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत इंटिग्रेटेड डेअरी फार्म पार्क इ- योजना राबविण्यात येत आहेत.

(1) मराठवाडा विशेष पॅकेज व विदर्भ विकास पॅकेज अंतर्गत महानंद मार्फत मराठवाडा विभागातील 8 जिल्हयांत व विदर्भ विभागातील 11 जिल्हयांत दूध संघांमार्फत पशुखाद्य अनुदान, संलग्न संस्थांचे बळकटीकरण व गाय वाटप इ.कार्यक्रम राबविले आहेत. त्यासाठी प्रति जिल्हा रू.1.00 कोटी इतके अनुदान महासंघास वितरित केलेले आहे.

(2) पंतप्रधान व मूख्यमंत्री विशेष पॅकेज अंतर्गत आत्महत्याग्रस्त 6 जिल्हयांत पंतप्रधान विशेष पॅकेज अंतर्गत दूध संघांच्या प्रक्षेत्रावर दूध साठवणूकीसाठी 31 ठिकाणी डी.जी.सेटसह बल्क मिल्क कुलर बसविण्याकरीता रू.173.88 लक्ष इतका निधी खर्च करण्यात आलेला आहे. तसेच मुख्यमंत्री विशेष पॅकेज अंतर्गत 75% अनुदानावर चीफ कटर, सचिव संगणक, एएमसीयु इ. उपकरणे सहकारी संस्थांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. त्यासाठी रू.566.67 लक्ष इतके अनुदान खर्च करण्यात आलेले आहे.

(3) राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत कोकण, मराठवाडा व विदर्भ विभागांतील 23 जिल्हयांमध्ये प्रति जिल्हा 2 या प्रमाणे 46 इंटिग्रेटेड डेअरी फार्म पार्क उभारण्यासाठी प्रति सहकारी दूध संस्थांना रू.21.50 कोटी इतके अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे.

निकष :- (1) सहकारी दूध संस्थांचे मागील 3 वर्षांचे लेखापरीक्षण झालेले असावे.

(2) दूध संस्थेवर कोणत्याही प्रकारचे कर्ज नसावे.

(3) सहकारी दूध संस्था शक्यतो दूध संकलन मार्गावर असावी.

(4)दूध संस्थेचे दैनंदिन दूध संकलन 70 लिटर्सपेक्षा कमी नसावे.

(5) शक्यतो पशुवैद्यकीय दवाखाना/अधिकारी जवळपास असावा.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33670....

श्री.गुलाबराव देवकर....

सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

पहिल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये "राज्य अर्थसंकल्पात रुपये तीन कोटी इतका निधी सन 2012-2013 करिता मंजूर आहे" याऐवजी "तरतूद करण्यात आलेली आहे" असे वाचावे. तर सहाव्या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये "प्रति सहकारी दूध संस्था" याऐवजी "प्राथमिक सहकारी दूध संस्था" असे वाचावे.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. आज दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रती लीटर 15 रुपये तोटा सहन करावा लागत आहे. उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे की, 10 हजार 666 दूध संस्था बंद झाल्या आहेत. तेव्हा माझा प्रश्न आहे की, या बंद पडलेल्या दूध संस्था सुरु करण्यासाठी शासनाचे कोणते प्रयत्न सुरु आहेत ? माझा दुसरा प्रश्न आहे की, ज्या 21.50 कोटी रुपये वेगवेगळ्या दूध संस्थाना मंजूर झालेले आहेत, त्या संस्थांची नावे काय आणि त्या कोणाच्या आहेत ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, दूध संस्था बळकट करण्यासाठी शासन अनेक प्रकारच्या उपाय योजना करीत आहे. मग त्यामध्ये स्वच्छ दूध उत्पादन योजना आहे, आरक्यूवाय मधून संस्था बळकट करण्याचा विषय घेतलेला आहे. दूध संस्थांचे पुनर्वसन करण्यासाठी त्यांना वेळोवेळी निधी दिलेला आहे. ज्या दूध संस्था बंद झालेल्या आहेत त्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आढावा घेण्याचे काम सुरु आहे. सन्माननीय सदस्यांना कोणकोणत्या दूध संस्थांना अनुदान दिले असे विचारले. केंद्र सरकारच्या स्वच्छ दूध योजनेच्या माध्यमातून जवळपास 39.25 कोटी रुपयांचे प्रस्ताव मंजूर झालेले आहेत. एकूण 51 दूध संघाचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यापैकी जवळपास 17 दूध संघांना मदत करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, आपण दूध संघांचे पुनर्वसन करण्याचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. पुणे, लातूर, वर्धा आणि बीड या चार दूध संघांचा पुनर्वसन कार्यक्रमामध्ये समावेश झालेला आहे.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33670....

श्री.गुलाबराव देवकर....

सातारा जिल्ह्यातील फलटण दूध संघाचा प्रस्ताव देखील पाठविण्यात आलेला आहे. सातारा जिल्हा संघाचा प्रस्ताव पाठविलेला आहे. त्याशिवाय मराठवाडा पॅकेज, विदर्भ पॅकेज, पंतप्रधान पॅकेज असा विशेष कार्यक्रम राबविण्यात आला होता. त्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यासाठी एक कोटी रुपये अनुदान देण्यात आले. आठ जिल्ह्यामध्ये ही योजना राबविण्यात आली.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33670....

श्री. गुलाबराव देवकर....

विदर्भ विकास पॅकेजमधून प्रत्येक जिल्हयासाठी 1 कोटी याप्रमाणे 11 कोटी रुपयांचा निधी देण्याचे धोरण ठरविण्यात आले. त्याच पध्दतीने राष्ट्रीय कृषी विकास योजना वेग वर्धक दुग्ध विकास कार्यक्रमांतर्गत विचारण्यात आलेल्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, यामध्ये 17 संघांना अनुदान दिले होते. त्यामध्ये पाटोदा दूध संघ, चिंतामणी दूध संघ, बीड, बारामती तालुका दूध संघ, पुणे, मंगलसिध्दी मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह संघ, इंदापूर, नानासाहेब को-ऑपरेटिव्ह मिल, सांगली, वसंतदादा सहकारी संघ, सांगली, हुतात्मा सहकारी दूध संघ, सांगली, कोयना दूध संघ, सातारा, सिन्नर तालुका दूध संघ, नाशिक, गोदावरी खोरे दूध उत्पादक संघ, अहमदनगर, रहाता तालुका दूध उत्पादक संघ, अहमदनगर, श्रीराम तालुका दूध संघ, अहमदनगर, राहुरी तालुका दूध संघ, अहमदनगर अशा 17 दूध संघाना अनुदान देण्यात आले आहे.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सामाजिक न्याय विभागाच्या अनुदानित वसतीगृह कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबत**

**(९) * ३४९२७ श्री.रामनाथ मोते , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो पुंडलिक गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या अनुदानित वसतिगृहांची संख्या किती आहे,

(२) असल्यास सदर वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना सध्या किती मानधन दिले जाते,

(३) शासकीय वसतिगृहात कर्मचाऱ्यांनाही वेतनश्रेणीऐवजी मानधन दिले जाते काय,

(४) कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी व महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष यांनी या विषयाबाबत दिलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने काय निर्णय घेतला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सचिन अहिर, श्री. शिवाजीराव मोघे यांच्याकरिता :** (१) सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुदानित वसतिगृहांची संख्या २३८८ इतकी आहे.

(२) शासन निर्णय दि.३१/०८/२००९ अन्वये अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे मानधन दिले जाते :

अधीक्षक - रू.४५००/-

स्वयंपाकी - रू.३७५०/-

मदतनीस - रू.३०००/-

चौकीदार - रू.३०००/-

(३) जुन्या २७१ शासकीय वसतिगृहामध्ये सर्व कर्मचारी नियमित वेतनावर आहेत. नवीन १०० शासकीय वसतिगृहातील पहारेकरी व सफाईगार कर्मचाऱ्यांची शासन निर्णय दि.२८/०६/२००७ नुसार कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्यात आलेली असून त्यांना खालीलप्रमाणे मानधन दिले जाते.

पहारेकरी रू.३०००/-

सफाईगार रू.२५००/-

उर्वरित कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणीनुसार वेतन अदा केले जाते.

(४) कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी व महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष यांनी या विषयाबाबत दिलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या दालनात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ३४९२७....

दि.१५/५/२०१२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार प्रस्तावावर धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांचा हा प्रश्न आहे. या ठिकाणी उत्तरामध्ये "हा प्रश्न विचाराधीन आहे" असे म्हटले आहे. त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर देखील चर्चा झाली आहे. यापूर्वी २० जानेवारी २००७, १२ जानेवारी २०१०, आणि आपल्या दालनामध्ये १८ जानेवारी २०१० रोजी बैठक झाली होती. त्यामुळे हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. हे कर्मचारी अत्यंत अल्प वेतनावर काम करीत असतात. सभापती महोदय, हा प्रश्न शासकीय पातळीवर विचाराधीन असेल तर या संदर्भात आपण देखील पुढाकार घेतला आहे. त्यामुळे हे शासन अधिवेशन संपण्यापूर्वी यासंबंधी धोरणात्मक निर्णय घेणार काय?

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला अनुसरुन माझा प्रश्न आहे...

**सभापती** : मी आपणास नंतर संधी देतो.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यास दोन्ही प्रश्नांचे एकत्रित उत्तर देता येईल.

**सभापती** : अशाप्रकारचा अपवाद करण्यात येत नाही. ठीक आहे, आज आपण अपवाद करुया.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांकडे आम्ही कार्यप्रवण मंत्री म्हणून पहातो. या प्रश्नासंबंधी शासकीय पातळीवर वारंवार बैठका घेऊन सुध्दा काहीच निष्पन्न होत नाही. वसतिगृहामध्ये काम करणारे हे कर्मचारी आहेत. अनेक वर्षापासून त्यांना या सभागृहामध्ये वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी सातत्याने प्रश्न विचारुन आम्ही लोकप्रतिनिधी करीत आहोत. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, हा प्रस्ताव आपण मंत्रीमंडळापुढे केव्हा घेऊन जाणार आहात, हे वर्ष संपण्यापूर्वी या बाबतचा निर्णय घेतला जाईल काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विचारलेल्या प्रश्नाची गंभीरता लक्षात घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली. तसेच, माननीय उप

अशुध्दीकृत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. ३४९२७....

मुख्यमंत्र्यांकडे अर्थखात्याची जबाबदारी असल्यामुळे त्यांनी देखील बैठक घेतली. हा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे ठेवण्यासाठी तो माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्यात आला असून लवकरात लवकर हा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर ठेवला जाईल.

श्री. नरेंद्र पाटील : सभापती महोदय, इतर शाळांमधील कर्मचारी किंवा आदिवासी विकास विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीमध्ये एक संहिता आहे, किंवा त्यांच्या पदांना एक कोड लागू केला आहे. तशाप्रकारचा कोड आपल्याकडे लागू करण्यात आला नसल्यामुळे तो निर्माण करण्यासाठी आपण हालचाल करणार काय, किती दिवसात तो कोड आपण निर्माण करणार?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या प्रश्नाचा विषय वेगळा असला तरी समअर्हता आणि विषयकृत सिमिलॅरिटी असेल व ते करण्याची आवश्यकता भासली तर ते केले जाईल.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना अधीक्षक रु.4500/-, स्वयंपाकी रु.3750/- आणि मदतनीस, चौकीदार यांना रु.3000/- इतके मानधन दिले जाते. महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार या कर्मचाऱ्यांना कोणते किमान वेतन लागू करण्यात आले आहे?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड . . . .

हे किमान वेतनाप्रमाणे अदा करण्यात येत आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, ते वेतनश्रेणीमध्ये येत नाही. त्यामुळे त्यांना किमान वेतनाचा कायदा लागू होत नाही. हे मानधन आहे म्हणजे त्यांनी सोशली काम करावे असे अभिप्रेत आहे. परंतु गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने . . . .

(सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड खाली बसून बोलतात.)

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मला उत्तर पूर्ण करु द्यावे.

**सभापती** : सामजिक न्याय विभागाचे जे शासकीय कर्मचारी आहेत त्यांची वेतनश्रेणी आणि या व्यतिरिक्त त्या विभागामध्ये असणारे जे इतर कर्मचारी आहेत, त्यांच्या वेतनश्रेणी मध्ये फार मोठी तफावत असून ती अन्यायकारक आहे. दोघांचेही काम एकाच पध्दतीचे असताना ही तफावत दुरुस्त करण्याच्या दृष्टीने म्हणजेच ही तफावत टाळून नवीन वेतनश्रेणी देण्याच्या दृष्टीने समाजकल्याण विभाग काही वेगळा प्रयत्न करणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर :सभापती महोदय, मी मघाशी प्रश्नाचे उत्तर पूर्णच करीत होतो. मी मघाशी असे सांगितले की, आताच्या घटकेला आपण त्यांना मानधन देत आहोत. मात्र मंत्रिमंडळासमोर हाच प्रस्ताव आहे की, त्यांच्या मानधनामध्ये वाढ करावी किंवा वेतनश्रेणी द्यावी. एकदा वेतनश्रेणी देण्याचा मुद्दा आला तर त्यांना किमान वेतनाप्रमाणे ते त्यांना आपोआप लागू होईल.

श्री.जयप्रकाश छाजेड : ते किती दिवसामध्ये देणार आहात ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, आपण एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळासमोर ही बाब आणण्याचा प्रयत्न करु.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----

2एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत**</u>

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या दोन सूचना आलेल्या आहेत.

श्री.विनायक मेटे (खाली बसून) : सभापती महोदय, मला बोलावयाचे आहे.

**सभापती** : मी तुम्हाला नंतर परवानगी देतो. आज माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या दोन सूचना आलेल्या आहेत. एक सूचना सकाळी 9 वाजून 10 मिनिटांनी माझ्याकडे आलेली आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री.विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, श्रीमती शोभाताई फडणवीस,डॉ.दीपक सावंत, रामनाथ मोते, डॉ.नीलम गोऱ्हे, चंद्रकांत पाटील, ॲड.अनिल परब, श्री.विजय गिरकर, श्री.विनायक राऊत, डॉ.रणजित पाटील, गोपीकिशन बाजोरिया आणि ॲड.आशिष शेलार यांची प्रस्तावाची सूचना यापूर्वी सिंचन क्षेत्राच्या अनुषंगाने आणि त्याचबरोबर एस.आय.टी.च्या अनुषंगाने दिलेली होती त्याच पध्दतीची आहे. यापूर्वी जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्याबाबत मी निर्णय दिलेला नाही आणि आज सुध्दा मी ही प्रस्तावाची सूचना प्रलंबित ठेवत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला एक मुद्दा मांडावयाचा आहे. आपण सोमवारी दिवंगत सन्माननीय सदस्यांना श्रध्दांजली अर्पण केली. त्यानंतर आम्ही तीन दिवस सातत्याने मागणी करीत आहोत.पण काल आमच्या सत्ताधारी बाकावरील मित्रांनी सांगितले की, सदनाचे कामकाज होत नाही वगैरे. मग काल रात्री आमच्या पक्षातील सगळया नेत्यांच्या मनामध्ये होते की, आपण एसआयटीची मागणी करीत राहू पण त्याचबरोबर कामकाजही करीत राहू असा आम्ही आग्रह धरीत होतो. तेवढ्यात कृषी विभागाच्या सचिवांचे एक पत्र आले. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "आर्थिक सर्वेक्षण अहवालातील पॉईट-1 ची जी आकडेवारी आहे, तीच आकडेवारी योग्य आहे आणि ती सिंचनच्या विभागाच्या श्वेतपत्रिकेमध्ये आली आहे ती दोन ठिकाणी वेगवेगळी दाखविण्यात आली आहे म्हणजे सरकारच्या पाटबंधारे खात्याची श्वेतपत्रिका आणि सरकारच्या कृषी विभागाचे श्री.गोयलसाहेब यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना लिहिलेले पत्र आहे. त्यामध्ये पुन्हा आकडेवारी वेगळी दाखविण्यात आली आहे.

सभापती महोदय, हा सर्व गोंधळ पाहिल्यानंतर असे वाटले की, आता एसआयटी लावलीच पाहिजे. एक विभाग वेगळे म्हणणे मांडतो, दुसरा विभाग वेगळे म्हणणे मांडतो.आम्हाला वाटले की, मागच्या वेळी माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे याठिकाणी देखील प्रिटींग मध्ये

. . . .2 एच-3



श्री.विनोद तावडे . . . .

चूक झाली असेल. म्हणून आम्ही ते विसरु लागलो. पण ते विसरे-विसरे पर्यंत, बहुदा आम्ही ते विसरु नये म्हणून कोणी काही केले आहे की काय हे आम्हाला माहिती नाही. पण आमच्या हातामध्ये हे संध्याकाळी प्राप्त झाले. संध्याकाळी सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड साहेब आल्यानंतर शासनाचे सचिव म्हणतात की, ही आकडेवारी आणि ती आकडेवारी वेगवेगळी आहे, विसंगत आहे आणि त्यामुळे स्वाभाविकपणे लोकांच्या मनात वेगळे मत झाले असल्याचे दिसते असे ते स्वत: म्हणतात. नंतर आज टी.व्ही.वर श्रीमती फौजिया खान मॅडम आल्या. त्यांचे फोटो दाखविले. आता कसे काम करावयाचे मला माहिती नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

सभापती महोदय, आम्ही श्वेतपत्रिकेतील आकडेवारी खरी मानावी, ही आकडेवारी खरी मानावी की, आबा म्हणतात ती आकडेवारी खरी मानावी ? आता एसआयटी दिल्याशिवाय यातील काहीही स्पष्ट होणार नाही म्हणून आमचा एसआयटीचा आग्रह आहे. त्यामुळे आम्हाला एसआयटी मिळाली पाहिजे एवढेच आमचे म्हणणे आहे.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात )

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, या विषयावर वेगवेगळ्या माध्यमातून विरोधी पक्ष चर्चा करु शकतात. जलसंपदा विभागावरील श्वेतपत्रिकेवर चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे. परंतु विरोधी पक्षाच्या सदस्यांना कोणतीही चर्चा नको. त्यांना सभागृहाचे कामकाज बंद पाडावयास पाहिजे. या अधिवेशनापासून विदर्भातील जनतेच्या मोठ्या अपेक्षा आहेत. परंतु त्या सगळ्यांकडे दुर्लक्ष करुन केवळ राजकारण करण्याचे काम ते करीत आहेत. माझी एवढीच विनंती आहे की, गेले चार दिवस विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी जे कामकाज बंद पाडले त्यांचे कोणतेही भत्ते देण्यात येऊ नयेत. किमान तेवढी तरी शिक्षा त्यांना देण्यात यावी.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात )

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, एसआयटीची मागणी करण्याअगोदर त्यांच्या मनातील ज्या ज्या गोष्टी आहेत त्या गोष्टींची खुल्या मनाने चर्चा करावी. या सभागृहामध्ये चर्चा होऊ द्यावी आणि चर्चेनंतर जर ठरले तर तुमच्या मागणीला कोण विरोध करणार आहे ? आपण चर्चेपासून का पळता ? चर्चा घेतल्याशिवाय एसआयटीचा विचार होणार नाही.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ज्या प्रस्तावाचा उल्लेख या ठिकाणी केलेला आहे त्याच संदर्भामध्ये काल आणि परवा सुध्दा आपण आपल्या दालनामध्ये आणि या सभागृहामध्ये निर्णय दिलेला आहे की, आपण त्याबाबतचा निर्णय राखून ठेवलेला आहे. असे असताना सुध्दा सन्माननीय विरोधी पक्ष नेते सातत्याने तोच तो विषय परत परत उपस्थित करीत आहेत आणि या सभागृहाचा वेळ घेत आहेत. म्हणून माझी अशी मागणी आहे की, विरोधी पक्षाचे जे सदस्य वेलमध्ये आले असतील त्यांना निलंबित करावे आणि या सभागृहाचे कामकाज सुरळीत करावे. या सभागृहाचा वेळ घेणाऱ्या विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना निलंबित करावे.

( विरोधी पक्षाचे सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात )

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/ KTG/ D

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक 31 मार्च, 2010 रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा छत्तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. डी. पी. सावंत (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे सन 2008-2009 व 2009-2010 या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. डी. पी. सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन 2010-2011 या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. डी. पी. सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचे सन 2010-2011 या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. डी. पी. सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे सन 2010-2011 या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे

श्री. सुभाष चव्हाण ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा सतरावा, अठरावा व एकोणिसावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा सतरावा, अठरावा व एकोणिसावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : दिनांक 11 डिसेंबर, 12 डिसेंबर, 13 डिसेंबर व आज दिनांक 14 डिसेंबर, 2012 रोजी माझ्याकडे सन्माननीय सदस्यांकडून विधान परिषद नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत त्यापैकी ज्या सूचनांच्या संदर्भात मी शासनाने निवेदन करावे असा निर्णय दिलेला आहे त्या सूचनाची यादी सह सचिव वाचून दाखवतील.

सह सचिव : मंगळवार, दिनाक 11 डिसेंबर, 2012 रोजी प्राप्त झालेल्या सूचना :-

(1) सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार, वि.प.स.

"उल्हासनगर महापालिकेतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व लेखन साहित्याचा लाभ सन 2011-2012 या वर्षात न मिळणे " - शासनाने निवेदन करावे

(2) डॉ. दीपक सावंत, वि. प. स.

"राज्यातील नागरिकांना आरोग्य सेवा पुरविणे, स्पेशालिटी डॉक्टरांना बंधनकारक करण्यात येणे याबाबत डॉटरांनी शासनाकडे केलेल्या तक्रारी तसेच सक्तीच्या सेवेबद्दल डॉक्टरांमध्ये असंतोष पसरणे " - शासनाने निवेदन करावे

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सह सचिव.....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळील मोकळया जागेत येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

(3) सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि.प.स.

"मावळ जि.पुणे येथील श्री. एकविरा देवस्थानचा ट्रस्ट वेहेरगाव येथील गावगुंडांनी दादागिरी आणि दहशत माजवून ताब्यात घेण्याचा केलेला प्रयत्न" - शासनाने निवेदन करावे.

(4) सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, किशनचंद तनवाणी, ॲड. अनिल परब, वि.प.स.

"वाशिम व खामगाव नगर परिषदेने मालमत्ता कराच्या आकारणीत अवास्तव वाढ करणे, सदर दरवाढी विरोधात हजारो लोक अपिलामध्ये जाणे" - शासनाने निवेदन करावे.

(5) श्री. रामदास कदम वि.प.स.

"ठाणे जिल्हा परिषदेने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी खरेदी केलेल्या साहित्यात झालेला भ्रष्टाचार - शासनाने निवेदन करावे.

(6) श्री. रामदास कदम, वि.प.स.

रायगड जिल्ह्यातील उरण येथील सिडको प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न प्रलंबित असताना ए.पी.एम.सी.मार्केटसाठी 250 एकर जमीन देण्याचा सिडकोने घेतलेला निर्णय" - शासनाने निवेदन करावे.

**बुधवार, दिनांक 12 डिसेंबर 2012 रोजी प्राप्त झालेल्या सूचना**

(1) सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार, वि.प.स.

"राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील हजारो शिक्षकांना शिक्षण सेवकाच्या कालावधीच्या लाभापासून वंचित ठेवल्याबाबत" - शासनाने निवेदन करावे.

(2) सर्वश्री भगवान साळुंखे, रामनाथ मोते, नागो पुंडलिक गाणार, चंद्रकांत पाटील, डॉ. रणजित पाटील, श्री. नितीन गडकरी, वि.प.स.

"राज्यातील आश्रमशाळा सुनियंत्रित करण्यासाठी आचारसंहिता असणे अत्यावश्यक असून शासनाने तसे आदेश दिलेले असताना प्रशासनाकडून अक्षम्य विलंब होणे, त्यामुळे संस्थाचालक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण" - शासनाने निवेदन करावे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सह सचिव....

(3) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

"विदर्भातील मेळघाट या आदिवासी भागात प्राथमिक आरोग्य केंद्रावर प्रशिक्षित डॉक्टरांची नियुक्ती केलेली असणे, परंतु वाहनाअभावी डॉक्टरांना दुर्गम भागात जाता न येणे, परिणामी कुपोषणामुळे बालमृत्यूचे वाढत असलेले प्रमाण" - शासनाने निवेदन करावे.

(4) श्री. गोपीकिसन बाजोरिया, ॲड अनिल परब, श्री. किशनचंद तनवाणी, वि.प.स.

"अकोला जिल्ह्यातील पूर्णा नदीवर बांधण्यात आलेल्या बॅरेजचे काम अपूर्ण अवस्थेत असणे, परिणामी नागरिकांमध्ये निर्माण झालेली चीड व पसरलेला तीव्र असंतोष" - शासनाने निवेदन करावे.

(5) श्री. रामदास कदम,वि.प.स.

केंद्र शासनाच्या बालविकास योजनेंतर्गत अलाईड प्रोटीन्स फूडस् प्रा.लि. व स्वप्नील ॲग्रो यांच्या मार्फत पुरविण्यात येणारे धान्य निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत" - शासनाने निवेदन करावे.

(6) ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, विजय गिरकर, वि.प.स.

"राज्यातील 12 जिल्ह्यांनी केंद्र सरकारमार्फत राबविण्यात येणा-या इंदिरा आवास योजनेच्या अटींची पूर्तता न केल्याची बाब, ग्रामीण विकास मंत्रालयामार्फत प्रकाशित करण्यात आलेल्या अहवालाच्या माध्यमातून निदर्शनास येणे" - शासनाने निवेदन करावे.

(7) सर्वश्री. चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, वि.प.स.

"महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या राज्यसेवा पूर्व-परीक्षा 2013च्या परीक्षेचा बदललेला अभ्यासक्रम, प्रश्नांची संख्या व प्रश्नाला असलेले गुण या स्वरुपाची स्पष्टता नसल्याने अभ्यासक्रम बदलताना कमीत कमी एक वर्ष पूर्वसूचना देण्याची आवश्यकता" - शासनाने निवेदन करावे.

(8) डॉ. नीलम गो-हे, वि.प.स.

"पुणे जिल्ह्यातील तसेच मुंबई येथील लहान बालिका व महिलांवर होणा-या बलात्कारांचे वाढते प्रमाण" - शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..3..

सह सचिव...

**गुरुवार, दिनांक 13 डिसेंबर रोजी प्राप्त झालेल्या सूचना**

(1) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

"दिनांक 19 नोव्हेंबर, 2012 रोजी रोठ खुर्द (ता.रोहा. जि. रायगड) येथील युवक राकेश हरिश्चंद्र मोरे यास सुदर्शन कॉलनी समोरील रस्त्यावर गुन्ह्याची कोणतीही शहानिशा न करता रोहा पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक सुरेश जाधव यांनी केलेली मारहाण" - शासनाने निवेदन करावे.

(2) सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, भगवान साळुंखे, रामनाथ मोते, डॉ. रणजित पाटील, वि.प.स.

"शासकीय कर्मचा-यांप्रमाणेच खाजगी स्वयंसेवी संस्थांच्या वसतिगृहातील कर्मचा-यांनासुध्दा शासकीय नियमानुसार वेतनभत्ते व इतर सुविधा देण्याबाबत" - शासनाने निवेदन करावे.

(3) श्री. रामदास कदम, वि.प.स.

"पुणे जिल्ह्यातील लोणावळा नगरपरिषदेअंतर्गत मौजे खंडाळा ता. मावळ येथील विकास व्हॅली येथे विकासकामार्फत करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत नगरपरिषदेने वारंवार नोटीसा देऊनही अनधिकृत बांधकाम पाडण्यात न येणे" - शासनाने निवेदन करावे.

(4) श्री. विनायक राऊत, वि.प.स.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळा तालुक्यात माणगांव खो-यातील मेढ्याचा डोंगर या भागात रानटी हत्तींचे वास्तव्य असून त्यांनी केलेल्या हल्ल्यात शेतकरी गंभीररित्या जखमी होण" - शासनाने निवेदन करावे.

(5) डॉ. दीपक सांवत, वि.प.स.

"ठाणे महानगरपालिकेने पालिकेच्या रुग्णालयात नेमणूक केलेले डॉ. मोहमद झुबेद कुरेशी यांची पदवी बनावट असल्याचा प्रकार उघडकीस येणे" - शासनाने निवेदन करावे.

(6) डॉ. नीलम गो-हे, वि.प.स.

"विदर्भात रक्तपेढ्यांची अवस्था अत्यंत गंभीर असून रक्ताचाही काळाबाजार होत असल्याबाबतची बाब निदर्शनास येणे" - शासनाने निवेदन करावे.

..4.

सह सचिव

(7) श्री. कपिल पाटील, वि.प.स.

"राज्यातील व्यवसाय प्रशिक्षण संस्थांवर शिक्षण परीक्षा मंडळाने 6 महिने ते 2 वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी रुपये 1 ते 2 लाख अनामत रक्कम भरण्याची जाचक अट टाकणे" - शासनाने निवेदन करावे.

(8) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

"अकोला सार्वजनिक बांधकाम मंडळाच्या अनागोंदी व मनमानी कारभारामुळे कर्मचारी, अभियंते, ठेकेदार त्रस्त असल्याचे माहे जुलै 2012मध्ये निदर्शनास येणे" - शासनाने निवेदन करावे.

**शुक्रवार, दिनांक 14 डिसेंबर 2012 रोजी प्राप्त झालेल्या सूचना**

(1) सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार, वि.प.स.

"मुंबई विद्यापीठांतर्गत महाविद्यालयीन स्तरावर खेळणा-या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी क्रीडा निदेशक/अधिकाऱ्यांची नियुक्ती करणेबाबत" - शासनाने निवेदन करावे.

(2) सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, भगवान साळुंखे, डॉ. रणजित पाटील, श्री. प्रवीण पोटे, वि.प.स.

नागपूर जिल्ह्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित होणा-या अन्नधान्याच्या वाहतूक प्रक्रियेसंदर्भातील प्रश्न न्याप्रविष्ट असल्याने कंत्राटदार नियुक्त होऊ न शकल्याने प्रादेशिक परिवहन कार्यालयाने निश्चित केलेल्या अधिग्रहित वाहनाच्या दरात तात्पुरती व्यवस्था म्हणून कंत्राटदाराकडून वाहतुकीचे काम करुन घेणे" - शासनाने निवेदन करावे.

(3) सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते, वि.प.स.

"अमरावती महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या महानगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षकांचे वेतन व सेवाविषयक अनेक प्रश्न बऱ्याच कालपवधीपासून प्रलंबित असणे" - शासनाने निवेदन करावे.

(4) श्री. रामदास कदम, वि.प.स.

"मुंबई, नेहरुनगरमधील रहिवाशांचे पुनर्वसन होत नसल्यामुळे तेथील जमिनीवरील आरक्षण प्रभादेवी रोड येथील कामगार नगर नं. 1 दाखवणे, त्याचप्रमाणे कामगार नगर नं. 1 वस्तीच्या जवळून जाणा-या नाल्यांची रुंदी कमी करुन नेहरुनगरमधील रहिवाशांचे पुनर्वसन करण्यासाठी कामगारनगरमधील रहिवाशांना हुसकावून लावणे" - शासनाने निवेदन करावे. ..5..



(5) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"मुंबईची सागरी सुरक्षा बळकट करण्यासाठी लागणारी अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, स्पीड बोटी तसेच सारंग (कॅप्टन) व इंजिन ड्रायव्हर तसेच आवश्यक असणारे अधिकारी/कर्मचारी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने सागरी सुरक्षेची दयनीय अवस्था असणे" - शासनाने निवेदन करावे.

(6) सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते, वि.प.स.

"धान्याच्या किंमतीबाबत शासनाचे कोणतेही निश्चित धोरण नसल्यामुळे गोंदिया जिल्ह्यातील शेतक-यांनी पिकविलेले धान हे दरवर्षी खुल्या बाजारात अतिशय अल्प दरात व्यापा-यांकडे जात असल्याचे उघड होणे" - शासनाने निवेदन करावे.

(7) ॲड. आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, विजय गिरकर, वि.प.स.

"मुंबईतील उत्तुंग इमारतींना आग लागल्यास ती शमविण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रणा उपलब्ध नसल्याचे मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी स्पष्ट करणे, तसेच अग्निशमन प्रतिबंधात्मक यंत्रणेत काही बिघाड झाल्यास त्याकडे गंभीरपणे पाहिले न जाणे" - शासनाने निवेदन करावे.

(8) डॉ. दीपक सांवत, वि.प.स.

"राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये डेंग्यू, लेप्टोस्पायरोसिस, मलेरिया, वगैरे रोगांची तसेच आदिवासी भागात सिकल सेल यासाथींच्या रोगांची मोठी साथ पसरणे, या साथीच्या रोगांना आळा घालण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना न करणे " - शासनाने निवेदन करावे.

(9) डॉ. नीलम गो-हे, वि.प.स.

बेवारटोला (पुनर्वसित, ता. सालेकसा, जि.गोंदिया) या गावातील 15 ते 16 वयोगटातील चार तरुणी 19 वर्षापासून बेपत्ता असल्याची घटना नुकतीच उघडकीस येणे, परिणामी आदिवासींमध्ये पसरलेले भीतीचे व दहशहतीचे वातावरण" - शासनाने निवेदन करावे.

(10) श्री. कपिल पाटील, वि.प.स.

"अशासकीय विशेष शाळांना सशक्त करण्याची गरज असताना कर्मचा-यांची असलेली संख्या कमी करण्याचे आदेश दिल्यामुळे अपंग व विशेष शाळांतील मुलांचे शिक्षण धोक्यात येणे" - शासनाने निवेदन करावे.

---

..6..



(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मोकळया जागेत येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

**पृ. शी.** : शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) विधेयक.

L.A.BILL N0.XXXII OF 2012

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EDUCATION AND EMPLOYMENT GUARANTEE (CESS) ACT, 1962)

AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि. स. वि. क्रमांक 32, महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, 1962 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि. स. वि. क्रमांक 32, महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, 1962 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**सभापती** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांचा प्रस्ताव आहे. त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

**सभापती** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत यांचा प्रस्ताव आहे. त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

**सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल. खंड 2 ते 13 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले. ..7..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012चे वि.स.वि.क्रमांक 32 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 32 संमत झाले आहे.

--

....नंतर श्री. गिते....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे, ती मी प्रलंबित ठेवत आहे. त्याबाबतचा निर्णय मी नंतर देईल.

आजच्या कार्यक्रम पत्रिकेवरील जे कामकाज आज झाले नाही, ते कामकाजही मी प्रलंबित ठेवतो. सदर कामकाजाबाबतचा निर्णय मी नंतर घेईल.

आज सकाळी या सदनातील काही सन्माननीय सदस्य माझ्या दालनात आले होते. त्यांनी सभागृहाच्या कामकाजाबाबत माझ्या समवेत चर्चा केली. नागपूरच्या अधिवेशनामध्ये विदर्भातील प्रश्न गांभीर्याने चर्चेला यावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. दुष्काळाची परिस्थिती आणि पाणी टंचाई हा महाराष्ट्रातील ज्वलंत प्रश्न निर्माण झालेला आहे. मराठवाडा, विदर्भातील काही भाग, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र या ठिकाणी दुष्काळ आणि पाणी टंचाईचा प्रश्न अत्यंत गंभीर झालेला आहे. डिसेंबर महिन्यात पाण्याची परिस्थिती अशी असेल तर एप्रिल आणि मे महिन्यात कशी असेल ही मोठी चिंता करण्यासारखी बाब आहे.

सन्माननीय सदस्यांनी मला विनंती केली की, गेल्या चार दिवसापासून सदनाचे काम न झाल्यामुळे पाणी टंचाई,चारा टंचाई, दुष्काळ या गंभीर प्रश्नांवर चर्चा होऊ शकलेली नाही. ती चर्चा झाली पाहिजे. सदनातील दोन्ही बाजूच्या सदस्यांना शासनाच्या वतीने विनंती करावी की, या गंभीर विषयावर सभागृहात चर्चा होणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्यांच्या मागणीच्या संदर्भात दोन्ही बाजूच्या सदस्यांशी मी चर्चा केलेली आहे. गेल्या तीन-चार दिवसापासून मी सातत्याने विरोधी पक्ष नेत्यांना या संदर्भात चर्चा करण्यासाठी बोलाविले होते. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना देखील चर्चेसाठी मी बोलाविले होते. तसेच सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनाही चर्चेसाठी बोलाविले होते. संसदीय कामकाज मंत्र्यांना सुध्दा बोलाविले होते. या सदनात उपस्थित असलेले श्री.हेमत टकले आणि श्री.सुभाष चव्हाण या गट नेत्यांना देखील बोलाविले होते. आपल्या ज्या अडचणी आहेत, आपला जो आग्रह आहे, तो आग्रह आपण लोकशाही पध्दतीने जरुर व्यक्त करावा. पण राज्याच्या दृष्टीने जे अत्यंत हिताचे, राज्यातील जनतेच्या जीवाभावाचे प्रश्न आहेत, त्यासंबंधी या सभागृहात चर्चा व्हावी. अशी भावना मला जवळपास 40 आमदारांनी माझ्याकडे व्यक्त केली आहे. ती भावना मी सभागृहाच्या माध्यमातून सर्व सन्माननीय सदस्यांच्या कानावर घातली आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ D/ पूर्वी श्री.गिते 13:45

**सभापती**..........

यापुढील काळात जास्तीत जास्त वेळ दुष्काळाच्या अनुषंगाने व पाणी प्रश्नाच्या अनुषंगाने चर्चा घडवून आणण्यासाठी मला दोन्ही बाजूकडून सहकार्य मिळावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याच भावना मी काल व्यक्त केल्या होत्या. नियम 289 अन्वयेच्या सूचनेबद्दल बोलत असताना मी आग्रहाने म्हटले होते की, सिंचन घोटाळ्याबाबत वेगळया मार्गाने एस.आय.टी.मार्फत चौकशी व्हावी. संसदीय कार्यमंत्र्यांनी दोन्ही सभागृहाच्या कामकाजाची तुलना केली तर त्यांच्या लक्षात येईल की, विधानपरिषद सभागृहामध्ये प्रश्नोत्तराच्या तासाला न्याय देण्यात आला आहे. प्रश्नोत्तराच्या तासामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील 41 प्रश्न मार्गी लागले आहेत. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाबाबतचा महत्वाचा प्रश्न या ठिकाणी चर्चेला आणल्याबद्दल मी माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांचे मनापासून आभार मानले. माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. विरोधकांच्या सहकार्याची दखल घेऊन त्यांनी आम्हाला धन्यवाद दिले आहेत. विषय महत्वाचा असल्यामुळे आम्ही तो योग्य पध्दतीने हाताळला आहे. पाण्याच्या आणि दुष्काळाच्या प्रश्नाबाबत तसेच विदर्भातील प्रश्नाबाबत, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या प्रश्नाबाबत सिंचन विभागातील घोटाळा कारणीभूत आहे. त्या घोटाळ्याची एस.आय.टी.मार्फत चौकशी झाली पाहिजे. तरच हे प्रश्न सुटण्यास मदत होईल. म्हणून आम्ही आग्रह धरीत आहोत. तरी देखील आम्ही या मनस्थितीत आहोत की, सभागृहात चर्चा झाली पाहिजे. काल मला कृषी सचिवांकडून एक पत्र प्राप्त झाले आहे. त्या पत्रातील मजकूर वाचून मला खरे वाटले नव्हते. परंतु मी माननीय कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांचे वृत्तपत्रातील स्टेटमेंट वाचल्यानंतर मला त्यात तथ्य असल्याचे दिसून आले. सरकारचा कृषी विभाग म्हणतो म्हणजे केवळ 0.1 टक्का सिंचनामध्ये वाढ झाली हे खरे आहे. या संदर्भात एस.आय.टी.मार्फत चौकशी व्हावी म्हणून आम्ही आग्रह धरला होता. आपण जी सूचना केली आहे त्या सूचनेचा विचार करुन नक्की मार्ग काढू.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सभागृहाच्या कामकाजामध्ये वारंवार व्यत्यय आणण्याचा प्रयत्न विरोधी पक्षाकडून केला जात आहे. सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये चर्चा झाल्यानुसार श्वेतपत्रिकेच्या बाबतीत सभागृहामध्ये चर्चा व्हावी. सभागृहातील माननीय सदस्य आणि सभागृहाबाहेरील जनता देखील या चर्चेची आतुरतेने वाट पहात आहे. श्वेतपत्रिकेवर चर्चा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख...........

घडवून आणण्याची सरकारची तयारी आहे. विदर्भातील महत्वाच्या प्रश्नांवर सुध्दा सभागृहात चर्चा होणार आहे. परंतु विरोधी पक्षाकडून सभागृहाचा वेळ वाया घालविला जाणे योग्य नाही. माननीय विरोधी पक्षनेते हे विद्यार्थी परिषदेचे नेते नसून सभागृहाचे विरोधी पक्षनेते आहेत. त्यानुसार त्यांनी वागावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात आपल्या दालनात चर्चा झाली होती. परंतु प्रथा परंपरे प्रमाणे दालनातील चर्चचा उल्लेख सभागृहात फारसा केला जात नाही, कारण तो आपला अधिकार आहे. परंतु एक गोष्ट निश्चित आहे की, पाच दिवसापासून सभागृहाचे कामकाज होऊ शकले नाही. माननीय विरोधी पक्ष नेते म्हणाले की, "प्रश्नोत्तरे होतात परंतु पुढचे कामकाज होत नाही". विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले आहे की, कृषी सचिवांचे पत्र आले आहे ,कृषी मंत्र्यांचे स्टेटमेंट आलेले आहे. त्यामुळे या सर्व विषयाच्या संदर्भात आपण सभागृहात चर्चा करु शकतो. चर्चा करण्याची आमची तयारी आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात माननीय सभापती महोदयांनी वेळ ठरवून चर्चेला सुरुवात करावी. चर्चा करण्यास शासन तयार आहे. या प्रश्नाच्या संदर्भात सहा अधिवेशनात वेगवेगळया प्रश्नावर चर्चा झालेली आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे.

कामकाज सल्लागार समितीने अधिवेशनाचे दोन आठवडयाचे कामकाज निश्चित केलेले आहे. 21 डिसेंबर पर्यंत कामकाज करण्याचा आपला प्रस्तावही मान्य झाला व तो आपण घोषितही केलेला आहे. त्यामुळे 21 डिसेंबर, 2012 रोजी हिवाळी अधिवेशनाचे काम संपणार आहे याबाबत आपण निर्णयही घेतलेला आहे. अधिवेशनाचे पाच-पाच दिवस वाया घालवायचे, विदर्भाच्या प्रश्नावर चर्चा करावयाची नाही, विदर्भातील अनुशेषावर चर्चा करावयाची नाही हे काही योग्य नाही. विरोधी पक्ष ज्या प्रश्नाच्या संदर्भात चर्चेची मागणी करीत आहे त्या प्रश्नावर आमची चर्चा करण्याची तयारी आहे. चर्चा न करता एका विशिष्ट पध्दतीची मागणी करावयाची व चर्चा होऊच द्यावयाची नाही हे काही योग्य नाही. त्यामुळे या विषयाच्या चर्चेच्या संदर्भात आपण वेळ ठरवावी. या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा करण्यास सरकारची पूर्ण तयारी आहे. विरोधी पक्षाच्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांना जे काही बोलावयाचे असेल ते बोलू द्यावे, आम्ही त्यास उत्तरे देण्यास तयार आहोत. एवढे सर्व स्पष्ट असतांना सभागृहाचा वेळ वाया घालवणे हे काही योग्य नाही. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात माननीय सभापती महोदयांनी निर्णय घ्यावा असे मला वाटते.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अधिवेशनाचा कालावधी एक आठवडयाने वाढवावा अशी आमची सर्वांची मागणी आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, दिलेला वेळ वाया घालवायचा व पुन्हा वेळ वाढवून द्या म्हणावयाचे हे काही बरोबर नाही. सिंचनाच्या संदर्भात आठ वेळा, अठ्ठावीस वेळा चर्चा झाली आहे असे विरोधी पक्षाचे म्हणणे आहे परंतु आपण एकदा प्रोसिडींग काढून बघितले तर आपल्याला सर्व समजून येईल. सरकारची सर्व प्रश्नावर चर्चा करण्याची तयारी आहे त्यामुळे आपण चर्चेची वेळ ठरवावी एवढीच माझी आपल्याला विनंती आहे. अशा प्रकारे सभागृहाचे कामकाज थांबविणे बरोबर नाही त्यामुळे यासंदर्भात आपण योग्य तो निर्णय घ्यावा अशी आमची आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : सोमवार दिनांक 17 डिसेंबर, 2012 रोजी मी सर्व लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊन आपल्या लक्षवेधी सूचनेला न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे तसेच विदर्भाच्या प्रश्नांनाही न्याय देणार आहे. आपण एक पाऊल पुढे टाकीत आहोत. अन्यथा चार दिवसाच्या लक्षवेधी सूचना तहकूब करण्यात आल्या होत्या. त्यामुळे सर्व लक्षवेधी सूचना एकत्र घेतल्या तर आपल्या प्रश्नांना न्याय मिळू शकेल.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते असे म्हणाले होते की, "आम्ही प्रश्नोत्तरे होऊ देतो." त्यामुळे प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सिंचनाचा प्रश्न घेतला तर त्यामध्येही चर्चा करण्याची आमची तयारी आहे. प्रश्नोत्तरे होणार, लक्षवेधी होणार आणि पुढचा विषय आला की, सभागृह बंद पाडणार हे काही बरोबर नाही.

**सभापती** : सभागृहाला मी सांगू इच्छितो की, सर्व प्रयत्नांची पराकाष्ठा करुन विरोधी पक्षाच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम मी करणार आहे. माझ्या प्रयत्नाला यश आले नाही तर मी दुष्काळ आणि पाणी प्रश्नावर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करुन या सभागृहात एक्स्ट्रा चर्चा करण्याची व्यवस्था करेन.

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 17 डिसेंबर, 2012 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 53 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 17 डिसेंबर, 2012 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही